१०३ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• पुणे, सोमवार १ डिसेंबर, २०२५ • वर्ष-५, अंक-७३, पाने-८, किंमत : ₹ ६

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 73, Marathi - Daily - Pune, 1 December, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email- contact@navakal.in



नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

नरेंद्र मोदी स्टेडियमलगत 30+ बांधकामांवर बुलडोझर

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Official @NavakalNews


# १२ जिल्ह्यांत निवडणूक पुढे ढकलली
# आयोगाचा घोळ! आता २० डिसेंबरला मतदान

■ मुंबई

**राज्यातील नगरपालिका आणि नगरपंचायतींची निवडणूक काही तासांवर आली असतानाच न्यायालयीन प्रक्रियेमुळे पुणे, ठाणे, सोलापूर, अहिल्यानगर, धाराशिव, चंद्रपूर, नांदेड यासह १२ जिल्ह्यांतील अनेक ठिकाणच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. या निवडणुकांचा सुधारित कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून, तिथे २ डिसेंबर रोजी होणारे मतदान आता २० डिसेंबर रोजी पार पडणार आहे. पण यामध्ये नव्याने कोणालाही उमेदवारी अर्ज दाखल करता येणार नाही. आयोगाच्या बेजबाबदार कारभारामुळे या निवडणुका न्यायालयीन पेचात अडकून पुढे ढकलल्या गेल्याने उमेदवारांचा मोठा हिरमोड झाला आहे.**

**राज्य** निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबरला जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार, एकूण २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी २ डिसेंबरला मतदान, तर ३ डिसेंबरला मतमोजणी होणार होती. मात्र, आयोगाने काल रात्री उशिरा न्यायालयीन कारणामुळे काही ठिकाणच्या निवडणुका तडकाफडकी पुढे ढकलल्या आहेत. त्यामुळे तिथे २ डिसेंबरऐवजी २० डिसेंबरला मतदान होईल. तर २१ डिसेंबरला निकाल घोषित होणार आहे. उर्वरित ठिकाणी ठरल्याप्रमाणे मतदान होईल.

राज्य निवडणूक आयोगाने जारी केलेल्या आदेशानुसार, निवडणूक अर्ज छाननीदरम्यान निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयांविरोधात उमेदवारांनी जिल्हा न्यायालयात अपील दाखल केली होती. या अपिलांवर



२२ नोव्हेंबरपर्यंत निकाल लागणे अपेक्षित होते. मात्र, काही ठिकाणी निकाल उशिरा लागले किंवा प्रलंबित आहेत. तसेच महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम-१९६६ नुसार उमेदवारांना अर्ज मागे घेण्यासाठी आवश्यक असलेला तीन दिवसांचा कालावधी न देताच काही निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी चिन्ह वाटप केले. ही प्रक्रिया नियमबाह्य ठरल्याने आयोगाने संबंधित उमेदवारांच्या जागांच्या निवडणुकीला व अध्यक्षपदाच्या बाबतीत संपूर्ण निवडणुकीला स्थगिती दिली आहे. आयोगाच्या याच ढिसाळपणाचा फटका उमेदवारांना बसला आहे.

निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी दिलेल्या माहितीनुसार, हा आदेश लागू झाल्यापासून संबंधित ठिकाणी निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता लागू असणार आहे. या अपिलांमुळे प्रभावित झालेल्या क्षेत्रांतील निवडणूक प्रक्रिया पुढील टप्प्यात पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ नगर परिषदेसह कुळगाव-बदलापूर परिषदेतील सहा प्रभागांमध्ये (५ ब, १५ ब, १७ अ, १० ब, ८ अ, १९ अ) निवडणूक २० डिसेंबरपर्यंत लांबणीवर पडली आहे. पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील तळेगाव-दाभाडे आणि लोणावळा येथील प्रत्येकी » पान ७ वर

# जागावाटपात भीक मागावी लागते
## रामदास आठवले महायुती सोडणार?

■ पिंपरी-चिंचवड



**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील मित्रपक्षांत फोडाफोडी आणि जागावाटपावरून कटुता वाढत असतानाच केंद्रीय राज्यमंत्री आणि रिपब्लिकन पक्षाचे (आरपीआय) प्रमुख रामदास आठवले यांनीही निवडणुकीत महत्त्व न मिळाल्याने आपली नाराजी व्यक्त केली आहे. पिंपरी-चिंचवड येथे कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलताना त्यांनी महायुतीत आरपीआयला जागा मिळवण्यासाठी अक्षरशः भीक मागावी लागत आहे, अशी खंत व्यक्त केली. त्यांच्या वक्तव्यामुळे खळबळ उडाली असून, आरपीआय स्वबळावर निवडणुका लढवणार का, असा प्रश्न विचारला जात आहे.**

**रामदास** आठवले म्हणाले की, इतर पक्ष निवडणुका आल्या की, सर्व जागा लढण्याचा निर्धार करतात. पण आमच्या पक्षाची परिस्थिती वेगळी आहे. आम्हाला जागांसाठी विनवण्या कराव्या लागतात. आम्हीही देशाच्या राजकारणात आहोत. आम्हालाही लढायचे आहे, पण आमच्याकडे मजबूत संघटन नसल्याने पक्षाला इतर पक्षांकडे भीक मागण्याची वेळ येते. मतांची गरज असते, तेव्हा आमची आठवण येते. पण जागा देताना आम्हाला महत्त्व दिले जात नाही. ही परिस्थिती बदलायला हवी.

ते पुढे म्हणाले की, महापालिका निवडणुका महायुती म्हणून लढविल्या जाव्यात. त्यामध्ये रिपब्लिकन पक्षाला योग्य जागा मिळाव्यात. मुंबई महापालिकेत १७ ते १८, तर पुणे महापालिकेत २० आणि पिंपरी-चिंचवडमध्ये ८ ते ९ जागा मिळाव्यात, अशी आमची अपेक्षा आहे. महायुतीच्या विशेषतः आमची नैसर्गिक युती असलेल्या भाजपाच्या स्थानिक नेत्यांनी आमच्या स्थानिक नेत्यांशी निवडणुकीसंदर्भात चर्चा करून आम्हाला योग्य प्रतिनिधित्व द्यावे. या संदर्भात मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याशी चर्चा करणार आहे. पुणे महापालिकेसाठी २० प्रभागांची यादी पक्षाने तयार केली असून, ती भाजपाकडे सोपवण्यात आली आहे. ज्येष्ठ मंत्री चंद्रकांत पाटील आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे ही यादी देण्यात आली आहे.

समाधानकारक जागा न मिळाल्यास इतर पक्षांशी युती करण्याची शक्यताही आठवलेंनी बोलून दाखवली. ते म्हणाले की, भाजपा, शिवसेना (शिंदे गट) आणि अजित पवारांची राष्ट्रवादी हे तिघेही सत्तेत एकत्र आहेत. मात्र नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांत ते आपापली ताकद दाखवण्याचा प्रयत्न करत आहेत. भाजपाने युतीबाबत निर्णय घेतला आणि आम्हाला समाधानकारक जागा मिळाल्या » पान ७ वर






## विराटचे ५२ वे शतक तेंडुलकरचा विक्रम मोडला

**रांची -** भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात विराट कोहलीने ५२ वे शतक झळकावले. त्याने एकदिवसीय सामन्यातील सचिन तेंडुलकरचा ५१ शतकांचा विक्रम मोडला. याच सामन्यात रोहित शर्माने पाकिस्तानच्या शाहीद आफ्रिदीचा ३५१ षटकारांचा विक्रम मोडला.



# धारावी पुनर्वसन प्रकल्पाला प्रदूषणावरून पालिकेची नोटीस

■ मुंबई

**मुंबईचा** हवा गुणवत्ता निर्देशांक दिवसेंदिवस धोकादायक पातळी ओलांडत असताना बहुचर्चित अदानीच्या धारावी पुनर्वसन प्रकल्पामध्ये पालिकेच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट झाले आहे. याबाबत पालिकेच्या पर्यावरण नियंत्रण भरारी पथकाने येथील कार्यस्थळाची पाहणी करून अहवाल सादर केला आहे. पालिकेने कठोर पावले उचलत धारावी पुनर्वसन प्रकल्पाला थेट नोटीस बजावली आहे. मात्र, नोटीस बजावल्यानंतरदेखील येथे नियमबाह्य कामे सुरू असल्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

शिवसेनेचे धारावी विधानसभा समन्वयक रीडन फर्नांडो यांनी याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार केली होती. महापालिकेच्या जी-उत्तर विभाग कार्यालयाने त्याची दखल घेऊन प्रदूषण नियंत्रण भरारी पथकाने येथील कार्यस्थळांची पाहणी केली. तेव्हा त्यांना माटुंगा लेबर कॅम्प परिसरात अँटी-स्मॉग गन, ग्रीन नेट, टायर धुण्याची सुविधा आणि प्रदूषण मॉनिटर डिस्प्ले बोर्ड यांसारख्या आवश्यक मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन होत असल्याचे » पान ७ वर

# एसआयआरची मुदत ७ दिवसांनी वाढवली

■ नवी दिल्ली

**केंद्रीय** निवडणूक आयोगाने १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी मतदार याद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणीची (एआयआर) मुदत ७ दिवसांनी वाढवली. निवडणुकांसाठी मतदार याद्या अधिकाधिक निर्दोष बनवण्याच्या उद्देशाने आयोगाने ही मुदतवाढ केली. या कामात बूथ लेव्हल अधिकाऱ्यांवर कामाचा ताण जास्त असल्याने त्यांच्या आत्महत्येची प्रकरणांची चर्चा सुरू असताना हा निर्णय घेण्यात आला. विशेष सखोल फेरतपासणीमध्ये अंदमान-निकोबार द्विपसमूह, छत्तीसगड, गोवा, गुजरात, लक्षद्विप, मध्य प्रदेश, पुदूचेरी, राजस्थान, तामिळनाडू, उत्तर प्रदेश व प.बंगालचा समावेश आहे. १६ डिसेंबरला आयोग प्रारूप मतदार याद्या जाहीर करणार आहे. त्यावर तक्रारी किंवा दावे करण्यासाठी १६ डिसेंबर ते १५ जानेवारी २०२६ एवढा कालावधी देण्यात आला आहे.

# प्रभादेवीत उबाठा-शिंदेसेनेत राडा
## शाखेसमोर शेड लावण्यावरून वाद

■ मुंबई

**शिवसेना** शाखेसमोर शेड लावण्यावरून आज प्रभादेवी येथे उबाठा आणि शिंदे शिवसेनेचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले. त्यामुळे परिसरात तणाव निर्माण झाला होता. यावेळी मध्यस्थीसाठी आलेले माजी आमदार सदा सरवणकर यांचे पुत्र माजी नगरसेवक समाधान सरवणकर यांनाही स्थानिक उबाठा कार्यकर्त्यांनी विरोध केला. ते पाहून सरवणकर यांनी तेथून काढता पाय घेतला. पोलिसांनी वेळीच मध्यस्थी केल्यामुळे येथे होणारा मोठा राडा टळला.

प्रभादेवी येथील साई सुंदर नगरमध्ये शिंदे शिवसेनेची शाखा आणि तात्पुरते जनसंपर्क कार्यालय स्थापन करण्यात आले आहे. या शाखेसमोर शिंदेंच्या कार्यकर्त्यांकडून

### पोलिसांची मध्यस्थी

कायमस्वरूपी शेड बांधण्याचे काम केले जात होते. त्यावरून रविवारी उबाठा व शिंदे शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाली. या शेडमुळे आपत्कालीन काळात अडचण निर्माण होऊ शकते असे स्थानिक उबाठा कार्यकर्त्यांचे म्हणणे होते. वाद अधिकच वाढू लागल्याने मध्यस्थीसाठी येथील माजी नगरसेवक समाधान सरवणकर इथे आले होते. मात्र त्यांना स्थानिकांनी जोरदार विरोध केला. विरोध वाढू लागल्याने सरवणकर यांनी तेथून काढता पाय घेतला. दरम्यान, केवळ एका इमारतीचा हा विषय होता. काहींना शेड हवी होती, तर काहींना नको. पण एका विशिष्ट पक्षाच्या नगरसेवक होण्यास इच्छुक असलेल्या कार्यकर्त्याने रात्रीपासून येथे लोकांमध्ये भांडण लावून दिले, असे समाधान सरवणकर म्हणाले.

# मुंबईत आजपासून घरोघरी जात मतदारयादी पडताळणी होणार

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकाची प्रभागनिहाय प्रारूप मतदारयादी अधिकाधिक अचूक बनवण्यासाठी उद्यापासून 'घरोघरी पडताळणी मोहीम' सुरू करण्यात येणार आहे. विरोधी पक्षांनी दुबार मतदार, चुकीचे पत्ते, मतदारांचे स्थलांतर यासारख्या तक्रारी केल्यानंतर पालिका प्रशासनाने ही विशेष मोहीम हाती घेतली आहे.

पालिकेचे निवडणूक अधिकारी आणि कर्मचारी प्रत्यक्ष घरोघरी, वसाहती, गृहनिर्माण संकुल (सोसायटी) आणि इमारतींमध्ये जाऊन स्थळ पाहणी तसेच मतदारांशी थेट संपर्क साधून मतदारयादीची माहिती पडताळणार आहेत. या कामासाठी महापालिका क्षेत्रातील सर्व मतदार आणि गृहसंकुलाचे अध्यक्ष/सचिव यांनी निवडणूक अधिकारी/कर्मचारी यांना पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन पालिका आयुक्त तथा जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी केले आहे.

गगराणी यांनी असे आवाहन केले की, या पडताळणी मोहिमेदरम्यान मतदारांनी आपल्या मतदारयादीतील संभाव्य चुका, जसे की लेखनिकाच्या चुका किंवा इतर त्रुटी आढळल्यास त्याबद्दलची माहिती » पान ७ वर

# संसदेचे हिवाळी अधिवेशन आजपासून
## 'एसआयआर'वरून गोंधळाचे संकेत

■ नवी दिल्ली

**संसदेचे** बहुप्रतिक्षित हिवाळी अधिवेशन उद्यापासून सुरू होत आहे. १९ दिवसांच्या या अधिवेशनात



एकूण १५ दिवस कामकाज होणार आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सर्वपक्षीय नेत्यांशी चर्चा करून अधिवेशन सुरळीत पार पडावे, यासाठी सहकार्याची मागणी केली. पण, मतदारयाद्यांच्या विशेष सखोल फेरपडताळणी (एसआयआर) मोहिमेवरून गदारोळाचे संकेत आहेत.

आज झालेल्या सर्वपक्षीय बैठकीला पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमीप्रमाणे आले नाहीत. गृहमंत्री अमित शहा, काँग्रेस नेते जयराम रमेश, तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी बैठकीला हजर होते. दुसरीकडे, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी विरोधी पक्षांची रणनीती ठरवण्यासाठी इंडिया आघाडीच्या नेत्यांची उद्या सकाळी १० वाजता बैठक बोलावली आहे. » पान ७ वर

# लंडन शहरातही लोक पान खाऊन थुंकतात



**पान-गुटखा खाऊन वाट्टेल तिथे थुंकणे हा भारतीयांचा स्थायी भाव. राजधानी दिल्ली, मायानगरी मुंबईसह देशातील सर्वच शहरांतील रस्ते, फूटपाथ, रेल्वे स्थानकांवरील कोपरे पान-गुटख्याच्या पिचकाऱ्यांनी रंगलेल्या असतात.**

**सर्वसामान्य** भारतीयांना याचे फारसे काही वाटत नाही. पण आता पान खाऊन इतस्ततः थुंकणे ही भारतीयांची मक्तेदारी राहिलेली नाही. साहेबांच्या देशातील लंडन शहरातील रस्त्यांवरही पानाच्या पिचकाऱ्या दिसू लागल्या आहेत. लंडनच्या ब्रेंट कौन्सिलच्या रस्त्यांवर, फुटपाथवर लाल डाग दिसत आहेत. लंडनवासियांना मात्र ही फार गंभीर समस्या वाटू लागली आहे. अशाप्रकारे पान खाऊन थुंकणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे धोरण आखण्याचा निर्णय ब्रेंट कौन्सिलने » पान ७ वर

# हायकोर्टाच्या आदेशामुळे नेत्यांवरील खटले सुरू

■ मुंबई

**मुंबई** उच्च न्यायालयाने दिलेल्या सक्त आदेशानंतर आता विशेष खासदार-आमदार न्यायालयात राजकीय नेत्यांवरील काही प्रलंबित खटल्याची सुनावणी आता सुरू करण्यात आली आहे.

मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर आणि न्या. एन. जे. जमादार यांच्या खंडपीठाने १५ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र, गोवा आणि केंद्रशासित प्रदेश दादरा-नगर हवेली येथील आजी-माजी आमदार-खासदारांविरुद्ध दाखल असलेल्या फौजदारी गुन्ह्यासंबंधीच्या ५०० खटल्यांची सुनावणी १९ डिसेंबरपर्यंत सुरू करा, अशी कालमर्यादा घालून दिली आहे. न्यायालयाच्या या आदेशानंतर विशेष खासदार-आमदार न्यायालय वेगाने कामाला लागले आहे. » पान ७ वर


॥ ॐ श्री साईनाथाय नमः ॥ ॥ श्री गणेशाय नमः ॥ ॥ जय गुरुदेव ॥

श्री रत्नाकर महाराज संस्थान विश्वस्तव्यवस्था

नोंदणी क्रमांक E - 0013614 (THN) दिनांक 09-02-2024

पॅन नंबर ABITS5574Q ईमेल : ratnakarmaharajsansthan@gmail.com

श्री रत्नाकर महाराज गोसंवर्धन चॅरिटेबल विश्वस्तव्यवस्था

नोंदणी क्रमांक E - 0013613 (THN) दिनांक 09-02-2024

पॅन नंबर ABITS5575R ईमेल : ratnakarmaharajgosanvardhan@gmail.com

साधना भुवन, मु.पो.इंदगाव, ता.अंबरनाथ, जि.ठाणे-४२१५०३ www.sadhanabhuvan.com

संस्थापक - अध्यक्ष - प.पु.सदगुरू श्री ओमकार महाराज रत्नाकर

संस्नेह निमंत्रण

५३ वी श्री दत्तजयंती महोत्सव सोहळा

दिनांक. २ डिसेंबर २०२५ ते दिनांक ४ डिसेंबर २०२५

सर्व साई व दत्त भक्तांना कळविण्यात अत्यंत आनंद होतो की मंगळवार दिनांक २.१२.२०२५ ते गुरुवार दिनांक ४.१२.२०२५ पर्यंत श्री दत्तजयंती महोत्सव साजरा करण्यात येत आहे.

त्या निमित्ते

प.पु.सदगुरू श्री नाना महाराज रत्नाकर व प.पु.सदगुरू श्री नरेश महाराज रत्नाकर

यांच्या आशिर्वादाने व वेदमूर्ती श्री भाग्योदय पाठक गुरुजी, कल्याण आणि श्री संतोष विठ्ठल रत्नाकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार दिनांक २.१२.२०२५ ते बुधवार दिनांक ३.१२.२०२५ पर्यंत श्री दत्त याग स्वाहाकार आयोजित केला आहे.

इतर कार्यक्रम

श्री गुरुचरित्र, श्री नवनाथ भक्तीसार व श्री नाना महाराज रत्नाकर चरित्रामृत पारायण

मंगळवार दिनांक २.१२.२०२५ = हरिपाठ, भजन, कीर्तन (पंचक्रोशितील ग्रामस्थ व शिष्य परिवार, संध्याकाळी ५ ते १० पर्यंत)

बुधवार दिनांक ३.१२.२०२५ = हरिपाठ, भजन, कीर्तन (पंचक्रोशितील ग्रामस्थ व शिष्य परिवार, संध्याकाळी ५ ते १० पर्यंत)

गुरुवार दिनांक ४.१२.२०२५

१-श्री साईबाबांच्या व श्री दत्त महाराजांच्या पादुकांची भव्य पालखी सोहळा मिरवणूक दुपारी १.०० ते सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत

२-ह.भ.प. सौ. योगीताताई गणेश थरकुडे.(रायगड भूषण),मु -सोलनपाडा (कर्जत) यांचे दत्त जन्माचे सुश्राव्य कीर्तन सायंकाळी ५ ते ६.४०

३-सायंकाळी ६.४० वाजता दत्तजन्म सोहळा व मार्गदर्शन

४-सकाळी १० वाजल्यापासून ते रात्री १० वाजेपर्यंत महाप्रसाद वाटप

५-श्री दत्त जयंती निमित्ते रक्तदान शिबिर आयोजित केले आहे.(सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत)

प्रमुख उपस्थिती

माननीय कार्यसम्राट आमदार श्री किसनरावजी कथोरे साहेब (प्रमुख आधारस्तंभ)

माननीय श्री वामनरावजी बारकू म्हात्रे साहेब

व

पंचक्रोशितील सर्व मान्यवर

सूचना

- पारायणसाठी येताना आपले सर्व साहित्य सोबत घेऊन येणे (पाट,चौरंग,आसन,पोथी, अंथरूण-पांघरुण इतर). गुरुस्थानवरुन फक्त आशिर्वाद आणि प्रसाद मिळेल.

- पाल्यांनी आपल्या मुलांनी दंगा मस्ती करणार नाही आणि कार्यक्रमाची शिस्त पाळतील याची काळजी घेणे. - कार्यक्रमातील बदल हे ट्रस्ट आणि सरकारी आदेशानुसार करता येतील.

Details for sending Seva Donation by NEFT/Net Banking/Gpay

Shri Ratnakar Maharaj Sansthan Trust AC.No 924020017270215 Axis Bank Badlapur Branch IFSC Code UTIB0001342

Shri Ratnakar Maharaj Gosanvardhan Charitable Trust AC.No 924020017095001 Axis Bank Badlapur Branch IFSC Code UTIB0001342

माननीय श्री.बारकू एकनाथ कदम ,अध्यक्ष (श्री रत्नाकर महाराज संस्थान गुरुबंधू सेवा समिती)

माननीय श्री.सुबोध सूर्यकांत गडदे (मुख्य सूत्रसंचालक) माननीय श्री.किरण (भाऊ) शिवाजी राऊत (प्रमुख सल्लागार)

माननीय श्री.जयेश मदन नाचणे (मुख्य सूत्रसंचालक) माननीय श्री.यशवंतराव (भाऊ) भोपी (प्रमुख सल्लागार)

आपले स्नेहांकित

संस्थापक - अध्यक्ष - प.पु.सदगुरू श्री ओमकार महाराज रत्नाकर

श्री. सूर्यकांत धोंडू नांडीवडेकर (विश्वस्त) / सौ. स्नेहल सुग्रीव धपाटे (विश्वस्त)

श्री.हेमंत उत्तम वालावलकर (विश्वस्त) / श्री.शैलेश मधुकर चितोडकर (विश्वस्त) / श्री.प्रसाद पद्माकर धारगळकर (विश्वस्त)

सर्व साई व दत्त भक्तांनी परिवारासह मित्रमंडळीसह उपस्थित राहून दर्शनाचा व प्रसादाचा व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा.

संपर्क : साळुंखे :८६००२३२५१५ / चितोडकर :९८२०७७३७३१ / वालावलकर :९६५३४५४४४७

# छोट्या जाहिराती

संपर्क करा ८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर / जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी 'बायका/मुली' पाहिजेत. पगार 18,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007 / 9892575886** दादर वेस्ट {NC252877}

गोरेगाव पूर्वसाठी डिलिव्हरीबॉईज/गर्ल्स पाहिजेत. (बाईकर्स/नॉन बाईकर्स) पार्ट/फुलटाईम. फ्री लाईन्स. पगार 17,000/- ते 19,000/- संपर्क - **8169014720 / 9967860199** {NC253173}

होम टू होम सेल्स कामासाठी मुली/महिलांची आवश्यकता (वयमर्यादा 19 ते 50) क्षेत्र- नवी मुंबई, ठाणे, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, बदलापूर, अंबरनाथ, पनवेल, मीरा-भायंदर कामाची वेळ - 5 तास. पगार 450 (Per Day) मोबाईल नंबर :- **8850107299 / 8850254970/ 7900098574** {NC253179}

भायखळा/माझगाव विभागात कुरिअर डिलिव्हरीसाठी कमिशनवर मुले/मुली पाहिजे. (Daily Payment) **8828077636** {NC253187}

पेस्ट कंट्रोल कामासाठी बोरिवली/वसई ऑफिस टेक्निशियन/सेल्ससाठी मुले/मुली पाहिजे. **9867801212** {NC253132}

बालाजी पेस्ट कंट्रोल कंपनीसाठी टेक्निशियन पाहिजेत पगार 17000/- कांदिवली पश्चिम : **9769723507** {NC253138}

बँकेच्या रिकव्हरी कामासाठी मुले व मुली टेलिकॉलर पाहिजेत विजय - **9930443090.** {NC253175}

घरातील रुग्णाची काळजी घेण्यासाठी ब्युरोमध्ये अनुभवी आया 12 तासांसाठी वेस्टर्न लाईनसाठी पाहिजे. फक्त दिवसपाळी पगार 21,000/- **9322463312** {NC253040}

## पाहिजेत

इमिटेशन पॅकिंगसाठी मुलगी/लेडीज़ पाहिजे.-रोजचा 350/. Malad- **8691845288 / 9167433318** {NC253148}

इमिटेशन ज्वेलरीच्या कामासाठी मुलगी पाहिजेत. स्टेशन जवळ, मालाड ईस्ट.- **9821659991.** {NC253158}

लॅमिनेशन आणि पंचींगसाठी माणूस पाहिजे. Mob. :- **9820911021 / 9819177248 / 9821180906** {NCC250094}

मुंबईत हॉटेलसाठी कामगार पाहिजे. किचन हेल्पर, मोरीवाला, चांगला पगार राहणे-खाणे मोफत संपर्क - **7021388264 / 8097558062** {NC253203}

**उमरगाव - GIDC येथे हेडलबर्ग प्रिंटींग मशीनसाठी संपुर्ण टिम पाहिजे. 9820039302.** {NC253201}

परेल येथे ऑफिससाठी फ्रेशर्स ऑफिस असिस्टंट आणि मार्केटिंगसाठी पाहिजेत. **9920053121** {NC253196}

मीरारोड येथील फॅक्टरीमध्ये पत्र्याचे पार्ट्स बनवण्यासाठी पॉवरप्रेस मशीन चालवणारे 1-2 वर्षाचा अनुभव असलेले प्रेस ऑपरेटर पाहिजेत. CONTACT - **9820284880** {NC253197}

पेस्ट कंट्रोल ऑपरेटर्स पाहिजेत. आकर्षक पगार संपर्क करा. **9869110510 / 9820875253** {NC253206}

ग्रँटरोड पश्चिमे कडील उच्चभ्रू सोसायटीसाठी मुले मुली हाऊसकिपिंग पाहिजेत. पगार १४००० आणि इतर सवलती संपर्कः जाधव सर **9082792645 / 8329883194** {NC253210}

इमिटेशन कंपनीमध्ये कामासाठी मुली/मुले पाहिजेत. वय पस्तीसपर्यंत सांताक्रुझ पूर्व स्टेशनजवळः **9819999006** {NC252890}

## पाहिजेत

लोअरपरेल पगार 18000 (सुट्टी नाही), वेळ 8 ते 5, PF, ॲडव्हान्स, बोनस, ट्रेनपास, बस भाडे, ओव्हर टाईम, इन्सेन्टिव्ह मिळेल, बिल्डिंगवरील टाक्याची साफसफाई करण्यासाठी गरजू आणि मेहनती युवकांसाठी, वय 40 पर्यंत. **9320080200 / 9821819036** {NC253143}

इलेक्ट्रॉनिक्स कंपनीत मुली पाहिजेत. प्रत्यक्ष भेटा - युनीट नं. 329, सरीता प्रभात इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, दहिसर टोलनाका जवळ, **022-49619149** {NC253147}

वसई / मालाडमध्ये हॅन्डप्रेसच्या कामासाठी मुले / मुली पाहिजेत प.18000/- **9326440872.** {NC253150}

**वांद्रे (पूर्व), लहान मराठी कुटुंबात २४ तास रहाण्यासाठी थोडी सुशिक्षित बाई पाहिजे. घरातील इतर कामासाठी मदतनीस बाई आहे. कुटुंबातील व्यक्तीप्रमाणे वागणूक मिळेल. चांगला स्वभाव जातीची अट नाही. संपर्क - 9082460918** {NC253181}

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) राहण्याची - खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC253037}

पाहिजेत भांडूप कोपरखैरणे येथे प्रिंटिंग प्रेसमध्ये बॉयलर, फिडरमन, हेल्पर संपर्क - **9820542141, 9820433552** {NC253134}

घरकामासाठी व ऑफिससाठी बिनापाश बाई पाहिजे. 40,000/- पगार **9594503777** {NC253189}

1 वर्षाच्या बाळाला घरी सांभाळण्यासाठी मुलगी/बाई पाहिजे. मोबाईल - **9867755709** {NC253188}

ड्रायव्हर पाहिजेत - कॉल सेंटर, ओला उबेरसाठी. मुंबई, ठाणे, नवी मुंबई; टीआर लायसन्स आवश्यक. संपर्कः **9920925129** {NC253213}

वाशी ऑफिससाठी हाऊसकिपिंगची मुले पाहिजेत. आकर्षक पगार :- दिपक : **9321022969 /** मंगेश : **7045908864** {NC253208}

पाहिजेत १. प्रीप्रेस ऑपरेटर २.पंचिग मशीन ऑपरेटर ३. कटिंग मशीन ऑपरेटर-४५ इंच पोलर ४. फॉइलिंग मशीन ऑपरेटर (मॅन्युअली) ५. बाइंडिंग वर्क्स (गॅली मेकिंग/ बुक बाइंडिंग) मोबाईलः- **8928498961/ 9821094307** {NC253228}

चर्चगेट येथील ऑफीसमध्ये हाऊसकिपींग, प्युन आणि डिलीव्हरीच्या कामासाठी मुलगा पाहिजे, पगार 12000 ते 15000, ड्युटी 9 ते 6, जवळ राहणाऱ्या व्यक्तीला प्राधान्य. संपर्क- **8655290733** {NC253218}

मुंबईमध्ये पेशंटकेअरसाठी मुले, मुली, पुरुष, बायका पाहिजेत. पगार (24,000-75,000) **9820628009/ 9833470199** {NC253224}

## पाहिजेत

ठाण्यातील प्रा.लि. कंपनीला विविध पदांसाठी दहावी, बारावी, पदवीधर पास/नापास ३० मुले/मुली कायमस्वरुपी पाहिजेत. (फ्रेशर्सना प्राधान्य) प्लेसमेंट नाही. पगार 15000-45000/- **7021534944/ 9819778053** {NC253226}

मुली - हाउसकीपिंग, रिसेप्शनिष्ठ, सिक्युरिटी, पॅकिंग. 103,निर्मलाधाम, प्रभातनगर, गांवदेवी मैदान, ठाणे वेस्ट **7304179292** {NC253225}

## Situation Vacant

Helper ITI / 12th Pass For Chembur based Electrical Company Rs15000/ pm WhatsApp Biodata **9892653232** {NC253091}

Need Delivery boy in Santacruz West for all over Mumbai Contact :- **9987976412** {NC253180}

Sales/Godown Manager required for Wine Shop at Wadala West, with Good with addition/ totalling. Contact: **9987285116**/ WhatsApp {NC253227}

Electronic Instrument Mfg company requires person for assembly of Electronic Instruments on job work basis, interested person can contact Krupa Bhawsar Mob: **9321021411** {NC253219}

## व्यवसाय विषयक

सुवर्णसंधी! स्वतःचा व्यवसाय करून दिवसा 3000/- कमविण्याची. अनिरुद्धा दादर - **9076403434** विरार **8652643434** {NC252948}

## सर्विसेस

दररोज 800 टिफिन पोहोचवले जातात सम्पूर्ण मुंबईत. 65 वर्ष किंवा त्यावरील वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना मोफत दुपारचे टिफिन पोहोचवले जातील. श्रीमती कुमुद हितेश चुनीलाल पोपटलाल गुटका प्रभादेवी **9819006404** फक्त व्होट्सॲप (फोन नाही) {NC253129}

## व्यसनमुक्ती

दारू, तंबाखू, सिगारेट सोडवा. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार व्यसनमुक्ती केंद्र - (दादर) - **7738770405** {NCC250080}

## फिल्म विषयक

महेश्वर फिल्म्स इंटरनॅशनल आगामी मराठी, हिंदी फिल्म सीरियल, अल्बमसाठी सर्व वयोगटातील नवीन कलाकारांसाठी योग्यतेअनुसार मौका (ऑडिशन / ट्रेनिंग) : **9136034519, 8369152017** {NC252990}


# अमेरिकेने अफगाणिस्तानच्या पासपोर्टवर व्हिसा देण्यास थांबवले

■ वॉशिंग्टन

**व्हाईट** हाऊसजवळ झालेल्या गोळीबारात नॅशनल गार्डच्या एका सैनिकाचा मृत्यू आणि दुसरा गंभीर जखमी झाल्यानंतर अमेरिकेत मोठी राजकीय उलथापालथ झाली आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या घटनेला दहशतवादी हल्ला म्हणून घोषित करत तात्काळ कठोर कारवाई केली आहे. ट्रम्प प्रशासनाने अफगाण पासपोर्ट धारकांना व्हिसा देणे थांबवले आहेत. त्यांच्या या घोषणेमुळे अमेरिकेच्या इमिग्रेशन धोरणावर एक नवीन वाद निर्माण झाला आहे.


अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांनी एक्सवरील एका पोस्ट करुन सांगितले की, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील परराष्ट्र विभागाने अफगाण पासपोर्टवर प्रवास करणाऱ्या सर्व व्यक्तींना व्हिसा देणे थांबवले आहे. आपल्या लोकांचे संरक्षण करणे हे अमेरिकेचे सर्वोच्च प्राधान्य आहे.

# लुव्र संग्रहालयाच्या तिकिटदरात ४५ टक्के वाढ

■ पॅरिस

**युरोपियन** युनियनबाहेरील येणार्या पर्यटकांसाठी पॅरिसमधील लूव्र संग्रहालयाच्या तिकिट दरात ४५ टक्क्यांची वाढ करण्यात आली. याची अंमलबजावणी १४ जानेवारी २०२६ पासून सुरू होणार आहे. संग्रहालयाच्या मंडळाने मंजूर केलेल्या या निर्णयामुळे संग्रहालयाचा महसूल २३ दशलक्ष अमेरिकन डॉलरपर्यंत वाढणार आहे.

आता पर्यटकांना संग्रहालयात प्रवेश करण्यासाठी ३२ पाउंड द्यावे लागतील, जे सध्याच्या दरापेक्षा अतिरिक्त १० पाउंड आहे. युरोपियन यूनियन, आइसलँड, लिकटेंस्टाईन आणि नॉर्वे येथील लोकांना जुन्या दराप्रमाणे तिकिट मिळणार आहे.



जगातील सर्वाधिक भेट दिलेल्या जाणार्या संग्रहालयाच्या अपुरी सुरक्षा व्यवस्था आणि जुन्या पायाभूत सुविधांमुळे हे तिकिट दर वाढवण्याचे पाऊल उचलण्यात आले. पर्यटकांना सेवा देण्यासाठी संग्रहालयाची क्षमता सुधारण्यासाठी बऱ्याच काळापासून मागणी केली जात आहे. जानेवारीमध्ये फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी संग्रहालयात सुधारणा करण्याची घोषणा केली होती.

देश विदेश

# केरळच्या राज्यपालांची चालढकल सर्वोच्च न्यायालयाची नाराजी

■ नवी दिल्ली

**केरळमधील** दोन विद्यापीठांच्या कुलगुरुंच्या नेमणुका राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांच्या चालढकलीच्या धोरणामुळे रखडल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली.

न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. के व्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर यासंबंधीच्या याचिकेवर सुनावणी झाली. कुलगुरुंच्या नियुक्तीसंबंधी सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश सुधांशू धुलिया यांनी सादर केलेला अहवाल राज्यपाल आर्लेकर यांनी अद्याप वाचलाही नाही, असे वकिलांनी न्यायालयाला सांगितले तेव्हा न्यायालयाने तीव्र संताप व्यक्त करत खडे बोल सुनावले.

सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीशाने दिलेला अहवाल म्हणजे साधीसुधी कागदपत्रे नाहीत. त्याकडे अशाप्रकारे दुर्लक्ष करता येणार नाही. राज्यपाल स्वतः एपीजे अब्दुल कलाम तंत्रज्ञान विद्यापीठ आणि युनिव्हर्सिटी ऑफ डिजिटल सायन्सेस, इनोव्हेशन अँड टेक्नॉलॉजीचे कुलपती आहेत. त्यांना याची जाणीव असली पाहिजे, अशा शब्दात न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. मुख्यमंत्री विजयन यांनी सादर केलेला हा अहवाल राज्यपालांनी का वाचला नाही, असा संतप्त सवाल न्यायालयाने राज्यपालांच्या वकिलांना केला.

# रेवडी संस्कृतीने देश उभा राहू शकत नाही! सुब्बारावांची टीका

■ नवी दिल्ली

**देशात** वाढत चाललेल्या रेवडी संस्कृतीवर रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डी सुब्बाराव यांनी कठोर शब्दात टीका केली आहे.मोफत योजना तुम्हाला निवडणुका जिंकून देतील, परंतु त्यातून देश उभा राहू शकणार नाही, अशा शब्दात सुब्बाराव यांनी आपले परखड मत मांडले.

मोफत योजना राबवताना राजकीय पक्षांनी जणू काही सर्व आर्थिक गणिते सामुहिकपणे बाजुला ठेवली आहे. या योजना बहुतांश कर्च काढून पूर्ण केल्या जातात.आजच्या उपभोगाचा भार उद्याच्या करदात्यांवर पडत असतो. हे या योजनांचे गंभीर परिणाम आहेत. सरकारने मोफत योजनांवर कर्ज काढून खर्च करत असल्यामुळे शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधा यांसारख्या क्षेत्रांमधील गुंतवणूक कमी होत जाते. प्रत्येक मोफत योजना ही राजकीय अपयशाची स्वीकृती आहे, असे सुब्बाराव यांनी म्हटले आहे.

# उत्तराखंडचे पर्यटन बहरणार 'मन की बात'मध्ये विशेष उल्लेख

■ नवी दिल्ली



**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी आज रेडिओवरील आपल्या मन की बात या कार्यक्रमामध्ये उत्तराखंड राज्याचा विशेष उल्लेख केला. उत्तराखंडमधील पर्यटन, साहसी क्रिडा स्पर्धा आणि आगामी हिवाळी क्रिडा स्पर्धांमुळे उत्तराखंडच्या पर्यटनाला बहर येणार आहे, असे मोदी म्हणाले.

आदि कैलासवर तीन वर्षांपूर्वी वर्षाला दोन हजार पर्यटक भेट देत होते. आता या ठिकाणी वर्षाला सुमारे ३० हजार पर्यटक येतात. उत्तराखंडची लोकप्रियता वाढू लागल्याचे हे लक्षण आहे. आदि कैलास, अल्ट्रा मॅरेथॉन आणि हिवाळी क्रिडा स्पर्धांमुळे पर्यटनाच्या क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध होणार आहेत, असे मोदी म्हणाले.

# चाकणमध्ये कंटेनरमधील ४० ई-स्कूटर आगीत खाक

■ चाकण

**चाकण**मध्ये आज पहाटे तळेगाव-चाकण रस्त्यावरील खराबवाडी गावाजवळ मोठा अपघात होता होता टळला. इंडियन ऑईल पेट्रोल पंपाजवळ डिझेल भरण्यासाठी आलेल्या मोठ्या कंटेनरला आग लागली. यात कंटेनरमधील ४० नव्याकोऱ्या इलेक्ट्रीक दुचाकी जळून खाक झाल्या. यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. कंटेनरमध्ये ४० नवीन इलेक्ट्रिक दुचाकी ठेवण्यात आल्या होत्या. डिझेल भरण्यासाठी चालक कंटेनर पंपाशेजारी उभा असताना एका नागरिकाने त्याला कंटेनरमधून धूर येत असल्याचे सांगितले. चालकाने दरवाजा उघडताच आगीच्या लाटा बाहेर पडल्या आणि काही क्षणातच कंटेनरमधील सर्व ई-स्कूटर जळून खाक झाल्या.

# पिंपरीत पावडर कोटिंग कंपनीत सिलिंडरचा स्फोट

**पिंपरी** - शहरातील भोसरी एमआयडीसी परिसरातील अंबिका पावडर कोटींग कंपनीमध्ये एलपीजी गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन आगीचा भडका उडाला. आगीत एक कामगार गंभीर तर पाच कामागार किरकोळ जखमी झाले.

घटनेची माहिती मिळताच पिंपरी-चिचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत आग नियंत्रणात आणली. या आगीत सुनील कुमार नावाचा कामगार भाजून गंभीर जखमी झाला आहे.तर दाऊ कुमार, सुद्दू जयस्वाल, सुरज जाटो, राहुल कुमार, रोहित कुमार हे कामगार किरकोळ जखमी झाले आहेत.

# पुण्यात २ महिन्यांत १५ बालविवाह रोखले

■ पुणे

**पुण्याच्या** ग्रामीण आणि शहरी भागात अजूनही बालविवाहाच्या घटना घडत आहेत. महिला व बालकल्याण विभागाकडून ऑक्टोबर महिन्यात ३ तर नोव्हेंबर महिन्यात १२ असे १५ बालविवाह दोन महिन्यांत रोखण्यात आले. यापैकी काहींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जिल्हा महिला व बालकल्याण विभागाच्या अंतर्गत असलेल्या चाइल्ड हेल्पलाइनच्या आधारे हे बालविवाह रोखण्यात आले आहेत. यापैकी काही प्रकरणामध्ये बालविवाह प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हे दाखल केले आहेत. बालविवाह ही अजूनही समाजातील खोलवर रुजलेली बेकायदेशीर प्रथा आहे.अशा विवाहांमुळे मुलींच्या आरोग्यावर, शिक्षणावर आणि संपूर्ण आयुष्यावर गंभीर परिणाम होतात. त्यामुळे बालविवाह करणे किंवा प्रोत्साहन देणे हा कायद्याने गंभीर गुन्हा मानला जातो. यातील सर्वात धक्कादायक घटना इंदापूर तालुक्यात घडली. एका घरात नातेसंबंधातील तीन अल्पवयीन मुलींचे विवाह एकाच दिवशी सुरू होते. याबाबत माहिती मिळताच चाइल्ड हेल्पलाइनच्या पथकाने ग्रामसेवक आणि स्थानिक पोलिसांसह तात्काळ घटनास्थळी धाव घेत तीनही विवाह थांबवले.

# आजचे राशी भविष्य



सोमवार दि. १ डिसेंबर २०२५

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | कुटुंबाची साथ मनाचा उत्साह वाढवेल. व्यावसायिक उलाढाली करताना सावधगिरी बाळगा. वादाचे प्रसंग टाळावेत. |
| वृषभ | कार्यक्षेत्रामध्ये नवीन संधी मिळेल. जोडीदाराचा सल्ला उपयोगी पडेल. मित्रपरिवाराबरोबर सहलीचा आनंद घ्याल. |
| मिथुन | वाढलेल्या जबाबदारीस न्याय देऊ शकाल. कौटुंबिक व्यवसायात यश मिळेल. विरोधकांवर नियंत्रण ठेवू शकाल. |
| कर्क | श्रमाला भाग्याची साथ मिळेल. नेतृत्वकौशल्य सिद्ध करू शकाल. गृहसजावटीच्या योजना आखल्या जातील. |
| सिंह | घरातली जबाबदारी टाळता येणार नाही. आक्रमक स्वभाव नियंत्रणात ठेवावा. मुलांचे हट्ट पुरे करावे लागतील. |
| कन्या | सकारात्मक विचार व मनाचा उत्साह तुम्हाला बळ देईल. प्रवासातून फायदा होईल. आर्थिक व्यवहार करताना सतर्क रहा. |
| तूळ | घरातील ज्येष्ठांच्या आरोग्याची काळजी घ्या. कार्यक्षेत्रातील विरोधकांवर मात करण्यात यश येईल. तुमचे म्हणणे सौम्य शब्दात मांडा. |
| वृश्चिक | आळस झटकून नियोजित कामे वेळेवर करा. विनाकारण खर्च टाळावा. पुढाकार घेऊन तुमच्या कामाचा वेग वाढवा |
| धनु | मनामध्ये असलेली भीती नियंत्रणात ठेवा. आर्थिक व्यवहारात विशेष काळजी घ्या. कलाकारांना नवीन संधी मिळेल. |
| मकर | जोडीदाराबरोबर प्रवास कराल. नोकरदारांना वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. नवीन व्यवहार करताना कायदेतज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्या. |
| कुंभ | नोकरदारांच्या कामाची योग्य प्रकारे दखल घेतली जाईल. सामाजिक कार्यामुळे प्रसिद्धी मिळेल. आर्थिक लाभ होणार आहे. |
| मीन | मनातल्या इच्छा पूर्ण कराल. नियोजित कामे पूर्ण करण्यासाठी मनाची जिद्द उपयोगी पडेल. प्रियजनांचा सहवास आनंद देईल. |

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी रवि विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 48 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 30/11/2025

पहिले बक्षिस रु. 10,000/- : **GL-04 : 3966**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0056 | 0149 | 1292 | 2072 | 5259 | 6084 | 6181 | 7025 | 7308 (श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई) | 9619 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0476 | 0778 | 3235 | 5635 | 6287 | 6435 | 7116 | 7260 | 9142 | 9850 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1230 | 2061 | 2460 | 2796 | 3439 | 6394 | 8658 | 9069 | 9104 | 9347 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1732 | 2791 | 3032 | 3741 | 5461 | 5983 | 6577 | 8805 | 8953 | 9190 |

सहावे बक्षिस रु. 100/- — सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1722 | 2525 | 3440 | 4421 | 5195 | 5832 | 6622 | 7545 | 8382 | 9119 |
| | | 1780 | 2561 | 3453 | 4426 | 5204 | 5845 | 6639 | 7644 | 8429 | 9256 |
| 0021 | 0660 | 1790 | 2562 | 3469 | 4430 | 5254 | 5886 | 6641 | 7647 | 8486 | 9292 |
| 0043 | 0713 | 1802 | 2620 | 3534 | 4523 | 5265 | 5901 | 6644 | 7679 | 8494 | 9308 |
| 0060 | 0740 | 1810 | 2826 | 3543 | 4535 | 5267 | 5905 | 6646 | 7708 | 8509 | 9309 |
| 0067 | 0909 | 1917 | 2858 | 3550 | 4619 | 5355 | 5959 | 6682 | 7725 | 8536 | 9354 |
| 0074 | 0911 | 1971 | 2916 | 3560 | 4649 | 5428 | 5988 | 6685 | 7738 | 8586 | 9360 |
| 0077 | 0944 | 2010 | 2925 | 3587 | 4695 | 5445 | 6045 | 6716 | 7745 | 8686 | 9364 |
| 0123 | 1053 | 2021 | 2961 | 3802 | 4711 | 5458 | 6061 | 6719 | 7788 | 8704 | 9365 |
| 0177 | 1098 | 2082 | 3032 | 3843 | 4716 | 5475 | 6066 | 6906 | 7818 | 8708 | 9414 |
| 0249 | 1117 | 2122 | 3078 | 3860 | 4723 | 5478 | 6165 | 6917 | 7833 | 8713 | 9494 |
| 0264 | 1145 | 2128 | 3106 | 4004 | 4744 | 5507 | 6207 | 6933 | 7923 | 8742 | 9501 |
| 0307 | 1190 | 2221 | 3117 | 4026 | 4768 | 5543 | 6292 | 6935 | 7977 | 8845 | 9605 |
| 0330 | 1216 | 2225 | 3139 | 4030 | 4793 | 5566 | 6304 | 6957 | 7987 | 8847 | 9665 |
| 0369 | 1220 | 2232 | 3301 | 4046 | 4851 | 5583 | 6350 | 6980 | 8037 | 8907 | 9675 |
| 0370 | 1411 | 2271 | 3302 | 4059 | 4912 | 5610 | 6367 | 6998 | 8048 | 8910 | 9810 |
| 0408 | 1417 | 2290 | 3335 | 4066 | 4930 | 5662 | 6387 | 7028 | 8049 | 8947 | 9854 |
| 0438 | 1446 | 2302 | 3338 | 4076 | 5045 | 5716 | 6388 | 7079 | 8098 | 8988 | 9894 |
| 0601 | 1466 | 2409 | 3352 | 4109 | 5074 | 5743 | 6497 | 7175 | 8108 | 9039 | 9914 |
| 0606 | 1488 | 2414 | 3370 | 4239 | 5158 | 5747 | 6536 | 7176 | 8189 | 9079 | 9929 |
| 0612 | 1524 | 2464 | 3383 | 4344 | 5166 | 5755 | 6600 | 7341 | 8267 | 9093 | 9943 |
| 0619 | 1573 | 2472 | 3390 | 4347 | 5171 | 5781 | 6608 | 7402 | 8328 | 9095 | 9959 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जवाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी वैभव विकली लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 48 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 30/11/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MG-08 : 0742**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- : 6706

तिसरे बक्षिस रु. 2000/- : 7186

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0219 | 1231 | 2076 | 2195 | 2708 | 3062 | 3867 | 5029 | 7510 | 8101 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0072 | 0551 | 1625 | 2247 | 3265 | 3310 | 3650 | 8320 | 9005 | 9779 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0719 | 1793 | 2507 | 3917 | 4196 | 4731 | 5597 | 5938 | 6887 | 7500 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1847 | 2511 | 3394 | 4289 | 5115 | 5900 | 7079 | 7773 | 8978 |
| | | 1861 | 2527 | 3496 | 4354 | 5125 | 5992 | 7105 | 7807 | 8997 |
| | | 1869 | 2530 | 3518 | 4397 | 5158 | 6073 | 7119 | 7829 | 9009 |
| 0069 | 1130 | 1871 | 2720 | 3524 | 4401 | 5261 | 6233 | 7184 | 7985 | 9022 |
| 0078 | 1131 | 1911 | 2728 | 3553 | 4425 | 5293 | 6266 | 7242 | 8051 | 9096 |
| 0100 | 1168 | 1951 | 2842 | 3590 | 4490 | 5369 | 6269 | 7287 | 8063 | 9168 |
| 0102 | 1182 | 2020 | 2882 | 3593 | 4530 | 5455 | 6287 | 7317 | 8102 | 9178 |
| 0128 | 1191 | 2042 | 2952 | 3598 | 4534 | 5468 | 6366 | 7338 | 8188 | 9179 |
| 0130 | 1193 | 2057 | 2979 | 3753 | 4578 | 5474 | 6429 | 7511 | 8231 | 9369 |
| 0181 | 1214 | 2125 | 3144 | 3810 | 4641 | 5504 | 6505 | 7530 | 8268 | 9434 |
| 0226 | 1295 | 2127 | 3155 | 3835 | 4674 | 5506 | 6517 | 7540 | 8308 | 9469 |
| 0290 | 1318 | 2240 | 3171 | 3931 | 4682 | 5538 | 6525 | 7564 | 8408 | 9485 |
| 0511 | 1381 | 2242 | 3293 | 4043 | 4705 | 5548 | 6562 | 7576 | 8506 | 9528 |
| 0569 | 1411 | 2248 | 3313 | 4057 | 4748 | 5579 | 6630 | 7580 | 8566 | 9566 |
| 0609 | 1484 | 2252 | 3319 | 4075 | 4793 | 5617 | 6681 | 7587 | 8581 | 9579 |
| 0685 | 1554 | 2332 | 3322 | 4095 | 4844 | 5659 | 6691 | 7669 | 8648 | 9639 |
| 0750 | 1675 | 2352 | 3344 | 4147 | 4864 | 5726 | 6790 | 7691 | 8669 | 9738 |
| 0766 | 1722 | 2360 | 3351 | 4228 | 4887 | 5752 | 6820 | 7692 | 8754 | 9750 |
| 0806 | 1761 | 2389 | 3354 | 4241 | 5056 | 5756 | 6839 | 7702 | 8820 | 9829 |
| 0905 | 1784 | 2459 | 3383 | 4248 | 5061 | 5761 | 6880 | 7712 | 8876 | 9899 |
| 1011 | 1810 | 2502 | 3393 | 4274 | 5078 | 5800 | 6926 | 7758 | 8974 | 9985 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जवाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र मोहिनी विकली लॉटरी — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 48 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 30/11/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MO-05 : 8774**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 2004 | 3878 | 3946 | 6963 (हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा) | 8400 | 8971 | 8991 | 9163 | 9620 | 9901 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0126 | 1293 | 1975 | 2620 | 3338 | 4228 | 4760 | 5114 | 5586 | 7455 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0291 | 2710 | 2965 | 4297 | 5810 | 6904 | 8007 | 8062 | 9050 | 9510 |

पाचवे बक्षिस रु. 300/- — पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1047 | 2275 | 4040 | 4849 | 5820 | 6688 | 7960 | 9280 |
| | 1113 | 2542 | 4148 | 4855 | 5865 | 6976 | 7967 | 9315 |
| 0019 | 1141 | 2622 | 4158 | 4881 | 5895 | 6994 | 8179 | 9364 |
| 0050 | 1150 | 2649 | 4174 | 4894 | 5898 | 7079 | 8381 | 9556 |
| 0328 | 1363 | 3323 | 4243 | 4904 | 5985 | 7176 | 8485 | 9682 |
| 0334 | 1580 | 3357 | 4308 | 5007 | 6370 | 7178 | 8487 | 9684 |
| 0469 | 1592 | 3385 | 4321 | 5034 | 6383 | 7404 | 8873 | 9690 |
| 0512 | 1618 | 3577 | 4424 | 5302 | 6512 | 7564 | 8884 | 9696 |
| 0540 | 1728 | 3583 | 4437 | 5543 | 6532 | 7759 | 8948 | 9711 |
| 0573 | 2048 | 3734 | 4438 | 5575 | 6551 | 7797 | 8962 | 9722 |
| 0694 | 2079 | 3737 | 4514 | 5663 | 6618 | 7806 | 8991 | 9725 |
| 0904 | 2092 | 3808 | 4711 | 5812 | 6657 | 7877 | 9059 | 9772 |
| 0930 | 2240 | 3821 | 4847 | 5819 | 6669 | 7884 | 9181 | 9862 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जवाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी दि. ०१/१२/२०२५

| | | |
|---|---|---|
| ९ | ६ | ९ |
| १२ | ६२ | ९२ |
| १७ | ६७ | ९७ |
| १४६ | १६९ | १८० |
| ३८० | २४ | ३७९ |

# साक्री, शिरपूरमध्ये बिबट्याच्या भीतीने शेतकामांना मजूर मिळेना

■ धुळे

जिल्ह्यातील साक्री आणि शिरपूर तालुक्यात बिबट्याच्या हल्ल्यांच्या भीतीने शेतमजूर शेतात कामाला जायला घाबरत आहेत. त्यामुळे शेतीची कामे थांबली आहेत. या भागातील बिबट्यांच्या वाढत्या संख्येमुळे आणि हल्ल्यांमुळे ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले असून, शेतकऱ्यांना मनुष्यबळाची कमतरता जाणवत आहे.

प्रामुख्याने धुळे तालुक्यातील सडगाव शिवारात सध्या बिबट्याचा वावर वाढला आहे. वनविभागाने देखील या गावाला भेट देऊन आवश्यक नमुने घेतले आहेत. याच गावातील बापू धना मोरे यांच्या अजनाळे रस्त्यावरील शेतात गुरुवारी बिबट्याने एका गायीला आपले भक्ष्य केले. उपचार घेतांना दुसर्या दिवशी या गाईचा मृत्यू झाला. वन कर्मचाऱ्यांनी बिबट्याच्या पावलांचे ठसे व इतर पुरावे गोळा केले आहेत. विशेष म्हणजे बिबट्याच्या भीतीने शेतात काम करण्यासाठी कुणी मजुर मिळेना.

# पुण्यात बॉम्बने हॉटेल उडवण्याची धमकी

**पुणे-** कोरेगाव पार्क परिसरातील एका नामांकित पंचतारांकित हॉटेलला बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्याने खळबळ उडाली होती. हॉटेलच्या लँडलाईन क्रमांकावर हा धमकीचा कॉल आल्याने हॉटेल कर्मचारी आणि ग्राहकांमध्ये धावपळ सुरू झाली. याच प्रकरणातील आरोपीला अटक करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

शुक्रवारी दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास एका मोबाईल क्रमांकावरून हॉटेल प्रशासनाला फोन आला. फोन करणाऱ्या व्यक्तीने हॉटेलमध्ये बॉम्ब ठेवला आहे, तत्काळ हॉटेल रिकामे करा, अशी धमकी दिली.


**वाचकांना सूचना**


दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वत:च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

- मॅनेजर, 'नवाकाळ'

# शिरूरमध्ये मनसे पदाधिकारी अजित पवार गटात सामील

**प्रवेश करताच उमेदवारी जाहीर**

■ शिरूर



**पुणे** जिल्ह्यातील मनसेचे शिरूर तालुका संघटक अविनाश घोगरे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला. विशेष म्हणजे पक्षात प्रवेश करताच लगेच त्यांच्यावर विश्वास दाखवत शिरूर शहरातील प्रभाग क्रमांक १२ या हूडको वसाहत भागातून त्यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली.

हुडको वसाहतीतील अनेक नागरिकांची घरे आजतागायत त्यांच्या नावावर झालेली नाहीत. त्यामुळे निर्माण झालेल्या समस्यांवर उपाय म्हणून नागरिकांची घरे त्यांच्या नावावर करण्यासाठी शासन स्तरावर ठोस प्रयत्न करणार असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शिरूर येथील पाच कंदील चौकात झालेल्या जाहीर सभेत दिली. यासाठी स्वतः अजित पवार व आमदार माऊली कटके यांच्या माध्यमातून वेगवान पाठपुरावा होणार असल्याचे व हूडको वसाहतीच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव कटिबद्ध राहणार असल्याचे उमेदवार अविनाश घोगरे यांनी सांगितले. प्रभागातील प्रत्येक नागरिकांपर्यंत विकासाचा अजेंडा घेऊन सुरू असलेल्या त्यांच्या प्रभावी प्रचाराने घोगरे यांच्या उमेदवारीला चांगला प्रतिसाद मिळत असून, परिसरात त्यांच्या उमेदवारीचे कौतुक होत आहे.

# काही लोक माझ्या मरणावर टपलेत भाजपा आमदार भारसाकळेंचा दावा

■ अकोला

**स्थानिक** स्वराज्य संस्था निवडणुकांचा प्रचार आता शिगेला पोहोचला आहे. दावे-प्रतिदावे केले जात आहेत. भाजपा आमदार प्रकाश भारसाकळे यांनीही असाच एक धक्कादायक दावा केला आहे. कोरोना काळात काही राजकीय विरोधक आणि पक्षांतर्गत विरोधक माझ्या मरणावर टपले होते, असे भारसाकळे यांनी प्रचार सभेत बोलताना म्हणाले.



मला कोरोनाचा संसर्ग झाला होता. तेव्हा उपचारादरम्यान काही लोकांचा माझ्याविरोधात घातपाताचा प्रयत्न होता. मी अकोल्यातील एका रुग्णालयात उपचार घेत होतो. तेव्हा अचानक माझे जेवण बंद करण्यात आले. माझ्या कुटुंबियांना संशय आला. काही लोक माझ्या मरणाची वाट बघत होते. मात्र, जनतेच्या आशिर्वादाच्या बळावरच मी या संकटातून सुखरूप बाहेर पडू शकलो, असे भारसाकळे म्हणाले.

# मालवणात एकनाथ शिंदेंनी नारायण राणेंची भेट घेतली

■ मालवण

**कोकणात** भाजपा आणि महायुतीतील घटकपक्ष असलेल्या शिंदेंच्या शिवसेने वाद पेटल्याच्या पार्श्वभूमीवर आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाजपा नेते नारायण राणे यांची भेट घेतली. कोकणात शिंदेंच्या शिवसेनेला सोबत न घेता भाजपाने स्वबळाचा नारा दिल्यापासून शिवसेना आणि भाजपामध्ये तणाव वाढला आहे. शिवसेने आमदार आणि नारायण राणे यांचे पुत्र निलेश राणे गेले काही दिवस भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यावर उघडपणे टीका करत आहेत.त्यामुळे भाजपाचे नेते अस्वस्थ आहेत. या पार्श्वभूमीवर आज एकनाथ शिंदे आणि नारायण राणे यांच्या भेटील महत्व प्राप्त झाले. या भेटीत नेमकी काय चर्चा झाली हे समजू शकले नाही.




# पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्यास जगतापांचा विरोध

■ पुणे

**पुढील** काही दिवसांत होऊ घातलेल्या पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार अशी जोरदार चर्चा आहे. मात्र दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यास शरद पवार गटाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी ठाम विरोध केला आहे. त्यामुळे शरद पवार यांच्यासमोर पेच निर्माण झाला आहे.

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आल्यास आपण शहराध्यक्षपदासह पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचाही राजीनामा देणार, अशी भूमिका जगताप यांनी घेतली आहे. जगताप म्हणाले की, सध्या दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची चर्चा आहे. पण माझे मत स्पष्ट आहे. आम्ही महाविकास आघाडी म्हणून निवडणूक लढवणार. जर एकत्र येण्याची वेळ आली तर मी काही काळ राजकारणातून दूर होईन. माझे अजित पवार यांच्याबद्दल काहीही मत नाही. मी शरद पवार यांची पुरोगामी चळवळ बघून त्यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या अजित पवार भाजपासोबत आहेत. त्यांचे तिथे पटत नाही म्हणून त्यांना सोबत घेतले तर उद्या ते परत भाजपासोबत सत्तेत जाऊन बसतील, हे मला न पटणारे आहे. पुणेकर महायुतीवर नाराज आहेत.

# भारतीय जनता पार्टी हा बाटलेला पक्ष! मंत्री कोकाटेंचा आरोप

■ नाशिक

**भाजपा** हा पूर्णपणे बाटलेला पक्ष आहे, त्यांना फोडाफोडी करण्याशिवाय काहीच येत नाही, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री माणिकराव कोकाटे यांनी बोचरी टीका केली. क्रीडा मंत्री कोकाटे यांनी सिन्नर नगर परिषदेच्या प्रचारसभेत महायुतीतील मित्रपक्षावरच टीका केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

दरम्यान, महाविकास आघाडीकडून सातत्याने भाजपावर पक्षफोड्या अशी टीका केली जाते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या निमित्ताने सुरू असलेल्या राजकारणावर भाष्य करताना कोकाटे म्हणाले की, मी महाराष्ट्रात फिरत असताना पाहतो की, संपूर्ण राज्यात महायुतीमध्येच आपापसात लढाई सुरू आहे. निवडणुकीत संघर्ष हा युतीमध्येच आहे. विरोधी पक्ष तर कुठेच दिसत नाही. आपल्याकडे थोडासा उबाठा दिसतो. तोही बाटलेला आहे. भाजपा तर पूर्णपणे बाटलेला पक्ष आहे. भाजपाचे काहीच राहिलेले नाही. इकडून फोड, तिकडून फोड, फोडाफोडीमध्ये त्यांचे आयुष्य चालले. त्यांचे बिचारे जुने कार्यकर्ते घरी बसले आहेत. कोकाटे यांच्या या विधानावर भाजपाचे विधान परिषद



आमदार परिणय फुके यांनी तात्काळ पलटवार केला. रमी खेळून बोर झाले असतील, म्हणून आता ते भाजपावर टीका करत आहेत. त्यांनी स्वतःचा इतिहास तपासावा आणि आत्मचिंतन करावे, असे फुके यांनी सुनावले.

दरम्यान, माणिकराव कोकाटे यांचे वादग्रस्त विधान करण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी, विधानसभेत मोबाइलवर गेम

**भाजपाला फोडाफोडी शिवाय काहीच येत नाही**

खेळल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर त्यांचे कृषी खाते काढून घेण्यात आले होते. तसेच त्यांनी 'एक रुपयात पीक विमा' आणि शेतकरी कर्जमाफीवर केलेल्या विधानांमुळेही ते वादात अडकले होते.

# उदघाटन सोहळ्यात भाजपा व शिंदेसेना आमनेसामने

■ कल्याण

**महायुतीमधील** भाजपा आणि शिंदेसेना या मित्रपक्षांमध्ये मागील काही दिवसांपासून खटके सुरू आहेत. डोंबिवली शहरातील कुंभारखाण पाडा परिसरात गणेश घाट आणि रागाई मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या उद्घाटन सोहळ्यादरम्यान भाजपा आणि शिंदेसेनेचे कार्यकर्त्ये आमने-सामने आले. दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी शक्तीप्रदर्शन करत घोषणाबाजी केली. उद्घाटनाच्या कार्यक्रमाच्या काही दिवस आधीच भाजपातून शिंदे गटात प्रवेश केलेले माजी नगरसेवक विकास म्हात्रे आणि त्यांच्या पत्नी कविता म्हात्रे हे या ठिकाणी चर्चेचा केंद्रबिंदू ठरले.

या उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने भाजपाने मोठ्या प्रमाणात शक्तीप्रदर्शन केले होते. संपूर्ण परिसरात पक्षाचे बॅनर आणि झेंडे लावले होते.म्हात्रे दाम्पत्याच्या समर्थकांनीही या परिसरात मोठ्या प्रमाणात बॅनर आणि होर्डिंग्ज लावून आपले शक्ती प्रदर्शन केले होते.

या उद्घाटन समारंभाला सुरुवात होत असतानाच शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी विकास म्हात्रे आणि कविता म्हात्रे यांचे काही बॅनर व होर्डिंग्ज झाकल्याचा आरोप भाजपावर केला.

या प्रकारामुळे भाजपाचे कार्यकर्ते संतापले त्यांनी आक्षेप घेतला. बॅनर झाकल्याच्या घटनेनंतर दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक बाचाबाची सुरू झाली. भाजपा कार्यकर्त्यांनी शिंदेच्या कार्यकर्त्यांसमोर घोषणाबाजी सुरू केली. ज्यामुळे परिसरात तणाव निर्माण झाला.

# सांगोल्यात मत मागताना यावेळी आनंद! फडणवीसांचे वक्तव्य

**सोलापूर- सांगोल्यात** आधीही प्रचाराला येत होतो. मात्र माझे आदर्श होते, त्या दिवंगत गणपतराव देशमुख यांच्या विरोधात मला मत मागावे लागत होते. यावेळी मात्र, डॉ. बाबासाहेब देशमुख आणि आम्ही एकत्र लढत असल्याने हे मत मागताना मला खूप आनंद होत आहे, असे विधान मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. सांगोला नगर परिषदेत भाजपा-शेकाप उमेदवारांच्या प्रचारसभेत ते बोलत होते. निवडणुकीत भाजपवर 'विश्वासघात' केल्याची टीका गुवाहटीफेम, माजी आमदार शहाजी बापू पाटील यांनी केली होती. फडणवीसांबद्दलही नाराजी व्यक्त केली होती. दिवंगत गणपतराव देशमुख यांचे नातू आणि शेकाप आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी नगर परिषद निवडणुकीत भाजपाशी हातमिळवणी केली आहे.

# महाराष्ट्रात महायुतीचीच लाट! चिपळूणमध्ये शिंदेंचे वक्तव्य

■ रत्नागिरी

**राज्यात** आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महायुतीचीच लाट असून, विरोधकांनी पराभव मान्य केल्याचा दावा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. चिपळूण नगर परिषद निवडणुकीत भाजपा आणि शिंदे गट एकत्र लढत आहे. यानिमित्ताने शिंदेंनी महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार केला.

एकनाथ शिंदे म्हणाले की, राज्यात सर्वत्र फिरत असताना विरोधी पक्ष कुठेच दिसत नाही. विरोधकांनी शरणागती पत्करली असून त्यांनी आपला पराभव मान्य केला आहे. महाराष्ट्रातील जनता विकासाच्या बाजूने उभी राहत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही विरोधकांनी कोर्टात जाऊन थांबवण्याचा प्रयत्न केला, मात्र ती योजना कोणत्याही परिस्थितीत बंद होणार नाही.

मुख्यमंत्री असताना चिपळूणमध्ये आलेल्या भीषण पुराच्या वेळी तातडीने मदत पोहोचवल्याची आठवण शिंदेंनी करून दिली. तसेच चिपळूण शहराला आदर्श शहर बनवण्यासाठी महायुती कटिबद्ध असल्याचे सांगितले. नगर विकास विभागाकडून चिपळूण शहराच्या विकासासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, चिपळूणमधील पूररेषेच्या (निळी व लाल रेषा)



फेरसर्वेक्षण करून लोकांना न्याय दिला जाईल. कोळकेवाडी धरणातून पाणीपुरवठा, रस्त्यांचे आणि भुयारी गटार योजनांचे काम पूर्ण करू, असे आश्वासन दिले.

# कुर्ला वॉर्डमध्ये ६,८३४ मतदारांचे चुकीच्या प्रभागात वर्गीकरण! गलगलींची दुरुस्तीची मागणी

■ मुंबई

**बृहन्मुंबई** महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी प्रकाशित करण्यात आलेल्या मूळ मसुदा मतदार यादीत अनेक चुका दिसत आहेत. सामाजिक कार्यकर्ते आणि आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांनी एल वॉर्डच्या सहाय्यक आयुक्तांकडे लेखी निवेदन देत गंभीर चुका तत्काळ दुरुस्त करण्याची मागणी केली आहे.

गलगली यांनी दिलेल्या माहितीनुसार, वार्ड क्रमांक १६३ मध्ये दाखविण्यात आलेले एकूण ६,८३४ मतदार प्रत्यक्षात वार्ड क्रमांक १६२ मध्ये येतात. प्रभाग रचना बदलानुसार ते १६२ प्रभागात वर्गीकृत होणे अपेक्षित होते, परंतु मसुदा यादीत त्यांना चुकीने १६३ प्रभागात दाखविले आहेत. अनिल गलगली यांनी सांगितले की, ही लिस्ट पार्ट्स भौगोलिकदृष्ट्या व प्रशासनिक दृष्ट्या पूर्णपणे १६२ प्रभागात येतात. परंतु मसुदा यादीत त्यांचे चुकीचे मॅपिंग झाले आहे. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि अचूकता राखण्यासाठी या ६,८३४ मतदारांचे वर्गीकरण तातडीने सुधारले जावे, अशी मागणी गलगली यांची आहे. या संदर्भातील निवेदन सहाय्यक आयुक्त, एल वॉर्ड यांना देण्यात आले असून, त्याची प्रत महानगर आयुक्त भूषण गगराणी आणि अतिरिक्त आयुक्त डॉ. अश्विनी जोशी यांना पाठविण्यात आली आहे.



# ४ वर्षीय बेपत्ता बालिकेचा बंधाऱ्यामध्ये बुडून मृत्यू

■ जत

**सकाळी** शेतात आजीसोबत गेलेली चार वर्षांची चिमुकली गवताच्या ढिगाऱ्याजवळ खेळत असताना अचानक बेपत्ता झाली. अखेर दोन दिवसांनंतर काल सायंकाळी सहा वाजता जवळच एका बंधाऱ्यात तिचा मृतदेह आढळला. ही हृदयद्रावक घटना जत तालुक्यातील डफळापूर गावात घडली. रेणुका शिवदास ढोबळे असे या मृत चिमुकलीचे नाव आहे. गुरुवारी दुपारी ११.४५ वाजता रेणुकाची आजी गवत काढायला गेली होती. रेणुका गवताच्या ढिगावर खेळत होती. काही वेळाने ती अचानक दिसेनाशी झाली. आजी व गावकऱ्यांनी तत्काळ शोध घेतला. मात्र ती सापडली नाही. त्यामुळे याबाबतची माहिती पोलिसांना देण्यात आली. रेणुकाचे आजोबा आप्पा भाऊ ढोबळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून अज्ञाताविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी विविध टीमच्या सहकार्याने शोधमोहीम राबवली.

# बिबट्यांसाठी पुणे जिल्ह्यात चार नवीन जंगले बनवणार

■ जुन्नर

**पुणे** शहर आणि जिल्ह्यातील अन्य ठिकाणच्या मानवी वस्तीत बिबटे घुसत असल्याच्या घटना वारंवार घडत आहेत. या बिबट्यांना रोखण्यासाठी वनविभागाच्या वतीने जिल्ह्यात चार ठिकाणी नवीन जंगलांची निर्मिती केली जाणार आहे. शिरूर तालुक्यातील पिंपरखेड व न्हावरा येथे तसेच जुन्नर व मंचरमध्ये ही चार जंगले तयार होणार आहेत. त्यासाठी जागा तयार आहे, त्याचा प्रस्तावही तयार आहे, त्यासाठी आता सरकारी मंजुरीची प्रतीक्षा केली जात असल्याची माहिती जुन्नर वनविभागाचे उपवनसंरक्षक प्रशांत खाडे यांनी दिली.

प्रशांत खाडे म्हणाले की, बिबट्यांना हा नवीन जंगलाचा अधिवास मिळाला की त्यांचे शहरात प्रवेश करणे कमी होईल. या चारही ठिकाणी वनविभागाची बरीच मोठी मोकळी जागा आहे. त्या जागेचा वापर जंगल उभारणीसाठी केला जाईल. बिबटप्रवण क्षेत्रातच या जागा निवडण्यात आल्या आहेत. ३० ते ५० एकर असे त्यांचे क्षेत्र आहे. सध्या साधे कुरण व विस्तीर्ण मोकळे पठार असे या जागांचे स्वरूप आहे.

**बिबट्याचे क्षेत्र ३० ते ५० एकर असेल**

पिंपरखेड,जांबूत या गावांमध्ये दोन महिन्यांच्या कालावधीत तीन हल्ले होऊन त्यात तीन बळी गेल्यानंतर या जंगलनिर्मितीच्या प्रस्तावाला गती मिळाली आहे. यात सर्वप्रथम ही संपूर्ण जागा तारांचे मोठे कुंपण घालून बंदिस्त केली जाईल. त्यानंतर आतील परिसरात उत्तम दर्जाचे, वेगाने वाढणारे गवत लावण्यात येईल. देशी वृक्षांच्या बऱ्यापैकी लागवड होईल. जंगल तयार झाल्यावर त्यात पकडलेल्या बिबट्यांना सोडण्याचा वनविभागाचा विचार आहे. नैसर्गिकपणे खाद्य मिळाले, लपण्याच्या जागा तयार झाल्या की, बिबट्यांना नैसर्गिक अधिवास उपलब्ध होणार आहे.

# रहस्यमयरित्या बेपत्ता दाम्पत्याचे मृतदेह बुलडाण्यात कारसह विहिरीत आढळले

■ जळगाव

**एका** लग्न समारंभासाठी तेलंगणाहून कारने जळगाव जिल्ह्यातील आपल्या मूळ गावी निघालेले एक जोडपे अचानक गायब झाले. गूढरित्या गायब झालेले पद्मसिंह दामू पाटील (४९) आणि त्यांची पत्नी नम्रता पाटील (४५) हे दाम्पत्य अखे बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव-मलकापूर राष्ट्रीय महामार्गालगतच्या एका खोल विहिरीत आढळले. दोघांच्या मृतदेहांसह त्यांची अपघातग्रस्त कारही सापडली आहे.

पद्मसिंह पाटील हे डोकलखेडा (ता. पाचोरा) येथील तेलंगणातील सीतापुरम येथे नोकरीला होते. २७ नोव्हेंबर रोजी सकाळी ते पत्नीसह मोटारीने निघाले आणि सायंकाळी त्यांचे चुलतभावाशी शेवटचे बोलणे झाले. रात्री १० वाजेपर्यंत ते मूळ गावी येणे अपेक्षित होते. मात्र त्यानंतर त्यांचा संपर्क पूर्णपणे तुटला. भ्रमणध्वनी बंद येत असल्याने कुटुंबियांनी नांदुरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी शोध सुरू केल्यानंतर त्यांचे शेवटचे लोकेशन वडनेर भोलजी (ता. नांदुरा) गावाच्या परिसरात आढळले.

**घातपात असल्याचा आरोप**

पोलिसांच्या शोधमोहिमेत वडनेर उड्डाणपुलाजवळील झाडा-झुडुपांनी वेढलेल्या विहिरीत त्यांची कार आणि दोघांचे मृतदेह आढळले. क्रेनच्या मदतीने चार तासांच्या अथक प्रयत्नानंतर मृतदेह बाहेर काढण्यात आले. आज त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. लग्नाला न जाता तेलंगणातील घरीच थांबल्यामुळे पाटील दाम्पत्याची १६ वर्षांची एकुलती मुलगी बचावली. दरम्यान, हा निव्वळ एक अपघात नसून घातपात असल्याचा आरोप नातेवाईक संदीप रमेश पाटील यांनी केला आहे.

# टॉरेंट पॉवरतर्फे 'संगिनी' अंतर्गत कमावत्या महिलांसाठी विशेष सत्र

■ भिवंडी

**महिला** सबलीकरण आणि कर्मचाऱ्यांच्या सर्वांगीण आरोग्य-विकासाला प्रोत्साहन देण्याच्या आपल्या प्रयत्नांची पुढची पायरी



म्हणून टॉरेंट पॉवरतर्फे 'संगिनी' या महिला-केंद्रित उपक्रमाचा आणखी एक प्रेरणादायी सत्र काल भिवंडी येथील ओसवाल ऑडिटोरियम येथे आयोजित करण्यात आले. २०० हून अधिक महिला कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभागी होऊन या सत्राला मोठा प्रतिसाद दिला.

या सत्राचा विषय नुरिश टू फ्लुरिश असा नोकरदार महिलांसाठी योग्य आहार, पोषण आणि संतुलित जीवनशैलीचे महत्त्व यावर आधारित होता. संगिनी हा टॉरेंट पॉवरचा सहामाही उपक्रम असून महिलांना आरोग्य-जागरूकता, वैयक्तिक व व्यावसायिक ग्रूमिंग, आर्थिक नियोजन, तसेच कुटुंब आणि कामामधील समतोल साधण्यासंबंधित मार्गदर्शन देणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. प्रत्येक सत्रामध्ये संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ वक्त्यांना आमंत्रित करून माहितीपूर्ण तसेच प्रेरणादायी संवाद साधला जातो.

# आता डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय कफ सिरप मिळणार नाही

■ नवी दिल्ली

**केंद्र सरकारचा निर्णय**

**देशभरातील** औषध विक्रेत्यांना आता डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शन म्हणजेच चिठ्ठीशिवाय कफ सिरप हे खोकल्याचे औषध विकता येणार नाही, असा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. यामुळे कफ सिरप आता देशभरात सहज उपलब्ध राहणार नाही.

आतापर्यंत बहुतेक कफ सिरप डॉक्टरांच्या प्रिस्क्रीप्शनशिवाय थेट ग्राहकांना विकले जात होते. परंतु सरकारच्या या नवीन निर्णयामुळे आता या पद्धतीला आळा बसणार आहे. काही दिवसांपूर्वी मध्य प्रदेशातील छिंदवाडा आणि आसपासच्या जिल्ह्यांमध्ये 'कोल्ड्रिफ सिरप'मुळे किडनी निकामी होऊन किमान २४ मुलांचा मृत्यू झाला होता. राजस्थान आणि गुजरातसह इतर राज्यांमध्येही अशाच प्रकारच्या घटना घडल्या होत्या. त्याचप्रमाणे देशात आणि परदेशातही अशा घटना समोर आल्या आहेत. सरकारची सर्वोच्च नियामक संस्था, औषध सल्लागार समितीने, कफ सिरपच्या अनियंत्रित विक्रीला आळा घालण्यासाठी त्यांच्या ६७ व्या बैठकीत हा निर्णय घेतला. त्यानंतर आता कफ सिरप देशभरात सहज उपलब्ध राहणार नाही.

आम्हाला हे जाहीर करताना आनंद होत आहे की
आमच्या नवीन शाखेचे भव्य उद्घाटन
येथे
विले पार्ले (पूर्व) शाखा
तळमजला, लक्ष्मी सॉलिटेअर,
एच डी एफ सी बँक समोर, १९ महंत रोड,
विले पार्ले पूर्व, मुंबई - ४०००५७
(श्री. निरंजन कुमार शाखा व्यवस्थापक - ७०४९०३४९८१)
तारीख
सोमवार, १ डिसेंबर २०२५.
बंकेच्या विविध योजना, तंत्रज्ञानयुक्त डिजिटल बैंकिंग आणि अपवादात्मक दर्जेदार सेवांचा लाभ घ्या.
WELCOME TO
बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक
www.bankofmaharashtra.in
Follow Us @mahabank

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# ऑपरेशन सिंदूर थांबलेले नाही

भारताने पाकिस्तानविरुद्ध सुरू केलेले ऑपरेशन सिंदूर अजूनही संपलेले नाही. पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी हल्ला केला त्यात धर्म विचारून निष्पाप अशा भारतीय पर्यटकांना गोळ्या घातल्या गेल्या होत्या. हा जगातला अत्यंत क्रूर प्रकार होता. विशेषतः धर्माच्या नावाने इतक्या कृतघ्नपणे हत्या करण्याचा हा आधुनिक काळातला धक्कादायक प्रकार होता. स्वाभाविकपणे या हल्ल्याची अत्यंत गंभीर दखल भारताने घेतली आणि पुढच्या काही दिवसांमध्ये थेट पाकिस्तानात घुसून ऑपरेशन सिंदूर राबवले गेले. यामध्ये पाकिस्तानच्या काही महत्त्वाच्या ठिकाणी असलेली अतिरेक्यांचे तळ उद्ध्वस्त केली गेली. त्यात सुद्धा शंभरावर अतिरेकी मारले गेले असण्याची शक्यता व्यक्त झाली होती. भारताची ही आक्रमकता इतकी तीव्र स्वरूपाची होती की, पाकिस्तानी सैनिक सुद्धा त्यांना नेमून दिलेले ठिकाण सोडून पळून गेल्याच्या बातम्या आल्या होत्या. त्या आता खऱ्या असल्याचे पाकिस्तानकडूनच सांगितले जाते आहे. एवढेच नव्हे तर पाकिस्तान वारंवार ज्या अण्वस्त्रांचे धमकी देत होता त्या अण्वस्त्रांची धमकीसुद्धा किती पोकळ आहे हे नंतरच्या काळामध्ये सिद्ध झाले. भारताने ऑपरेशन सिंदूरच्या निमित्ताने ज्या ठिकाणी अण्वस्त्र असल्याचे पाकिस्तानकडून सांगितले जात होते. त्या परिसरामध्येच अशा काही प्रकारचे हल्ले भारताने केले की, आता त्या अण्वस्त्र ठेवलेल्या जागी पाकिस्तानलासुद्धा आत जाऊन त्याचा उपयोग करता येणार नाही. जर त्यांनी काही अण्वस्त्र बाहेर काढण्याचा प्रयत्न केलाच तर तो त्यांच्याच अंगलट येऊ शकतो. इतकी कुशलतापूर्वक भारतीय सैन्याने कामगिरी करून त्यांच्या या अण्वस्त्र साठ्याची पूर्ण नाकेबंदी आणि टाळेबंदी केली आहे. स्वतः पाकिस्तानच्या लष्कर प्रमुखांनी ऑपरेशन सिंदूरची ही आक्रमकता पाहून युद्ध थांबवण्याची विनंती केली होती आणि ती विनंती लक्षात घेऊन भारताने सुद्धा त्याला योग्य तो प्रतिसाद दिला. मात्र हा प्रतिसाद देत असताना पाकिस्तानने जर अशाच प्रकारची काही आगळीक केली तर ऑपरेशन सिंदूर कायम चालू राहील असे देखील ठणकावून सांगितलेले होते. कोणतीही अतिरेकी कारवाई ही युद्ध समजूनच त्याला प्रत्युत्तर दिले जाईल अशा प्रकारची ठाम भूमिका भारताने घेतल्याने पाकिस्तानची आता पूर्ण कोंडी झालेली आहे.

**७२ तळ हलवले**

मधल्या काळामध्ये दहशतवाद्यांचे अनेक तळ पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आणि आता भविष्य काळामध्ये पाकिस्तानकडून जर दहशतवादी हल्ले झाले तर भारत पुन्हा त्याच आक्रमकतेने किंबहुना त्यापेक्षा अधिक वेगाने हे दहशतवादी ठिकाण उद्ध्वस्त करू शकतो. ही शक्यता लक्षात घेऊनच पाकिस्तान आणि दहशतवाद्यांनी आपली दहशतवादी तळ किंवा केंद्र देशाच्या आतल्या भागामध्ये न्यायला सुरुवात केलेली आहे. भारतीय सीमा सुरक्षा दलाचे महासंचालक विक्रम कुवर आणि महानिरीक्षक शशांक आनंद यांच्या म्हणण्याप्रमाणे जवळपास ७२ दहशतवादी तळ हे त्यांच्या मूळ ठिकाणावरून दुसरीकडे हलवली गेली आहेत. त्यातील साठ दहशतवादी तळ ही देशाच्या अंतर्गत भागात नेली गेली. तिथे जर भारताने कारवाई केली तर त्यात पाकिस्तानी नागरिकांचीदेखील नासधूस होऊ शकते. नागरी वस्त्यांवर त्याचा परिणाम होऊ शकतो. म्हणूनच स्वतःला सुरक्षित करून घेण्यासाठी दहशतवाद्यांनी जवळपास ६० तळ ही अशा ठिकाणी तयार करायला सुरुवात केली आहे की, जिथे भारताला हल्ला करणे कठीण होऊ शकेल. परंतु यावरही भारतीय लष्करप्रमुखांनी दिलेले उत्तर खूपच भूषणावह आणि गौरवास्पद ठरते. कारण ऑपरेशन सिंदूर औपचारिकरित्या जरी थांबले असे वाटत असले ते भारतीय लष्कराने पाकिस्तानमध्ये चाललेल्या दहशतवाद्यांच्या कारवायांवर लष्कराच्या हालचालींवर पूर्ण लक्ष ठेवलेले आहे. म्हणूनच आता ही तळ कुठे आहेत पाकिस्तानी सैनिक आता कोणत्या पोझिशनवर आहेत या सगळ्याचे खडान्खडा माहिती आज भारतीय लष्कराकडे आहे. या उपर जाऊन भारतीय लष्कराचे असे म्हणणे आहे की, जरी हे ६० तळ दहशतवाद्यांनी पाकिस्तान सरकारच्या मदतीने नागरिक वस्त्यांच्या आसपास नेलेली असली तरी त्या ठिकाणी जाऊन नागरी वस्त्यांचे नुकसान न करता ही दहशतवादी तळ सुद्धा पुन्हा उद्ध्वस्त करता येऊ शकतील. इतके ठोस नियोजन भारतीय लष्कराने तयार ठेवलेले आहे. याचा अर्थ पाकिस्तानवर आता भारताची कायम करडी नजर राहणार आहे.

**तर यापेक्षा मोठा तडा**

काश्मीरमध्ये सुद्धा भारतीय लष्कराने आता यापेक्षाही आक्रमक भूमिका घेतली असल्याने जे जे पाकिस्तानचे सहानुभुतीदार आहेत किंवा त्यांच्याकडून दहशतवाद्यांना छुप्या पद्धतीने मदत होते त्या सर्वांची संपत्ती जप्त करणं त्यांच्या अनधिकृत किंवा अधिकृत बांधकामांवर बुलडोझर फिरवणं जेणेकरून ज्या पैशाच्या जोरावर आणि संपत्तीच्या जोरावर ते दहशतवाद्यांना मदत करतात त्यांचे स्त्रोतच नाहीसे करण्याचा हा एकमेव पर्याय भारताकडे उरलेला आहे. म्हणूनच काश्मिरमध्ये राहून भारताचे अन्न पाणी खाऊन जर दहशतवाद्यांना सहानुभूती मिळत असेल तर अशा सहानुभूतीदारांचे काश्मीर मधले चारा पाणी बंद करण्याचा हा तितकाच प्रभावी उपाय आता भारतीय लष्कराने शोधून काढलेला आहे. या सगळ्या गोष्टींची एकत्रितपणे मांडणी केली तर असं लक्षात येतं की आज जरी आपल्याला ऑपरेशन सिंदूर हे थांबलेले वाटत असले तरी भारतीय लष्कराच्या दृष्टीने ऑपरेशन सिंदूर हे अजूनही कायम चालू आहे. विशेषतः पाकिस्तानच्या प्रत्येक बारीक हालचालींवर वेगवेगळ्या पद्धतीने लक्ष ठेवले जाते आहे. काश्मीरमध्येसुद्धा घुसखोरी होणार नाही. आणि आपले ठिकाणं बदलून त्यांना पूर्वीप्रमाणे सहजरित्या भारतात घुसणे अशक्य होईल अशा प्रकारचीसुद्धा सीमेवरची संरक्षण सिद्धता लष्कराने आणखीन वाढवलेली आहे. पाकिस्तान कितीही स्वतःच्या लष्कराचे गुणगौरव करत असला किंवा कौतुक करत असला किंवा तिथल्या लष्कर प्रमुखाला कायद्याने जास्त अधिकार जरी देत असला तरी आज पाकिस्तानी लष्कर आणि तिथल्या दहशतवाद्यांची खडान्खडा माहिती भारताकडे आहे. पुढे जर का पाकिस्तानने थोडीफार जरी आगळीक किंवा कुरापत काढण्याचा प्रयत्न केला तर ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातूनच यापेक्षाही तडाखेबंद उत्तर पाकिस्तानला दिले जाईल आणि भविष्यकाळात तो एक पाकिस्तानला मिळालेला सर्वात मोठा धडा असेल.

**सुविचार**

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

चांगले विचार हे अगरबत्तीच्या सुगंधासारखे असतात ते स्वतःहून पसरावे लागत नाहीत ते आपोआपच पसरतात.

**पंचांग**

**सोमवार, १ डिसेंबर २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**

**मार्गशीर्ष शुक्ल एकादशी**



**नक्षत्र : रेवती**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २३-१८ मीन**
**२३-१९ ते २४-०० मेष**

**रवी उदय- ०६-५७**
**रवी अस्त- १७-५९**

**मोक्षदा एकादशी; मौनी एकादशी; गीता जयंती; जागतिक एड्स निर्मूलन दिन**


मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)




## पाटवडी



★ **साहित्य :-**१ मोठी वाटी बेसन, बेसनच्या मापाएवढेच पाणी, २ चमचे आले लसूण मिरची पेस्ट, थोडी कोथिंबीर, चवीप्रमाणे मीठ, १ चमचा जिरे, १ चमचा राई, १/२ चमचा हिंग, १/२ चमचा हळद.

★ **कृती :-** १) प्रथम आपल्याला लागणारे पीठ घेऊन गॅसवर तसराळे ठेवावे व त्यात तेल घालावे तेल गरम झाल्यावर राई,जिरं हिंग ह्यांची फोडणी द्यावी तसेच आलं मिरची लसूण यांची पेस्ट घालून चांगले परतून घ्यावे हळद घालून पाणी घालावे. २) पाणी उकळल्यावर त्यात बेसन घालावे व चांगले परतून घ्यावे बेसनचा अगदी घट्ट गोळा होईपर्यंत परतावे. नंतर एका ताटाला तेल लावून शिजवलेले पीठ हाताने पटापट थापून त्याच्यावर कोथिंबीर व तीळ घालून घ्यावे. व त्याच्या आपल्याला हव्या तशा वड्या कापाव्या. ३) छान अशा पाटवड्या सर्व्ह करण्यास तयार.





# खेलो इंडियाच्या सायकलिंगमध्ये महाराष्ट्र चमकला

## सिध्दी शिर्के व मंगेश ताकमोगे यांना सुवर्णपदक

**खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेतील सायकलिंग ट्रॅक आज महाराष्ट्राच्या जयघोषाने दुमदुमला. पुणे विद्यापीठाच्या सिध्दी शिर्के, मंगेश ताकमोगे यांनी सुवर्णपदके जिंकून दिवस गाजविला. आदिती डोंगरे, सिध्देश पाटील, मंथन लाटे यांनी रौप्य तर कोल्हापूरच्या योगेश्वरी कदम १, सायली आंरडेने २ कांस्य पदक जिंकून महाराष्ट्रासाठी पदकाची अष्टमी साजरी केली.**



■ जयपूर

**सवाई** मानसिंग क्रीडा संकुलातील सायकलिंग ट्रॅकवर पुणे विद्यापीठाच्या खेळाडूंनी सायकलिंग स्पर्धेची सुवर्ण सांगता केली. २० कि.मी पॉईंट शर्यतीत पुणे विद्यापीठाच्या सिध्दी शिर्केने आपली हुकूमत गाजवली. १९ वर्षीय सिध्दीने ६५ गुणांची कमाई करीत सुवर्णयश संपादले. लव्हली विद्यापीठाच्या रिंकु भानूने ३८ गुणांसह रौप्य तर कोल्हापूर विद्यापीठाच्या योगेश्वरी कदमने २७ गुणांची कमाई करीत कांस्य पदकावर नाव कोरले. महिन्याभरापूर्वी झालेल्या हाताच्या दुखापतीवर मात करीत सिध्दीने खेलो इंडियातील पहिले पदक जिंकण्याचा करिश्मा घडविला. पुरुषांच्या ५ फेऱ्यांच्या इलीट शर्यतीत पुणे विद्यापीठाने मक्तेदारी प्रस्थापित केली. मंगेश ताकमोगेने सुवर्ण तर मंथन लाटे रौप्यपदकावर नाव कोरले. अपेक्षेप्रमाणे मंगेश व मंथनने सुरुवातीपासून आघाडी घेत पदकाची कमाई केली. लव्हली विद्यापीठाच्या अजय बिश्नोईला कांस्य पदकावर समाधान मानावे लागले.

खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेचे पाचवे पर्व राजस्थान मधील सात शहरांमध्ये रंगले. देशातील २२२ विद्यापीठांमधील ४,४४८ खेळाडू २३ पदक स्पर्धांमध्ये भाग घेत आहेत. राजस्थान सरकारच्या राज्य क्रीडा परिषदेच्या सहकार्याने भारतीय क्रीडा प्राधिकरण स्पर्धेचे संयोजन केले आहे. सायकलिंगमधील महाराष्ट्राच्या पदक विजेत्यांचे विजेत्या खेळाडूचे प्रशिक्षक राहुल भोसले, वैभव भोर,अजय मराठे यांनी मैदानात उपस्थित राहून कौतुक केले. पुरुषांच्या २० कि.मी पॉईंट शर्यतीत कोल्हापूरच्या सिध्देश, पाटीलचे सुवर्णपदक १ गुणाने हुकले. ४२ गुणांसह केरळ विद्यापीठाच्या आदित्य संकरने सुवर्ण पटकावले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना सिध्देशने ४१ गुणांची कमाई करत रूपेरी यशासह खेलो इंडिया स्पर्धेत पदकाची हॅट्ट्रिक साधली. अमृतसर स्पर्धेत कांस्य, ओरिसा स्पर्धेत रौप्य आता राजस्थान स्पर्धेत तो पुन्हा रौप्य पदकाचा हकदार ठरला.

# युनायटेड क्रिकेट क्लब आणि स्पोर्ट्स फिल्ड अंतिम फेरीत

■ मुंबई

**कुर्ला** स्पोर्ट्स क्लब आयोजित ६७ व्या टी-२० बाळकृष्ण बापट स्मृती ढाल उपनगरीय क्रिकेट स्पर्धेच्या न्यू हिंदवर झालेल्या उपांत्य फेरीत गतविजेत्या युनायटेड क्रिकेट क्लब असोसिएशन संघाने स्पोर्ट्स प्रमोशन ग्रुपची १२९ धावसंख्या ४ गडी राखून ओलांडली तर गत उपविजेत्या स्पोर्ट्स फिल्डने अणुशक्तीनगर स्पोर्ट्स अँड रिक्रीएशन क्लबची धावसंख्या ८ गडी राखून ओलांडत अंतिम फेरीत प्रवेश केला.

स्पोर्ट्स प्रमोशन ग्रुपने पहिल्या डावात १९.५ षटकांत १२९ धावा केल्या होत्या. त्यात गौरव सूर्यवंशीने ३३ धावा, ऋषिक मेहताने ३० धावांचे योगदान केले. या प्रत्युत्तरात नितीन परमारच्या ४४ धावांच्या जोरावर युनायटेड क्रिकेट क्लबने १७.४ षटकांत ६ बाद १३१ धावा करत विजय मिळवला.

अणुशक्तीनगर स्पोर्ट्स अँड रिक्रीएशन क्लबने निर्धारित २० षटकात ८ बाद १३२ धावा केल्या होत्या. त्यानंतर स्पोर्ट्स फिल्ड क्रिकेट क्लबने १२.५ षटकांत २ बाद १३३ धावा केल्याने एकतर्फी विजय मिळवला. या विजयात अंकित यादवने २३ चेंडूंत नाबाद ५४ धावा करून मोलाचे योगदान दिले.

# टेनिसपटू प्रणील शर्माला दुहेरी मुकुट

■ नवी दिल्ली

**नवी** दिल्लीत झालेल्या आयटीएफ टेनिस स्पर्धेत पुरूष टेनिसपटू प्रणील शर्माने एकेरी आणि दुहेरीतील विजेतेपदे मिळवून दुहेरी मुकुट साधला. आयटीएफ विश्व कनिष्ठ टेनिस टूरवरील १०० दर्जाच्या या स्पर्धेत शनिवारी झालेल्या एकेरीच्या सामन्यात पाचव्या मानांकीत प्रणील शर्माने ऐश्वर्य मेहराचा ६-३, १-६, ७-६ (८-६) असा पराभव करत मुलांच्या एकेरीचे जेतेपद पटकाविले.

त्यानंतर मुलांच्या दुहेरीतील अंतिम सामन्यात प्रणील शर्मा आणि आदित्य मोर यांनी टॉपसिडेड जोडी तेविश पेवा आणि समर्थ साहीता यांचा ६-४, ६-२ असा पराभव केला.

# ठाणे ग्रामीण आणि पालघर संघाला विजेतेपद

■ पुणे

**ठाणे** ग्रामीण व पालघर या संघानी अनुक्रमे ५२व्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कुमार व कुमारी गटाचे विजेतेपद पटकाविले. पिंपरी चिंचवड बोपखेल येथील दिवंगत श्रीरंग धोदाडे क्रीडानगरीत विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे व राकेशभाऊ घुले कबड्डी संघ व युवा प्रतिष्ठान यांच्या विद्यमाने ही आमदार चषक कबड्डी स्पर्धा पार पडली.स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी रात्री उशीरा झालेल्या मुलांच्या शेवटच्या मिनिटापर्यंच अत्यंत रोमहर्षक झालेल्या अंतिम सामन्यात ठाणे ग्रामीण संघाने अहमदनगरचा संघाचा ३९-३७ अशा गुण फरकाने पराभव करून स्व. प्रभाकर नागो पाटील फिरता चषका बरोबर आमदार चषक पटकाविला.



आक्रमण आणि बचाव यांचे योग्य मिश्रण असलेल्या दोन्ही तुल्यबळ संघाने प्रेक्षकांची मने जिंकून घेतली. ठाणे ग्रामीणच्या जीतसिंग सैनी संयमी खेळामुळे आपल्या संघाला विजय मिळवणे शक्य झाले.मध्यंतरला ठाणे ग्रामीण १६-२२असा ६गुणांनी पिछाडीवर होता.मात्र मध्यंतरानंतर जीतसिंग सैनी व स्मित पाटील यांनी जोरदार आक्रमण करीत अहमदनगरच्या अभिजित साळुंखेचा व सार्थक शिंदेचा बचाव भेदला. त्यामुळे मध्यंतरानंतर सामना ठाणे ग्रामीणच्या बाजुला झुकविण्यात त्यांना यश आले.ठाणे ग्रामीणच्या समन हरिजन याने सुरेख पकडी घेत आपल्या संघाला विजय मिळवून देण्यात हात भार लावला. सामन्याच्या पुर्वार्धात अहमदनगर संघाच्या वैदांत उंदरे व प्रशांत उपलकर यांनी आक्रमक सुरवात करून आपल्या संघाला आघाडी मिळवून दिली होती.

# अष्टपैलू आंद्रे रसेलची आयपीएलमधून निवृत्ती

■ कोलकाता

**वेस्ट** इंडिजचा अष्टपैलू खेळाडू आंद्रे रसेलने आयपीएलमधून निवृत्ती जाहीर केली. यासोबतच ३७वर्षीय रसेलचे खेळाडू म्हणून कोलकाता नाईट रायडर्ससोबतचे ११ वर्षांचे नाते संपले. आयपीएल २०२६च्या लिलावापूर्वी कोलकाता नाईट रायडर्सने रसेलला रिलीज केले होते. रसेलने कोलकाता नाईट रायडर्ससाठी १३३ सामने खेळले. त्याने २०१४ आणि २०२४ मध्ये कोलकाता नाईट रायडर्सला विजेतेपद मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्याने दिल्ली कॅपिटल्ससाठी खेळून आपल्या आयपीएल कारकिर्दीची सुरुवात केली होती. तो २०१२ आणि २०१३ मध्ये दिल्लीसाठी खेळला. २०१४ मध्ये तो कोलकाता नाईट रायडर्समध्ये सामील झाला आणि तेव्हापासून या संघाचा एक महत्त्वाचा सदस्य बनला.

# मेस्सीच्या इंटर मियामीला ईस्टर्न कॉन्फरन्सचे विजेतेपद

■ न्यूयॉर्क



**स्टार** फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीच्या नेतृत्वाखाली इंटर मियामी संघाने ईस्टर्न कॉन्फरन्स फायनलमध्ये न्यूयॉर्क सिटी एफसीला ५-१ने हरवून विजेतेपद पटकावले. या विजयासह संघाने मेजर लीग सॉकर कपच्या अंतिम फेरीत स्थान निश्चित केले. ईस्टर्न कॉन्फरन्स फायनलमध्ये तादेओ अलेंदेने शानदार हॅट्ट्रिक केली, तर मातेओ सिल्वेत्ती आणि टेलास्को सेगोव्हियाने प्रत्येकी एक गोल केला.जगातील नंबर-१ टेनिसपटू कार्लोस अल्काराझ देखील ईस्टर्न कॉन्फरन्सचा अंतिम सामना पाहण्यासाठी स्टेडियममध्ये पोहोचला होता.

# ओम साईश्वर सेवा मंडळाचे दोन्ही संघ अंतिम फेरीत

■ मुंबई

**मुंबई** खो-खो संघटनेच्या मान्यतेने इन्स्पायर फाऊंडेशन आयोजित आणि मनसे पुरस्कृत कुमार-मुली (ज्युनिअर)मुंबई जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेला रंगतदार स्वरूप प्राप्त झाले. केशवराव दाते क्रीडांगण, आगाशे पथ, दादर (प.) येथे आज पार पडलेल्या उपांत्य फेरीच्या थरारक सामन्यांमुळे प्रेक्षकांनी रोमांच अनुभवला. मुलींचा अंतिम सामना ओम साईश्वर सेवा मंडळाविरुद्ध शिवनेरी सेवा मंडळ तर मुलांचा अंतिम सामना ओम साईश्वर सेवा मंडळाविरुद्ध सरस्वती स्पो. क्लब (अ) यांच्यात होणार आहे. ओम साईश्वर सेवा मंडळाचे दोन्ही संघ अंतिम फेरीत दाखल झाले.

मुलींच्या पहिल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात ओम साईश्वर सेवा मंडळाने आर्य सेनावर ५-३ (मध्यंतर ५-१)असा एक डाव राखून २ गुणांनी दिमाखदार विजय साजरा केला. ओम साईश्वरच्या निर्मिती परब (६ मि.संरक्षण), यशस्वी कदम (नाबाद



३, ४.२० मि.संरक्षण व २ गुण),कादंबरी तेरवणकर (नाबाद २.१० मि.संरक्षण), काजल मोरे (२.३० मि.संरक्षण व १ गुण) यांनी सुरुवातीपासूनच सामन्यात वर्चस्व ठेवत दमदार विजय मिळवत अंतिम फेरीत धडक दिली. तर पराभूत आर्य सेनेच्या सायली जाधव (३.३० मि.संरक्षण) मैदानाबाहेर गेल्याने बाद झाली, आरुषी पवार (२.३० मि.संरक्षण), अन्वी काकडे (१.३०,मि.संरक्षण) यांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली मात्र त्यांच्या संघाला आक्रमणात विशेष चमक न दाखवता आल्याने पराभव टळला नाही.

मुलींच्या दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात शिवनेरी सेवा मंडळाने सरस्वती कन्या संघचा ८-५ (मध्यंतर ८-२) असा एक डाव राखून ३ गुणांनी पराभव केला. शिवनेरीच्या मुस्कान शेख (३.५०,५ मि.संरक्षण), सिद्धी शिंदे (४.४०,१.२० मि. संरक्षण व १ गुण),आरुषी गुप्ता (२.३० मि. संरक्षण व १ गुण)व त्रिशा गुप्ता (२ गुण) यांनी संघाला अंतिम फेरीत स्थान मिळवून दिले.

# गायक अलि हुसेन



अलि हुसेन यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्र व हिंदी हे विषय घेऊन पदवी मिळविली असून, सवाई गंधर्व महाविद्यालयामार्फत त्यांनी बीए (संगीत) ही पदवी प्रथम वर्गात प्राप्त केलेली आहे.

अलि हुसेन हे आकाशवाणीच्या राष्ट्रीय पातळीवरील संगीत स्पर्धेचे विजेते असून, त्यांनी आपले कार्यक्रम आकाशवाणी, उर्दू दूरदर्शन तसेच ईटीव्हीच्या उर्दू महफिलवर सादर केलेले आहेत. झी टिव्हीच्या सारेगमप गोल्डन व्हॉईस हंट कार्यक्रमात ते २००३ साली अंतिम फेरीत विजेते ठरले होते.



**गायक अलि हुसेन यांचा जन्म २५ नोव्हेंबर रोजी झाला. अलि हुसेन हे भारतीय शास्त्रीय संगीताची सेवा करणाऱ्या झझ्झर घराण्यातील शास्त्रीय संगीतात मोलाची भर टाकणाऱ्या संगीतकारांच्या आठव्या पिढीतील कलाकार आहेत. वयाच्या बाराव्या वर्षांपासून अलि हुसेन यांनी आपले वडील नामवंत गझलगायक उस्ताद अन्वर कुरेशी यांच्यासोबत गझल गायनाचे कार्यक्रम करीत असून, त्यांनी आपले मामा सुरमणी फैय्याझ हुसेन खान यांच्याकडून शास्त्रीय संगीताचे प्रशिक्षण घेतलेले आहे.**

त्यांचे दिल एक नादान, अक्स द रिफ्लेक्शन, चराग एक गझल हे कार्यक्रम लोकप्रिय ठरलेले असून, 'अक्स द रिफ्लेक्शन' हा अल्बमदेखील प्रकाशित झालेला आहे. अलि हुसेन यांनी अमिर कुमार, जॉली मुखर्जी व उषा मंगेशकर यांच्यासह कार्यक्रम केलेले असून, दिलीपकुमार, निदा फजली, जतीन ललित, नदीम श्रवण, शिवराज पाटील या नामवंतांनी त्यांची वाखाणणी केलेली आहे. पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल २००७ मध्ये त्यांनी सादर केलेल्या कार्यक्रमास मणिरत्नम, उर्मिला मातोंडकर व सुनील शेट्टी उपस्थित होते.

निझाम क्लब, हैद्राबाद, पुना क्लब, कोरिथियन क्लब, आर के फार्मस, नेहरू सेंटर, मुंबई तसेच आकाशवाणीचे कलकत्ता केंद्र येथे त्यांनी आपले कार्यक्रम सादर केलेल आहेत. देशभरातील शेकडो शहरात त्यांच्या गझलाचे कार्यक्रम झालेले असून, सिंगापूर येथील आपल्या सहा महिन्यांच्या वास्तव्यादरम्यान त्यांनी तेथील लोकांनाही मंत्रमुग्ध केले होते.

**संजीव वेलणकर, पुणे**

# कल्याण- कसारा तिसऱ्या-चौथ्या रेल्वे मार्गिकेच्या कामाला वेग

■ उल्हासनगर

**कल्याण-** कसारा रेल्वे तिसऱ्या आणि चौथ्या मार्गासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे आणि ती वेगाने पुढे जात आहे. कल्याण-आसनगाव चौथ्या मार्गासाठी आणि तिसऱ्या मार्गिकेसाठी भूसंपादन पूर्ण झाले असून प्रकल्पाचा मोठा भाग पूर्ण झाला आहे. उल्हासनगरमध्ये नुकतीच भूसंपादन मोजणी पूर्ण झाली असून या कामाला आता अधिकृत गती मिळणार आहे.

कल्याण- कसारा रेल्वे मार्गावरील अपेक्षित तिसऱ्या व चौथ्या नवीन रेल्वेमार्गासाठी भूसंपादन व बाधित क्षेत्राच्या मोजणीचा

**उल्हासनगर भागातील भूसंपादन प्रक्रिया पूर्ण**

अत्यंत महत्त्वाचा टप्पा शुक्रवारी प्रत्यक्षात पूर्ण करण्यात आला.ठाणे जिल्हाधिकारी यांच्या निर्देशांनुसार आणि उल्हासनगर पालिकेच्या आयुक्त मनिषा आव्हाळे यांच्या सूचनेनुसार प्रशासनाने ही निर्णायक प्रक्रिया वेगाने पार पडली. महापालिका, नगरभूमापन आणि नगररचना विभागाच्या प्रभावी समन्वयामुळे आता या प्रकल्पाचा मार्ग अधिक प्रशस्त झाला आहे.

संपूर्ण सर्वेक्षणादरम्यान संपादित क्षेत्राचा नकाशा, बाधित मालमत्तेचे निरीक्षण, नकाशेवरील नोंदी आणि वास्तवदर्शी पंचनामे तयार करण्यात आले. सर्व उपस्थित अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या घेऊन मोजणी व पंचनाम्याची प्रक्रिया अधिकृतपणे करण्यात आली आहे.

SEALED TENDERS INVITED FOR THE REPAIR AND PAINTING WORK OF

VIDYA CHAMBER PREMISES CO. OP. SOC. LTD., 305, Tardeo Road, Nana Chowk, Grant Road, Mumbai- 400 007. Tender forms available at Society's **Shop no. 5** ground floor owned by Mr. Vishal Khandekar from Date: 1/12/2025 to 8/12/2025 between 12 PM to 5 PM (Except Sunday) Last Date of submission sealed tender 11/12/2025 between 12 pm to 5 pm Tender to be submitted at Society's **Shop no. 5** Mr. Vishal Khandekar between 12 pm to 5 pm cost of tender RS 4000/- in cash (Nonrefundable) **Standard Civil Engineers PVT LTD Mob: 9819037336 / 022-44503050**

# कर्जत गोळीबार प्रकरणातील आरोपीला पुण्यात अटक

**पुणे-** जमिनीच्या वादातून रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे गोळीबार करून फरार झालेल्या इसमाला गुन्हे शाखेच्या पथकाने शिवाजीनगर परिसरातून अटक केली. सिद्धार्थ प्रभाकर केंगार असे आरोपीचे नाव आहे.

१ ऑक्टोबर रोजी केंगार याने एका व्यक्तीवर देशी बनावटीच्या पिस्तुलातून गोळीबार केला होता. याप्रकरणी केंगारविरुद्ध कर्जत पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न, बेकायदा शस्त्र बाळगण्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. गोळीबार करून फरार झालेल्या केंगारचा पोलीस शोध घेत होते.

भारत सरकार
भाभा अणु संशोधन केंद्र
वैद्यकीय गट
रेडिएशन मेडिसिन सेंटर
टाटा मेमोरियल हॉस्पिटल अॅनेक्स बिल्डिंग, परळ, मुंबई-४०००१२
**वॉक-इन इंटरव्ह्यू**
आरएमआरसी, कोलकाता येथे स्थानिक/अॅडहॉक आधारावर
वैज्ञानिक अधिकारी/डी (वैद्यकीय) (न्यूक्लियर मेडिसिन) या दोन (०२) पदांसाठी भरती
भाभा अणु संशोधन केंद्र (बीएआरसी) रेडिएशन मेडिसिन सेंटर (आरएमसी) दि. ०९.१२.२०२५ (मंगळवार) सकाळी १०.३० वा. बीएआरसी हॉस्पिटल, अणुशक्तीनगर, मुंबई-९४ येथे ८९ दिवसांसाठी (जास्तीत जास्त दोन टर्म) स्थानिक/अॅडहॉक आधारावर (तात्पुरते पद) दोन (०२) पदांसाठी वैज्ञानिक अधिकारी/डी (वैद्यकीय) (न्यूक्लियर मेडिसिन) नियुक्तीसाठी वॉक-इन-इंटरव्ह्यू घेण्यात येणार आहे. पोस्टिंग आरएमआरसी, कोलकाता येथे होईल.
**(रिपोर्टिंग वेळ ०९:३० ते १०:०० वा.)**
अधिक माहितीसाठी कृपया बीएआरसी वेबसाईट www.barc.gov.in ला भेट द्या.
CBC 48165/12/0002/2526

# २ लाखांचा चष्मा! पायात ५० हजारांची सँडल सुळे यांना गोपिचंद पडळकरांचा टोला

■ अंबरनाथ

**लाडकी** बहीण योजना ही दोन लाखांचा चष्मा वापरणाऱ्यांसाठी नाही, तर ज्या बहिणींकडे खर्चासाठी ५० रुपयेही नसतात, त्यांच्यासाठी आहे, असा टोला भाजपा आमदार गोपीचंद पडळकर यांनी खासदार सुप्रिया सुळे यांना लगावला. ते ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथील प्रचार सभेत बोलत होते.

सुळे यांनी या योजनेत भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केल्यानंतर पडळकरांनी त्यांच्या श्रीमंतीचा दाखला देत जोरदार टीका केली. पडळकर म्हणाले की, ज्यांच्या डोळ्यांवर दोन लाखांचा चष्मा, पायात ५० हजारांची सँडल, काखेत दीड लाखांची पर्स आणि जे मरीन ड्राइव्हवर हजार रुपयांची चहा पितात, अशा बहिणींसाठी ही योजना नाही. ज्या बहिणींना खर्चासाठी पन्नास रुपयेही नसतात, त्यांच्यासाठी ही योजना आहे. यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनाही लक्ष्य केले. अजित पवारांच्या 'तिजोरीच्या चाव्या माझ्याकडे' या वक्तव्यावर बोलताना पडळकर म्हणाले की, तिजोरी आणि चाव्या तुमच्याकडे असल्या तरी, ज्या खोलीत तिजोरी आहे, त्या खोलीचे मालक आम्ही (भाजपा) आहोत.

# लातुरमध्ये हमालांचा बारदानविरोधात बंद

■ लातूर

**येथील** कृषी उत्पन्न बाजार समिती आवारातील हमालांनी शेतकऱ्यांच्या डबलएस पोते म्हणजेच मोठ्या बारदानाविरोधात अचानक बंद पुकारला आहे. हमालांनी अशा पोत्यातून आणलेला शेतमाल उचलण्यास नकार दिला आहे. या पोत्यात ७० किलोपेक्षा जास्त शेतीमाल मावत असल्याने हमालांनी त्याला विरोध करत ५० किलोच्या पोत्यातून शेतीमाल उचलण्याची ठाम भूमिका घेतली आहे.

यामुळे सलग दुसऱ्या दिवशीही बाजार बंद राहून सौदे झाले नाहीत. सध्या लग्न



व तातडीच्या आर्थिक गरजा भागवण्यासाठी शेतकरी त्यांचा शेतीमाल बाजारात विक्रीसाठी आणत आहेत. शेतीमाल वाहतुकीसाठी शेतकऱ्यांनी यंदा डबलएस प्रकारच्या पोत्यांचा वापर सुरू केला आहे. या पोत्यांमध्ये ५० किलोपेक्षा जास्त शेतीमाल मावत आहे. सोयाबीन ६० ते ६५ किलो तर तूर ७० ते ७५ किलोपर्यंत बसते. यामुळे ५० किलोपेक्षा जास्त वजन असलेल्या डबलएस बारदान्यातील शेतीमाल उचलण्यास हमालांनी नकार देत अचानक बंद पुकारला. त्यानंतर बाजार समिती व हमाल संघटनेच्या पदाधिकाऱ्यांत चर्चा झाली. मात्र, हमालांनी बंद मागे घेण्यास नकार दिला.

फॉर्म ए
जाहीर घोषणा
*(इन्सॉल्व्हन्सी अॅण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन ६ अन्वये)*
**प्रोटो डी इंडस्ट्रिज प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**
**संबंधित तपशिल**

| | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | **प्रोटो डी इंडस्ट्रिज प्रायव्हेट लिमिटेड** |
| २ | कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना तारीख | ०८ डिसेंबर २०२१ |
| ३ | ज्या प्राधिकरणाअंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले आहे | आरओसी - पुणे |
| ४ | कॉर्पोरेट ऋणकोचे कॉर्पोरेट ओळख क्र./मर्यादित दायित्व ओळख क्र. | U29309PN2021PTC206768 |
| ५ | कॉर्पोरेट ऋणकोचे नोंदणीकृत कार्यालय व प्रधान कार्यालयाचा (काही असल्यास) पत्ता | **नोंदणीकृत पत्ता-** गट क्र.३५७/५७, खराबवाडी, चाकण, ता. खेड, चाकण, पुणे, खेड, महाराष्ट्र, भारत, ४१०५०१ |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याची तारीख | २८ नोव्हेंबर २०२५ |
| ७. | दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया बंद होण्याची अंदाजित तारीख | २६ मे २०२६ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून कार्यरत दिवाळखोर व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | **नाव :** ऋषभ सेठी **नोंदणी क्र.** IBBI/IPA-001/IP-P-02842/2023-2024/14377 |
| ९. | बोर्डाकडे नोंदणीकृत अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | **नोंदणीकृत पत्ता:** सी २०३ रुणवाल हाईट्स, एलबीएस मार्ग, मुंबई शहर, महाराष्ट्र, ४०००८० नोंदणीकृत ईमेल: ip.rishabhsethi@gmail.com |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकांशी पत्रव्यवहार करण्यासाठी पत्ता आणि ई-मेल वापरला जाईल | **पत्रव्यवहाराचा पत्ता:** ४०८, चौथा मजला, मनीष चेंबर्स, सोनावाला रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०००६३ पत्रव्यवहाराचा ईमेल आयडी: cirp.pdipl@gmail.com |
| ११. | दावा सादर करण्याची अंतिम तारीख | १३ डिसेंबर २०२५ |
| १२. | कलम २१ च्या उपकलम (६अ) च्या खंड (ब) अंतर्गत, जर असेल तर, अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केलेले धनकोंचे वर्ग | लागू नाही. |
| १३. | वर्गातील कर्जदारांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी ओळखल्या गेलेल्या दिवाळखोर व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे) | या टप्प्यावर लागू नाही. |
| १४. | (अ) संबंधित फॉर्म आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत: | https://ibbi.gov.in/en/home/downloads वास्तविक पत्ता : लागू नाही. |

याद्वारे सूचना देण्यात येते की राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने २८ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रोटो डी इंडस्ट्रिज प्रायव्हेट लिमिटेडची कॉर्पोरेट दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.
प्रोटो डी इंडस्ट्रिज प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना येथे आवाहन करण्यात येते की त्यांनी त्यांचे दावे पुराव्यांसह १३ डिसेंबर २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनलकडे ४०८, ४था मजला, मनीष चेंबर्स, सोनावाला रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०००६३ येथे सादर करावेत.
वित्तीय धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह इलेक्ट्रॉनिक माध्यमातूनच सादर करावेत. इतर सर्व धनको पुराव्यासह वैयक्तिकरित्या, पोस्टाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दावे सादर करू शकतात.
नोंद क्र.१२ मध्ये सूचीबद्ध केलेल्या वर्गातील वित्तीय धनकोने, नोंद क्र.१३ मध्ये सूचीबद्ध केलेल्या तीन दिवाळखोरी व्यावसायिकांमधून फॉर्म सीए - लागू नाही मध्ये वर्गाचा अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी अधिकृत प्रतिनिधीची निवड दर्शवावी.
दाव्याचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.
दिनांक : ३०.११.२०२५
ठिकाण : मुंबई
**सही/-**
**ऋषभ सेठी**
**अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनल**
**प्रोटो डी इंडस्ट्रिज प्रायव्हेट लिमिटेडच्या बाबतीत**
**आयबीबीआय नोंद.क्र.** IBBI/IPA-001/IP-P-02842/2023-2024/14377
सी २०३ - रूणवाल हाईट्स, एलबीएस मार्ग, मुलुंड पश्चिम, मुंबई - ४०००८०
ईमेल आयडी: ip.rishabhsethi@gmail.com **एएफए वैधता** ३० जून २०२६ पर्यंत

# मुंबईतील बेकायदा झोपडपट्ट्यांवर एसआरएच्या 'नेत्रम' कक्षाचे लक्ष

■ मुंबई

**मुंबईसह** उपनगरात वाढत्या बेकायदा झोपडपट्ट्यांना आळा घालण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयात 'नेत्रम' नावाचा कक्ष उघडण्यात आला आहे. या नेत्रमच्या माध्यमातून बेकायदा झोपडपट्ट्यांवर लक्ष ठेवले जाणार आहे.

२०११ नंतर उभ्या राहणाऱ्या झोपडपट्ट्या बेकायदा ठरणार आहेत. त्यांना कोणत्याही गृहनिर्माण योजनेचा लाभ दिला जाणार नाही, अशा झोपडपट्ट्यांवर लक्ष ठेवण्यासाठी 'नेत्रम'या सॅटेलाईट तंत्रज्ञानाची मदत घेतली जाणार आहे. महापालिका, म्हाडा, खासगी, कलेक्टर यांच्या मालकीच्या जमिनी आहेत. यावर वर्षानुवर्षे अनेक झोपड्या वसलेल्या आहेत. या वगळता यांच्या व्यतिरिक्त नवीन झोपड्या उभ्या राहिल्यास 'नेत्रम'च्या माध्यमातून अशा झोपडीची इंत्भूत माहिती पोर्टलवर तत्काळ उपलब्ध होईल व कलम ३ जेड अंतर्गत झोपडीधारकाला नोटीस दिली जाईल आणि संबंधित जमिन आस्थापनाच्या मालकांना कारवाई करण्याबाबत कळविण्यात येईल. झोपडीवर तोडक कारवाई झाली का? याचे फोटोसह माहिती 'नेत्रम'या पोर्टलवर अपलोड करण्याची जबाबदारी जमिन आस्थापनाची असणार आहे, असे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयातील एका अधिकाऱ्याने सांगितले.

# शिक्षकांचे आंदोलन! ५ डिसेंबरला शाळांना सुट्टी

■ मुंबई

**महाराष्ट्रातील** सर्व प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा ५ डिसेंबर रोजी बंद राहणार आहेत. राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या शेकडो संघटनांनी पुकारलेल्या शाळा बंद आंदोलनामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रलंबित मागण्यांबाबत सरकारने सकारात्मक भूमिका घेतली नसल्याच्या निषेधार्थ शिक्षकांनी राज्यव्यापी आंदोलनाची हाक दिली आहे. यानुसार अमरावती, भंडारा, कोल्हापूर, संभाजीनगर, नांदेड, पुणे यांसह सर्व जिल्ह्यांत शिक्षकांचे जिल्हाधिकारी कार्यालयांवर मोर्चे निघणार आहेत.

शिक्षक संघटनांनी आंदोलनाची प्रमुख कारणे नमूद केले की, २० वर्षांपूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांसाठी टीईटी अनिवार्य करण्याच्या निर्णयाला विरोध, स्टाफिंग पॅटर्नमध्ये बदल झाल्याने हजारो शिक्षकांच्या नोकऱ्यांवर आणि वेतनावर संकट, जुनी पेन्शन योजनेत पुनर्स्थापन करणे, नियमित वेतनश्रेणी आणि इतर प्रशासकीय अडचणी या इतर प्रलंबित मागण्या आहेत.

NOTICE INVITING TENDER
Sealed Tender are invited for STRUCTURAL, CIVIL WORKS, WATERPROOFING & PAINTING WORKS AT RAMP AREA
**AMEYA ELEGANCE CO-OP. HOUSING SOCIETY LTD**
Vasant Vihar, Thane West, Mumbai – 400 610
Tender can be collected from Consultants office on working Hours On days from **01-12-2025** to **08-12-2025** Between 11.00 am to 5.00 pm
Tender submission at SOCIETY Office, between 11.00 a.m. to 5.00 p.m. on **10-12-2025**
Tender cost non- refundable: **Rs. 3,000 /-**
**Acute Project Management Consultants Pvt. Ltd.**
004, Poonam Darshan A Wing, Poonam Nagar, Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai - 400093
**Tel.: 9029358601 / 9867028802**

# राणी बागेत अत्याधुनिक मत्स्यालय होणार! पालिका ५५ कोटी खर्च करणार

■ मुंबई



**मुंबई** महापालिकेच्या भायखळा येथील राणीबाग अर्थात वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणिसंग्रहालयात आता आंतरराष्ट्रीय दर्जाचे अत्याधुनिक असे मत्स्यालय उभारले जाणार आहे. हे मत्स्यालय उभारणीचे प्रत्यक्ष काम सुरू झाले आहे. विशेष म्हणजे हे काम २०२७ पर्यंत पूर्ण होणार आहे.

या अत्याधुनिक मत्स्यालयमुळे पर्यटकांना पेंग्विनसह समुद्री जैवविविधतेचे दर्शन मिळणार आहे. राणी बागेतील पेंग्विन प्रदर्शन केंद्राच्या समोरच्या २५ मीटर बाय २५ मीटर इतक्या जागेवर हे मत्स्यालय उभारले जात आहे.

मत्स्यालयासाठी ५५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून हे काम मेसर्स एस.के.एस. कारकाला कंपनीला दिले आहे. यामध्ये जलचरांसाठी पाण्याची गुणवत्ता आणि संतुलन राखण्यासाठी १० हजार लिटर क्षमतेची मत्स्यालय जीवनप्रणाली बसवली जाणार आहे. तसेच जलचरांसाठी नैसर्गिक वातावरण निर्माण करण्यासाठी कृत्रिम रॉक वर्क तयार केले जात आहे. या मत्स्यालयात एकावेळी सुमारे १०० पर्यटक सहभागी होऊ शकतील. हे मत्स्यालय घुमट आकाराच्या संरचनेत उभारले जाणार असून त्यात दोन पारदर्शक टनेल असतील.

एक टनेल ॲक्रिलिक ग्लासचे असून पर्यटकांना १८० अंशातून अखंडित समुद्री दृश्य पाहायला मिळेल.या टनेलमध्ये प्रवाळ प्रदेश, विविध समुद्री प्रजाती, खोल समुद्रातील मासे यांचे जिवंत प्रतिकृतीभास दृश्य अनुभवता येईल.

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
*एक परिवार एक बँक*
चेंबूर पूर्व शाखा (८९), दयानंद सरस्वती रोड, हॉटेल डायमंडच्या बाजूला, चेंबूर गावठाण, चेंबूर, मुंबई -४०००७१
दूरध्वनी क्र.: ०२२-२५२३५२१० । २५२८४२९६ । २५२८२८२८
ईमेल आयडी:bom89@mahabank.co.in
**लॉकरधारक, खातेधारक आणि सर्वसाधारण जनतेला सूचना.**
१६.०५.२०२५ रोजीच्या मागील सूचनेचा हा पुढचा भाग आहे. सर्व लॉकरधारक, खातेधारक आणि सर्वसामान्य जनतेच्या लक्षात आणून देण्यात येत आहे की बँक ऑफ महाराष्ट्र, चेंबूर शाखा (८९) सध्या ७०ई, दयानंद सरस्वती रोड, हॉटेल डायमंडच्या बाजूला, चेंबूर गावठाण, चेंबूर, मुंबई ४०००७१ येथे आहे, ती १५ डिसेंबर २०२५ पासून तात्पुरतीपणे दुकान क्र. ए७, ए८ आणि ए९, हब टाउन, सीझन्स कमर्शियल, सीटीएस क्र.५६९ ए, आर.सी. मार्ग, चेंबूर पूर्व, मुंबई-४०००७१ येथे असलेल्या नवीन ठिकाणी स्थलांतरित केली जात आहे.
लॉकरधारकांना याद्वारे वैधानिक सूचना देण्यात येत आहे की ते लॉकर ठेवून घेण्याचा किंवा ते रिकामे करण्याचा त्यांचा विवेक वापरू शकतात. त्याच उद्देशाने, लॉकरधारक आवश्यक कामासाठी कोणत्याही कामकाजाच्या दिवशी बँक ऑफ महाराष्ट्र, चेंबूर शाखेला भेट देऊ शकतात. जर प्रत्यक्ष भेट देणे शक्य नसेल/लॉकरधारकाकडून शक्य नसेल, तर ते त्यांच्या नोंदणीकृत ईमेल आयडीद्वारे त्यांच्या ठेवण्याच्या किंवा बदलाच्या निवडीबद्दल शाखेला कळवू शकतात.
बँकेच्या ग्राहकांना स्थलांतर प्रक्रियेदरम्यान कोणतीही गैरसोय होणार नाही याची खात्री करण्यासाठी बँकेकडून योग्य ती काळजी घेतली जात असल्याचे स्पष्ट करण्यात येते. ग्राहकांना विनंती आहे की त्यांनी वरील बदलाची कृपया नोंद घ्यावी, जो १५.१२.२०२५ पासून तात्पुरता असेल. त्यांना विनंती आहे की त्यांनी सदर प्रभावी तारखेपासून नवीन शाखेत त्यांचे खाते चालवावे. जर आणखी काही स्पष्टीकरण आवश्यक असेल आणि/किंवा कोणतीही अडचण आल्यास ग्राहक संबंधित शाखेच्या शाखा व्यवस्थापकाशी संपर्क साधू शकतात.
**प्राधिकृत अधिकारी,**
**बँक ऑफ महाराष्ट्र**

जाहीर सूचना
आमचे अशिल **मे.बहिणाबाई कन्स्ट्रक्शन (मालकीण - सुरेखा तुकाराम दुधे)** यांच्या सूचनेनुसार, **ज्यांचा कार्यालयीन पत्ता: - कार्यालय क्र.७०८ आणि ७०९, ७वा मजला, महावर आयकॉन, सेक्टर-१५, बेलापूर, नवी - मुंबई, पिन - ४०० ६१४,** येथे स्थावर मालमत्तेच्या संदर्भात सूचना देण्यात येत आहे, जी जमीन **असलेल्या प्लॉट क्र.१६७ (क्षेत्र - ४२०० चौ. मीटर), सेक्टर - ९, जीईएस, गाव - उलवे, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड (यापुढे सदर मालमत्ता म्हणून संदर्भित) च्या सर्व भाग व खंडा**चे मालक / भाडेपट्टाधारक आहे.
लक्षात घ्या की, **महाराष्ट्र शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ लिमिटेड (सिडको) आणि बळीराम देहू कडू आणि इतर (पीव्हीएल - ३ - ४४५६ - २८.०४.२००८)** यांच्यात झालेला सदर प्लॉट क्र.१६७ संदर्भात **२५.०४.२००८ रोजीचा मूळ नोंदणीकृत भाडेपट्टा करार,** हरवला आणि गहाळ झाला आहे.
त्यानुसार, तुकाराम उकदानजी दुधे (सुरेखा तुकाराम दुधे यांचे पती) यांनी पोलिस प्राधिकरणाकडे तक्रार दाखल केली आहे आणि हरवलेल्या मालमत्तेच्या नोंदणीचे पत्र / प्रमाणपत्र, दिनांक १३.०८.२०२५, उलवे पोलिस स्टेशन, नवी - मुंबई यांनी जारी केले आहे.
लक्षात ठेवा की, वर उल्लेखित मूळ कागदपत्रे ताब्यात असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, माझ्या अशिलांच्या किंवा वकीलांच्या कार्यालयाच्या कार्यालयीन पत्त्यावर ती हस्तांतरित करण्याची / सादर करण्याची विनंती केली जाते.
लक्षात घ्या की, उपरोक्त मूळ कागदपत्राचा ताबा असलेल्या कोणत्याही व्यक्तीला आणि सदर मालमत्तेविरुद्ध किंवा त्याच्या कोणत्याही भागाबाबत, वारसा, गहाणखत, वाटप, ताबा, विक्री, भेटवस्तू, धारणाधिकार, शुल्क, विश्वस्तव्यवस्था, परवाना, देखभाल, सुविधा आणि/किंवा भार किंवा अन्यथा इत्यादी कोणत्याही प्रकारे कोणताही दावा असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, या सूचना प्रकाशित झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत, लेखी स्वरूपात आणि त्यावरील ठोस कागदोपत्री पुरावे/प्रमाण देऊन, दावा करणे / आक्षेप घेणे / ते कळवणे आवश्यक आहे.
लक्षात ठेवा की, जर कोणतेही दावे आणि/किंवा आक्षेप सदर विहित कालावधीत प्राप्त झाले नाहीत, तर ते माफ किंवा सोडून दिलेले मानले जातील आणि अनुसूचित मालमत्तेच्या संदर्भात व्यवहार, वाटाघाटी आणि/किंवा व्यवहार अशा कोणत्याही दाव्यांचा/आक्षेपांचा संदर्भ न घेता पूर्ण केले जातील आणि/किंवा अंतिम केले जातील, जे कृपया योग्य काळजी आणि सावधगिरीने लक्षात घ्या.
**अनुसूची**
**(स्थावर मालमत्तेचे वर्णन)**
**प्लॉट क्र.१६७ (क्षेत्रफळ - ४२०० चौ. मीटर), सेक्टर - ९, जीईएस, गाव - उलवे, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**
आज दिनांकित १ डिसेंबर २०२५
**सही/-**
**मे.साई अॅण्ड कं.**
**(मालक - अॅड. सचिन व्ही. साळवे)**
डी-०९, २रा मजला, शांतिनिकेतन कोहौसोलि, आनंद सिनेमाजवळ, रेल्वे स्टेशनसमोर, ठाणे (पूर्व), पिन - ४००६०३.
ईमेल: advsachinsalve@gmail.com

जाहीर सूचना
सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे की, आमचे अशिल खाली नमूद केलेली मालमत्ता हे श्रीमती राजू नंदलाल ठाकूर, राहणार - फ्लॅट क्र.४, तळमजला, सत्यप्रकाश को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड (सदर सोसायटी) प्लॉट क्र.८९, मिलन सबवे जवळ, रोड क्र.१, सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई-४०० ०५४ (मालक) यांच्याकडून खरेदी करण्याचा विचार करीत आहे, मालकाने असे प्रतिनिधित्व केले आहे की चार मूळ मालकी करारांची साखळी उपलब्ध नाही आणि/किंवा मालकाद्वारे हरवली आणि गहाळ झाली आहे.
(१) बिल्डर आणि प्रथम खरेदीदार म्हणजेच झुमनादास लालचंद दुदानी यांच्यात निष्पादित करार.
(२) हस्तांतरणकर्ता म्हणून श्री. झुमनादास लालचंद दुदानी आणि हस्तांतरीती म्हणून श्रीमती अझरा अब्दुल रहीम यांच्यात निष्पादित करार.
(३) हस्तांतरणकर्ता म्हणून श्रीमती अझरा अब्दुल रहीम आणि हस्तांतरीती म्हणून श्री. टेकचंद एन. उदेराणी आणि श्रीमती मधु आर. पेरवानी यांच्यात निष्पादित करार.
(४) हस्तांतरणकर्ता म्हणून श्री. टेकचंद एन. उदेराणी आणि श्रीमती मधु आर. पेरवानी आणि हस्तांतरीती म्हणून श्री. जवाहर टी. बथीजा यांच्यात निष्पादित करार.
वर उल्लेख केलेल्या हरवलेल्या / गहाळ झालेल्या मूळ कागदपत्रांबाबत, सांताक्रूझ पोलिस ठाण्यात २६.११.२०२५ रोजी आवश्यक पोलिस तक्रार दाखल करण्यात आली आहे आणि हरवलेला अहवाल क्र. १५७००८-२०२५ अंतर्गत ती नोंदविण्यात आली आहे. मालकाने आमच्या अशिलाला पुढे असे प्रतिनिधित्व केले आहे की सदर मालमत्ता सर्व भार आणि शुल्कांपासून मुक्त आहे आणि सदर मालमत्तेवर गहाण ठेवून किंवा शुल्क निर्माण करून त्याने कोणतेही कर्ज / वित्तपुरवठा केलेला नाही आणि सदर मालमत्तेवरील त्याचे हक्क स्पष्ट आणि विक्रीयोग्य आहे.
म्हणूनच, कोणा व्यक्तिस खाली नमूद केलेल्या मालमत्तेबाबत किंवा तिच्या कोणत्याही भागाबाबत आमच्या अशिलांद्वारे अधिग्रहित केलेल्या मालमत्तेवर परिणाम करणाऱ्या कोणत्याही करार, विक्री, गहाणखत, धारणाधिकार, शुल्क, भेटवस्तू, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, भाडेतत्वाअंतर्गत, देवाणघेवाण, सुविधा, प्रतिबंधात्मक किंवा इतर करार किंवा अटी, भार किंवा अन्यथा, किंवा त्या अंतर्गत किंवा कोणत्याही स्वरूपात याद्वारे कोणताही हिस्सा हक्क, शिर्षक, हितसंबंध किंवा कोणताही दावा असल्यास त्यांनी ही सूचना प्रकाशित झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, सहाय्यक पुराव्यांसह, ते लेखी स्वरूपात अधोस्वाक्षरीकर्त्याला कळवणे आवश्यक आहे. जर कोणतेही दावे किंवा आक्षेप १४ दिवसांच्या आत किंवा नंतर प्राप्त झाले नाहीत, तर असे दावे किंवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत आणि ते सोडून दिलेले किंवा माफ केलेले मानले जातील आणि आमचे क्लायंट सदर मालमत्ता खरेदी करण्याच्या वैधानिक औपचारिकता पूर्ण करण्यासाठी त्यानुसार पुढे जातील.
**मालमत्तेची अनुसूची**
फ्लॅट क्र.४, मोजमाप १०५० चौ.फूट बिल्ट अप क्षेत्र असून ते सत्यप्रकाश को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, रोड क्र. ०१, मिलन सबवे जवळ, सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई–४०० ०५४ येथे तळमजल्यावर स्थित आहे, यासह सदर सोसायटीने दिनांक ०५.०६.१९६५ रोजी जारी केलेल्या दुय्यम भाग प्रमाणपत्र क्र.०८ अंतर्गत विशिष्ट क्र.१०६ ते ११० असे प्रत्येकी रू.५० चे ५ पूर्णपणे भरणा केलेले शेअर्स सदर इमारतीची रचना प्लॉट क्र.८९, सी.टी.एस. क्र. १६८९, गाव : विले पार्ले (पश्चिम), तालुका : अंधेरी, जिल्हा : मुंबई उपनगर येथे बांधकामित.
आज दिनांकित १ डिसेंबर २०२५.
**सही/-**
**कीर्ती नागदा अॅण्ड असोसिएट्स**
**वकील उच्च न्यायालय,**
६०५, ६वा मजला, सी विंग, ईस्टर्न कोर्ट बिल्डिंग, बरिस्ता रेस्टॉरंटच्या वर, तेजपाल रोडचे जंक्शन आणि पार्लेस्वर रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०० ०५७
रामेश्वर मिडीया

# पोप लिओ चौदावे यांची इस्तंबूलच्या ब्लू मशिदीला भेट

■ इस्तंबूल

**मे** महिन्यात पोप लिओ चौदावे यांनी पद स्वीकारल्यानंतर पहिल्यांदाच इस्तंबूलच्या सुलतान अहमद (ब्लू) मशिदीला भेट दिली. मात्र ते प्रार्थना करण्यासाठी थांबले नाही. तुर्कीच्या धार्मिक व्यवहार विभागाच्या प्रमुखाने लिओ यांना १७ व्या शतकातील या मशिदीचा उंच घुमट आणि तिच्या स्तंभांवर अरबी शिलालेख दाखवली.

पोप मशिदीत प्रवेश करताना मुस्लिमांनी स्वागत केले आणि त्यांना पाहण्यासाठी मुस्लिमांनी एकच गर्दी केली. तुर्की आणि लेबनॉनच्या पोपच्या भेटीचे नियोजन पोप फ्रान्सिस यांनी केले होते. त्यानंतर त्यांचे निधन झाल्यानंतर मे महिन्यात पोप लिओ चौदावा यांची पोपपदी निवड झाली. आता पोप लिओ ४ दिवसांच्या तुर्कीच्या दौऱ्यावर आहेत, त्यानंतर ते लेबनॉनला भेट देतील.

# ओघात बोललो! तिजोरीबद्दल अजित पवार यांचे स्पष्टीकरण

■ पुणे

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांच्या प्रचारावेळी 'राज्याच्या तिजोरीची चावी माझ्याकडे आहे,' असे वक्तव्य केले होते. यावरून महायुतीतच कलगीतुरा रंगल्याचे दिसले. यावर आज पुण्यातील भोर येथे अजित पवारांनी बोलण्याच्या ओघात आलेले वक्तव्य होते. माझ्यापेक्षा जास्त अधिकार मुख्यमंत्र्यांकडे आहेत, हे मी मान्य करतो, असे स्पष्टीकरण दिले.

भोर येथे गेल्या आठवड्यात नगर परिषद निवडणूक प्रचाराच्या उद्घाटनावेळी अजित पवार यांनी तिजोरी चावी आपल्याकडे असल्याचे विधान केले होते. त्यावरून भाजपा मंत्री चंद्रकांत पाटील यांनी देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असल्याचे सांगत पवारांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतरच आज अजित पवारांचे स्पष्टीकरण समोर आले आहे. त्यांनी स्पष्टीकरण दिले की, ती तिजोरी अजित पवारच्या बापाची नाही किंवा इतरांचीही नाही, ती राज्याच्या जनतेची आहे.

# 'व्ही. शांताराम'मध्ये तमन्नाची एंट्री



**गेल्या** काही दिवसांत बायोपिक सिनेमांच्या वाढत्या लाटेत दिग्दर्शक अभिजित देशपांडे यांच्या चित्रपती व्ही. शांताराम या महत्त्वाकांक्षी चित्रपटाची चर्चा अधिक जोमाने सुरू झाली आहे. या चित्रपटात सिद्धांत चतुर्वेदी प्रमुख भूमिका साकारणार असल्याची माहिती मध्यंतरी समोर आली होती. आता या चित्रपटासाठी अभिनेत्री तमन्ना भाटियाची प्रमुख भूमिकेसाठी निवड झाल्याचे समजते.

तमन्नाने अलीकडील काळात आपल्या अभिनयाची छाप उमटवली असून, विविधांगी व्यक्तिरेखा साकारण्याची तिची क्षमता सिद्ध झाली आहे. या चित्रपटातही ती वास्तव आयुष्यातील एक व्यक्तिरेखा साकारणार असून, कथानकाच्या दृष्टीने ही भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले जात आहे. या भूमिकेबाबत तमन्ना उत्साहित असल्याचेही समजते.

अभिजित देशपांडे यांनी यापूर्वी 'आणि डॉ. काशिनाथ घाणेकर' या चरित्रपटाचे दिग्दर्शन केले होते. याखेरीज 'नटसम्राट'सह काही लक्षवेधक मराठी व हिंदी चित्रपटांचे लेखनही त्यांनी केले आहे. त्यामुळे 'चित्रपती व्ही. शांताराम'कडूनही अपेक्षा वाढल्या आहेत. व्ही. शांताराम हे भारतीय चित्रपटसृष्टीतील प्रतिभावंत निर्माते, दिग्दर्शक, नट व पटकथाकार म्हणून सुपरिचित आहेत. कोल्हापुरात जन्मलेले शांतारामबापू परिश्रम, कल्पकता व स्वयंप्रेरणा यांच्या बळावर शिकत जाऊन ते श्रेष्ठ दिग्दर्शक बनले. पुण्यात बाबूराव पेंटर यांच्या मार्गदर्शनाखाली चित्रपटनिर्मितीचे धडे गिरवले आणि 'झनक झनक पायल बाजे', 'दो आंखें बारह हाथ' यांसारख्या चित्रपटांद्वारे हिंदी चित्रपटसृष्टीवर अविस्मरणीय ठसा उमटवला. विलक्षण शैली, प्रयोगशीलता आणि सामाजिक जाणीव यामुळे त्यांची कारकीर्द प्रभावशाली राहिली. प्रभातने व्ही. शांताराम यांच्या दिग्दर्शनाखाली गोपाळकृष्ण, खुनी खंजर, रानीसाहिबा, उदयकाल, जुलूम, चंद्रसेना यांसारखे पौराणिक आणि देमार मूकपट निर्माण केले. अमृतमंथन या १९३४ मध्ये आलेल्या चित्रपटात व्ही. शांताराम यांनी आपले तांत्रिक कौशल्य सिद्ध केले. चमत्कृतीपूर्ण थरारक दृश्ये, तसेच नामवंत अभिनेते यामुळे हा भारतातील पहिला रौप्यमहोत्सव साजरा करणारा चित्रपट ठरला. व्ही. शांताराम दिग्दर्शित सैरंध्री हा भारतीय चित्रपटसृष्टीतील 'बायपॅक' पद्धतीने तयार केलेला पहिला रंगीत बोलपट होता. अशा असामान्य प्रतिभावंताचा बायोपिक हा निश्चितच उत्कंठावर्धक असणार आहे. तम्मन्ना आणि सिद्धांत यांची जोडी आणि अभिजित देशपांडेंचे लेखन-दिग्दर्शन यामुळे हा प्रकल्प सध्या बॉलिवूडमध्ये सर्वाधिक चर्चेत असलेल्या चित्रपटांपैकी एक ठरत आहे.

# रणदीप-लीनची 'गोड बातमी'



गेल्या काही दिवसांत बॉलिवूडमध्ये एकामागून एक 'गुड न्यूज' ऐकायला मिळत आहेत. आता या यादीमध्ये अभिनेता रणदीप हुड्डा आणि त्याची पत्नी, अभिनेत्री व उद्योजिका लीन लैशराम यांचाही समावेश झाला आहे. आपल्या लग्नाच्या वाढदिनी म्हणजे २९ नोव्हेंबरला, या दाम्पत्याने पहिल्या अपत्याची चाहूल लागल्याची माहिती चाहत्यांसोबत शेअर केली आणि ही बातमी त्वरित सोशल मीडियावर चर्चेचा केंद्रबिंदू ठरली. रणदीप आणि लिन यांनी त्यांच्या पोस्टमध्ये लिहिले, प्रेम, रोमांचाची दोन वर्षे, आणि आता... एक छोटा पाहुणा येणार आहे. सोशल मीडियावर या पोस्टला ७,००० पेक्षा जास्त लाईक्स आणि शेकडो कमेंट्स मिळाल्या आहेत. 'पंचायत' अभिनेता फैजल मलिक यांनी लाल हृदय असलेले इमोजी पोस्ट करत 'मुबारक हो' असे लिहिले आहे. रणदीप आणि लिन यांनी २०२३ मध्ये पारंपरिक मणिपुरी विधीमध्ये अतिशय साध्या पद्धतीने आणि निकटवर्तीयांच्या उपस्थितीत लग्न केले होते. त्याआधीपर्यंत दोघांनी आपली रिलेशनशिप गोपनीय ठेवली होती. या दोघांचेही चित्रपटसृष्टीतील काम, व्यावसायिक दृष्टीकोन, निसर्गप्रेम आणि जमिनीवर पाय ठेवून जगण्याची वृत्ती यामुळे त्यांना उद्योगात वेगळे स्थान मिळाले आहे. आता पहिल्या अपत्याच्या आगमनाने त्यांच्या नात्याला नवा अर्थ लाभत असून कुटुंबीय, मित्र आणि चाहत्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. सोशल मीडियावरून व्यक्त होणारे आनंदाचे संदेश या जोडप्यावरील प्रेम आणि त्यांच्या नात्यातील स्थिर भावनांचा पुरावा देतात. आयुष्यात येणाऱ्या या नव्या सदस्यामुळे त्यांच्या सहजीवनात आणखी आनंदाचे क्षण पसरतील, अशीच चाहत्यांची अपेक्षा आहे. लिन लैशरामने 'जाने जान', 'मैरी कॉम', 'एक्सोन' सारख्या चित्रपटांमध्ये अभिनय केला आहे. २००७ मध्ये आलेल्या 'ओम शांति ओम' चित्रपटातही तिने छोटी भूमिका केली होती.

# श्वेताचा पहिला भयपट



**गेल्या** काही दिवसांत श्वेता त्रिपाठीने चित्रनिर्मितीच्या क्षेत्रात टाकलेले नवे पाऊल विशेष चर्चेत आले आहे. आपल्या बंदरफुल फिल्म्स या बॅनरखाली आणि कोवातांडा फिल्म्स इंडियाच्या सहकार्याने ती 'नावा' हा तिचा पहिला हॉररपट निर्माण करत आहे. यापूर्वी 'मुझे जान न कहो मेरी जान' या क्विअर ड्रामाद्वारे श्वेताने आपली निर्मितीक्षमता सिद्ध करत स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. धाडसी आणि सांस्कृतिक मूल्यांवर आधारित कथानकांबाबतची तिची बांधिलकी या नव्या प्रकल्पातून अधिक ठळक होते. 'नावा'चे कथानक सुंदरबनच्या मोहक पण भयप्रद दलदलीच्या परिसरावर आधारलेले आहे. भौगोलिक वैशिष्ट्यांबरोबरच सुंदरबनातील लोककथांचे विश्वही मोठे आहे. या कथेतली नायिका तारा आपल्या पूर्वजांच्या घरात परतते आणि पिढ्यानपिढ्या दडलेल्या रहस्यांच्या, नदीदेवांच्या आस्थेच्या आणि मिथकांच्या मिश्रणातून तयार झालेल्या एका भीषण कोड्यात गुरफटत जाते. आकाश मोहिमे यांनी लिहिलेली ही कथा लोककथांचे गूढ नव्याने उकलण्याचा प्रयत्न करणारी आहे. याबाबत श्वेता सांगते की, स्वतःला वेगळ्या धाटणीच्या कथाभूमीशी जोडण्याची माझी खूप दिवसांपासून इच्छा होती. 'नावा' हा माझ्यासाठी निर्माती म्हणून एक महत्त्वाचा टप्पा आहे. लोककथा आणि संस्कृतींचे मिश्रण असणारा भयपट अनपेक्षितपणे प्रेक्षकांना भिडणारा ठरू शकतो, असे मला वाटते. सुंदरबनातील रहस्यांविषयीची ही कथा जसजशी ऐकत गेले तसतशी मी भारावून गेले. चित्रपट संपल्यानंतरही त्याचे तरंग प्रेक्षकांच्या मनात दीर्घकाळ राहतील अशा कथा समर्थपणे उभ्या करणे हे आपले उद्दिष्ट असल्याचे ती स्पष्ट करते.

# 'ओटीटी'वर डिसेंबर धमाका!



कॅलेंडरीय वर्षाचा अखेरचा महिना ओटीटीसाठी रंगतदार ठरणार आहे. येत्या काही दिवसांमध्ये ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटांची आणि वेबसीरीजची मोठी यादी समोर आली आहे. ती पाहता प्रेक्षकांसाठी संपूर्ण महिना मनोरंजनाने भरलेला ठेवण्याची तयारी झाल्याचे दिसते.

* पाच डिसेंबरला झी-५ वर 'घरवाली-पेडवाली' ही सुपरनॅचरल कॉमेडी मालिका येत आहे. पृथ्वी मिश्रा उर्फ जीतूला आयुष्यभर सर्व गोष्टी दुप्पट होण्याचा शाप मिळतो आणि त्याच्या आई-वडिलांपासून ते पत्नीपर्यंत सर्वकाही दुहेरी होऊ लागते, अशी गमतीशीर कथा या मालिकेतून दाखवली आहे.

* नऊ डिसेंबरला सोनी लिववर 'रिअल काश्मीर फुटबॉल क्लब' ही वेबसीरीज येत आहे. यामध्ये मानव कौल एका काश्मीरी हिंदू पंडित आणि काश्मीरी मुस्लीम यांचा सत्यकथेवर आधारित संघर्षमय प्रवास दाखवत आहेत. दोन वेगवेगळ्या पार्श्वभूमीचे लोक सामाजिक आणि राजकीय आव्हानांना तोंड देत देशातील सर्वोच्च फुटबॉल लीगसाठी स्वतःची टीम उभी करतात, असा या वेबसीरीजच्या कथानकाचा आशय आहे.

* १२ डिसेंबर रोजी झी ५ वर टिस्का चोप्रा दिग्दर्शित 'साली मोहब्बत' प्रदर्शित होत आहे. या सायको थ्रीलरमध्ये राधिका आपटे प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. त्याच दिवशी नेटफ्लिक्सवर 'सिंगल पापा' रिलीज होणार असून आई नसताना वडील मुलांची काळजी घेत घर आणि बाहेरच्या सर्व जबाबदाऱ्या कशी पेलतात, याबाबतचे वास्तव या चित्रपटातून मांडले आहे. कुणाल खेमू आणि मनोज पाहवा प्रमुख भूमिकांत आहेत.

* १६ डिसेंबरला नेटफ्लिक्सवर 'एक दिवाने की दिवानियत' ही हर्षवर्धन राणे आणि सोनम बाजवा यांची सुपरहिट फिल्म ओटीटीवर दाखल होणार आहे. वर्ड ऑफ माऊथ पब्लिसिटीमुळे थिएटरमध्ये हिट ठरलेल्या या चित्रपटाची ओटीटीवरील कामगिरी आता लक्षवेधी ठरणार आहे. त्याच दिवशी प्राईम व्हिडिओवर आयुष्मान खुराना आणि रश्मिका मंदाना यांची 'थामा'ही प्रेक्षकांसमोर येणार असून थिएटरनंतर ओटीटीवरही ती चांगली लोकप्रियता मिळवण्याची शक्यता आहे.

* १९ डिसेंबरला नेटफ्लिक्सवर 'रात अकेली है: द बंसल मर्डर्स' हा सिक्वेल प्रदर्शित होणार आहे. नवाजुद्दीन सिद्दीकीच्या या क्राइम थ्रिलरमध्ये एका श्रीमंत कुटुंबातील खूनप्रकरणाची गुंतागुंत कशी उलगडत जाते हे दाखवण्यात आले आहे. दिग्दर्शक हनी त्रेहन यांनी कथेला थरारक वळण दिले आहे. याच दिवशी जिओ हॉटस्टारवर 'मिसेस देशपांडे' ही माधुरी दीक्षितची सायको थ्रिलर सीरीज येत आहे. यामध्ये धकधक गर्ल एका साध्या गृहिणीच्या रूपात दिसत असली तरी ती प्रत्यक्षात सिरीअल किलर असल्याचे समोर येते, असे या मालिकेत दाखवण्यात आले आहे.

* २६ डिसेंबरला नेटफ्लिक्सवर 'सिंगल सलमा' प्रदर्शित होत आहे. हुमा कुरेशीचा हा चित्रपट थिएटरमध्ये लक्षवेधी ठरल्याने ओटीटीवरील त्याच्या पुनरागमनाकडे प्रेक्षकांचे लक्ष आहे. नचिकेत सामंत दिग्दर्शित ही कथा पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर चर्चेत येण्याची शक्यता आहे.

# श्रेयाच्या शिरपेचात मानाचा तुरा



**'बंदिश** बँडिटस्-२' या वेबसीरिजने आपल्या प्रवासात आणखी एक मोठा टप्पा गाठला असून गोवा येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२५- 'इफ्फी'मध्ये या सीरिजने सर्वोत्कृष्ट वेब सीरिज (ओटीटी) हा मानाचा किताब जिंकला आहे. मनाला भिडणारे संगीत, प्रेक्षकांना शेवटपर्यंत गुंतवून ठेवणारे कथानक आणि दमदार अभिनय यांच्या बळावर ही मालिका देशातील सर्वाधिक लोकप्रिय ओटीटी शोमध्ये गणली जात होती. आता या पुरस्काराने तिच्या प्रतिष्ठेत आणखी भर घातली आहे. या सन्मानामुळे मालिकेची अभिनेत्री श्रेया चौधरीसह संपूर्ण टीम आनंदात आहे. श्रेयासाठी तर हा पुरस्कार अधिकच खास ठरला आहे. आपल्या आजवरच्या अभिनय कारकिर्दीतील सर्वाधिक समाधान देणाऱ्या संधींपैकी एक म्हणून ती या वेबसिरीजचे वर्णन करते. 'इफ्फी'कडून मिळालेला हा सन्मान माझ्यासाठी स्पेशल असल्याचे सांगतानाच ती हे संपूर्ण टीमचे यश आहे, असा कृतज्ञभावही व्यक्त करते. प्रेक्षकांचे अखंड प्रेम, सहकाऱ्यांचा उत्साह आणि मालिकेने दिलेली चमक दाखवण्याची संधी आपल्यासाठी अतिशय महत्त्वाची ठरली, असे श्रेया म्हणाली.

हेल्दी Me

# समस्या मधुमेही आईच्या बालकांच्या

**मधुमेही आईच्या पोटी वाढणाऱ्या बाळाला सतत जास्त प्रमाणात रक्तातील साखरेचा संपर्क येतो आणि त्यामुळे त्याच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. गर्भावस्थेत मधुमेह दोन प्रकारचा असतो. पहिला म्हणजे गर्भावस्थेतच निर्माण होणारा 'जेस्टेशनल डायबेटीस' आणि दुसरा म्हणजे गर्भधारणेपूर्वीपासून असलेला 'प्री-जेस्टेशनल डायबेटीस'. जर गर्भावस्थेत आईचा मधुमेह नीट नियंत्रित ठेवला गेला नाही, तर गर्भाच्या वाढीवर परिणाम होतो आणि प्रसूतीच्या वेळी तसेच त्यानंतर अनेक अडचणी निर्माण होतात.**

व्याधीचिकित्सा

अशा बाळांचे वजन इतर बाळांच्या तुलनेत जास्त असते. त्यामुळे नैसर्गिक प्रसूती कठीण होते, नसा दुखावण्याची किंवा जखम होण्याची शक्यता वाढते आणि 'सिझेरियन डिलिव्हरी'चे प्रमाण जास्त दिसते. जन्मल्यानंतर अशा बाळांना पहिल्या काही दिवसांत रक्तशर्करा खूप कमी होण्याची म्हणजेच 'हायपोग्लायसेमिया'ची शक्यता जास्त असते. कारण गर्भावस्थेत आईकडून जास्त प्रमाणात ग्लुकोज मिळाल्यामुळे बाळाच्या शरीरात इन्सुलिनचे प्रमाण जास्त झालेले असते. जन्मानंतर तेच इन्सुलिन रक्तातील साखर पटकन कमी करते आणि रक्तशर्करा स्थिर होण्यासाठी काही दिवस लागतात. मधुमेही आईच्या बाळांना अनेक प्रकारच्या समस्या उद्भवू शकतात. त्यामध्ये पूर्ण वाढ न झालेल्या फुफ्फुसांमुळे श्वसनाचा त्रास, रक्तातील लाल पेशींची जास्त निर्मिती म्हणजेच पॉलीसायथीमिया, बिलिरुबिनचे प्रमाण जास्त झाल्यामुळे जॉन्डिस, हृदयाच्या स्नायूंची जाडी वाढणे यांचा समावेश होतो. जर आईचा मधुमेह गर्भधारणेच्या सुरुवातीपासूनच नीट नियंत्रित नसेल, तर बाळामध्ये जन्मजात दोष दिसू शकतात. तसेच गर्भपात किंवा स्टिलबर्थ होण्याची शक्यता वाढते.

गर्भावस्थेत रक्तशर्करा नियंत्रित न राहिल्यास बाळाचे वजन जास्त असणे, काही गंभीर प्रकरणांत बाळ लहान असणे, त्वचेचा निळसर रंग, जलद श्वासोच्छवास, वेगवान हृदयगती, अशक्त रडणे, दूध नीट न शोषणे, झटके येणे, चेहरा फुगणे, थरथर कापणे आणि जॉन्डिस या समस्यांचा बाळाला सामना करावा लागू शकतो. तपासण्यांमध्ये गर्भधारणेच्या शेवटच्या टप्प्यात अल्ट्रासाऊंड करून गर्भाच्या आकारावर लक्ष ठेवले जाते. क्वचित प्रसंगी गर्भाच्या फुफ्फुसांची परिपक्वता तपासली जाते. जन्मल्यानंतर बाळाची रक्तशर्करा तासाभरात तपासली जाते आणि ती काही दिवस नियमित तपासली जाते. हृदय-फुफ्फुस कार्य तपासले जाते, बिलिरुबिनची पातळी मोजली जाते आणि गरज भासल्यास हृदयाचा इकोकार्डिओग्राम केला जातो. बहुतेक वेळा बाळाचे त्रास काही तासांत,




दिवसांत किंवा आठवड्यांत कमी होतात. हृदयाची जाडी सुधारण्यासाठी मात्र काही महिने लागू शकतात. क्वचित प्रसंगी रक्तशर्करा इतकी कमी होते की मेंदूला इजा होऊ शकते. गुंतागुंतींमध्ये मृतजन्म, जन्मजात हृदयदोष, अपूर्ण फुफ्फुसे, जास्त बिलिरुबिन, निओनेटल पॉलीसायथीमिया, आतड्यांमध्ये लहान डाव्या कोलन सिंड्रोम यांचा समावेश होतो. प्रतिबंध म्हणून गर्भावस्थेत मधुमेह असलेल्या महिलांनी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. रक्तशर्करा नियंत्रणात ठेवल्यास अनेक समस्या टाळता येतात. तसेच जन्मानंतर बाळाचे पहिले काही दिवस नीट निरीक्षण केल्यास हायपोग्लायसेमियामुळे होणारे गंभीर परिणाम टाळता येतात. उपचारांमध्ये रक्तशर्करेचे नियंत्रण महत्त्वाचे असते. जन्मानंतर लगेच स्तनपान किंवा पूरक आहार दिल्यास सौम्य प्रकरणात फायदा होतो. जर दूध उपलब्ध नसेल तर डोनर मिल्क किंवा फॉर्म्युला द्यावे लागते. अनेक रुग्णालयांत आता बाळाच्या गालात ग्लुकोज जेल दिले जाते. जर रक्तशर्करा वाढली नाही, तर शिरेतून द्रवपदार्थासोबत ग्लुकोज दिले जाते. गंभीर प्रकरणांत नाभीच्या शिरेतून काही दिवस साखरेचे द्रावण दिले जाते. कधीकधी श्वसन सहाय्यक औषधे देण्याची गरज भासते.

सिमंधर महानारायण वात बाम
एक प्रभावी उपाय
अकडन कंबर दुखी
सांधे दुखी पाठ दुखी
To Order Scan Here
Simandhar
|| तैलमेतत्प्रयोक्तव्यं सर्ववातनिवारणम् ||
HELPLINE NO .: 7045355632

## हेल्दी टिप्स




बाळाला लोहाची कमतरता होऊ नये यासाठी कलिंगड, चिक्कू या फळांचे रस, मिल्कशेक, पालेभाज्या, खजूर, काळ्या मनुका, शेवया गूळ यांचा वापर केलेले सूप द्यावे.



मोहरीच्या दाण्यांमध्ये ग्लुकोसीनोलेट असतात. ते कर्करोगाच्या पेशी वाढण्यास रोखतात. मोहरीच्या छोट्या छोट्या दाण्यांमध्ये सेलेनियम आणि मॅग्नेशियम ॲण्टीऑक्सिडंट देखील असतात. हे घटक ऱ्हुमेटाईड आर्थरायटीसचा मुकाबला करण्यासाठी लाभकारी असतात. छातीत आखडलेपण असेल किंवा मायग्रेनचा त्रास असल्यास यावरही मोहरीच्या सेवनामुळे आराम मिळतो. काहींच्या मते माशांसोबत मोहरीचे दाणे शिजवले जातात तेव्हा मासे किंवा अन्य पदार्थातील ओमेगा थ्रीचे प्रमाण वाढते.

# ब्लड रिपोर्ट वाचताना...





**कम्प्लीट** ब्लड काउंट अर्थात सीबीसी ही रक्ताची तपासणी आरोग्य तपासणीत सर्वात महत्त्वाची मानली जाते. यावरुन शरीरातील रक्तातील हिमोग्लोबिन, लाल पेशी, पांढऱ्या पेशी आणि प्लेटलेट्स यांची स्थिती समजते.

हिमोग्लोबिन म्हणजे रक्तातील प्रथिन जे शरीराच्या प्रत्येक भागापर्यंत ऑक्सिजन पोहोचवते. पुरुषांमध्ये साधारण १३ ते १७ ग्रॅम प्रति डेसिलिटर आणि महिलांमध्ये १२ ते १५ ग्रॅम प्रति डेसिलिटर एवढे प्रमाण योग्य मानले जाते. त्यापेक्षा कमी असल्यास शरीरात ॲनिमिया, लोहाची कमतरता किंवा जीवनसत्वांची कमतरता असू शकते.

लाल रक्तपेशींची संख्या आणि त्यांचा आकारही तपासला जातो. पेशींचा आकार खूप लहान असल्यास लोहाची कमतरता आहे असे मानले जाते; तर पेशी खूप मोठ्या असल्यास जीवनसत्व बी बारा किंवा फॉलिक ॲसिड कमी असल्याचे ते लक्षण मानले जाते. प्रत्येक लाल पेशीत किती हिमोग्लोबिन आहे यावरून शरीरात ऑक्सिजन पुरवठा व्यवस्थित आहे का ते समजते. पांढऱ्या रक्तपेशींना शरीराचे सैनिक म्हटले जाते, कारण त्या संसर्गाविरुद्ध लढतात. या पेशींचे शरीरातील सामान्य प्रमाण ४००० ते ११ हजार प्रति मायक्रोलिटर इतके मानले जाते. या पेशी जास्त असल्यास शरीरात संसर्ग, दाह किंवा क्वचित प्रसंगी रक्ताचा कर्करोग यांचे निर्देशक ठरते. याउलट या पेशी कमी असल्यास व्हायरल संसर्ग, काही औषधांचे परिणाम किंवा बोन मॅरोशी संबंधित समस्या असू शकतात.

डिफरेंशियल काउंटमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या पांढऱ्या पेशींचे प्रमाण तपासले जाते. उदाहरणार्थ ईऑसिनोफिल्स जास्त असल्यास अलर्जी किंवा कृमी याचे संकेत मिळतात. प्लेटलेट्स या रक्त गोठवण्याचे काम करतात. त्यांचे प्रमाण १.५ लाख ते ४.५ लाख प्रति मायक्रोलिटर योग्य मानले जाते. प्लेटलेट्स कमी असल्यास डेंग्यू, मलेरिया किंवा इतर व्हायरल आजार असू शकतात. प्लेटलेट्स जास्त असल्यास शरीरात दाह, लोहाची कमतरता किंवा बोन मॅरोशी संबंधित विकार असू शकतात.

हेमाटोक्रिट म्हणजे रक्तातील द्रव आणि पेशींचे प्रमाण. आरडीडब्ल्यू म्हणजे पेशींच्या आकारातील विविधता. या सर्वांचे प्रमाण पाहणेही महत्त्वाचे असते. सोप्या शब्दांत सांगायचे तर सीबीसी रिपोर्ट हा आपल्या शरीराची रक्ताशी संबंधित आरोग्यस्थिती दर्शवणारा आरसा असतो. या रिपोर्टमध्ये काही आकडे लाल किंवा हिरव्या रंगात जास्त कमी दाखवलेले दिसले तरी तो नेहमी गंभीर आजाराचा संकेत असेलच असे नाही. शरीराची स्थिती, लक्षणे आणि इतर तपासण्या यांच्याशी जोडूनच त्याचे खरे निदान होते. त्यामुळे स्वतः रिपोर्ट वाचताना घाबरण्यापेक्षा डॉक्टरांचा सल्ला घेणे हेच योग्य ठरते.

**(डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही उपचार करू नयेत.)**

# समस्या डेंटल ॲब्सेसची



**दंत** संसर्ग म्हणजेच दातांमध्ये होणारे जंतूसंसर्ग हे ओळखायला सोपे असले तरी त्यांचे तात्काळ व्यवस्थापन करणे अनेकदा कठीण ठरते. यामध्ये डेंटल ॲब्सेस किंवा पेरिॲपिकल इन्फेक्शन यांचा समावेश होतो. हे प्रामुख्याने दातांची किड (डेंटर कॅरीज), दातांना झालेला आघात (ट्रॉमा) किंवा रूट कॅनॉल उपचार अपयशी ठरल्यामुळे होतात. जर याकडे दुर्लक्ष केले गेले तर हे संसर्ग तीव्र वेदना देतातच, पण यापुढे जाऊन मानेला लागून असलेल्या भागात (डीप नेक स्पेस) किंवा कवटीतील सायनसपर्यंत पसरू शकतात. म्हणूनच योग्य वेळी तपासणी, उपचार गरजेचे ठरतात. यामुळे वेदनाशमन तर होतेच, शिवाय गंभीर गुंतागुंती टाळता येतात.


डेंटल ॲब्सेस बहुधा दातांची किड, दातांची स्वच्छता न राखणे, आघात, किंवा अर्धवट आलेले अक्कलदाढ येणे यामुळे होतात. दातांच्या इनॅमलमध्ये भेग पडली की तोंडातील जंतू पल्पमध्ये पोहोचतात आणि संसर्ग सुरू होतो. पल्पमधील जंतू दाताच्या मुळातून खाली जबड्यात किंवा वरच्या जबड्यात पसरतात. काही अनुवंशिक कारणे (उदा. अमेलोजेनेसिसची दोषपूर्ण रचना), दात घासण्याची सवय, तसेच धूम्रपान किंवा अमली पदार्थ हेही कारणीभूत असतात.

दातांची कीड ही सर्वत्र आढळणारी समस्या आहे. अमेरिकेत २० ते ६४ वयोगटातील तब्बल ९१% लोकांमध्ये दात किडलेले आढळले आहेत. त्यातील जवळपास २७ टक्के लोकांनी उपचारच केलेले नाहीत. अशा लोकांमध्ये डेंटल ॲब्सेस होण्याचे प्रमाण जास्त असते.भारतात यापेक्षा स्थिती बरी असू शकते. पण यावरून समाजातील दंतआरोग्याबद्दलची उदासीनता आणि सामाजिक-आर्थिक घटकांचे महत्त्व स्पष्ट होते.

**लक्षणे व तपासणी :** रुग्ण तीव्र वेदना, दातांच्या स्वच्छतेची कमतरता, दाताला झालेला आघात, चेहऱ्यावर सूज, ताप, गिळण्यास त्रास, लसिका ग्रंथी सुजणे अशा लक्षणांसह येतात. काही वेळा मानसिक स्थितीत बदल किंवा श्वास घेण्यास त्रास दिसल्यास तातडीने उपाय करणे आवश्यक असते. डेंटल ॲब्सेस ओळखण्यासाठी एक्स-रे, सीटी स्कॅन, एमआरआय यांचा उपयोग होतो. रक्त तपासणीत पांढऱ्या पेशींची संख्या वाढलेली दिसते.

**उपचार :** उपचारात अँटिबायोटिक्स, वेदनाशमन आणि संसर्ग झालेल्या दातावर योग्य उपाय (रूट कॅनॉल किंवा दात उपटणे) यांचा समावेश होतो. साध्या प्रकरणात तोंडावाटे दिलेली औषधे व दंतवैद्याकडे वेळेवर भेट पुरेशी ठरते. वेळेवर उपचार घेतल्यास रुग्ण बरा होतो, अन्यथा समस्या वाढून दात गमवावा लागतो.

# नवाकाळ शब्दकोडे-१४४७



**आडवे शब्द –**

२. हवाई प्रवासाचे वाहन ४. वेचक, निवडक ६. कुंतीची सवत ७. दक्ष ९. शहानिशा न करता डोळे झाकून ठेवलेला विश्वास १०. नुकसान ११. भरपूर (तयारी) १२. गोट्यांच्या खेळातील मोठी पांढरी गोटी १३. नगर, पुर १४. सुरक्षित १६. कालखंड, मृत्यू १७. पालट, फेरफार १९. गचांडी २२. दहावे नक्षत्र २३. पडताळणी २५. मृग २६. पथक, तुकडी २८. वीज, बिजली ३०. मिरवणुकीतले मोठे तालवाद्य ३१. मिसळणे, काला करणे ३३. दुर्ग, किल्ला ३४. कणव ३५. पाठीच्या कण्यातील हाड ३७. तुरंग, घोडा ३८. जंगल ३९. माळेतील घटक, गोलक ४०. नाचगाण्यांचा कार्यक्रम ४२. रास ४३. ऊबदार पांघरूण ४५. अडचण ४६. आरंभीचा ४७. धीर सोडणे, नाउमेद होणे ४९. लाडिक ४१. काव्य करणारा ५२. त्रास ५४. धृतराष्ट्राची मुले ५५. उष्णता ५६. अर्थार्जन करणारा, मिळवता ५८. इच्छा, मनीषा ५९. टेकडी, डोंगराचा उतार ६२. स्त्रियांचे एक व्रत xxx चौथ ६३. पवित्र ६४. पलीकडे ६६. दणकट ६८. फूटपाथवर थाटलेले दुकान ७०. कलंक, काळिमा ७२. तुळशीच्या काडीला वात गुंडाळून केलेला काकडा ७४. कपर्दिक ७५. मोठी नदी ७६. सिद्ध, सज्ज ७७. चेहरा ७८. दिमाख, शान ८०. फाजील, वात्रट ८१. घासले जाणे ८२. हिरमोड ८३. कोवळी पाने ८४. ओरखडा ८५. पराभव ८७. रान ८८. घोड्याच्या पायाला ठोकलेला पत्रा ८९. युवती ९२. एखादी गोष्ट अतिरंजित करून सांगणे ९३. मोठा प्रवाह ९५. नशीब, प्रारब्ध ९६. पवित्र ९८. ढोंग ९९. संतप्त अवतार १०१. पांगापांग, धुव्वा १०२. भोळसर, अजागळ, बावळा १०३. चिकित्सा

**उभे शब्द –** १. श्रीकृष्ण २. दगाबाज ३. उदाहरण, नमुना ४. कृषी ५. नेत्रांजन ६. महत्त्व ७. किमया, चमत्कार ८. कंठ दाटून येणे ९. निखारा १०. जखमेतून वाहणारे रक्त १२. नांगरणीचा प्राणी १५. वारा, वायू १६. खैर, खदिर १८. घाव २०. न्यून, कमतरता २१. एक जंगली वनस्पती, इंद्रधनु २४. हत्ती, गज २५. मिठाईवाला २६. हनुमानाचे वडील २७. गुंडाळी २९. मुद्दाम चिडवून कृती करायला भाग पाडणे, उचकवणे ३२. रबराचा गुणधर्म ३३. फुलांचा अलंकार ३५. हिंदीत अर्थ, आशय ३६. उपाययोजना, कृती ३९. दारुडा ४१. शर्करा ४४. पाणी ४८. ढीग ५०. कृष्णपक्षातील शेवटची तिथी ५३. भरडलेले द्विदल धान्य ५४. रामाची आई ५५. छाती ५६. टॅक्स ५७. कापसाची एक जात, शाल्मली ५८. स्वार्थी ६०. अरुंद रस्ता ६१. कुबेराची राजधानी ६२. कट्टर मतांचा ६३. फरसाणमधील एक पदार्थ ६५. इमारतीच्या पायात टाकलेले ओबडधोबड दगड ६७. रामायणात उल्लेख असलेले अरण्य ६८. ताजा, प्रफुल्लित ६९. खेळती हवा नसलेली जागा ७१. भेटवस्तू, देणगी ७३. त्यानुसार ७४. विलक्षण, आश्चर्यकारक ७५. पती, भ्रतार ७७. चैत्री पाडवा ७९. डाक, पत्र ८०. तपासणी ८२. अनासक्ती, वैराग्य ८६. विष्णूचा स्त्री-अवतार ८७. रामाची जन्मभूमी ८८. अपशकुन ९०. कोरड ९१. महासागरात आढळणारा अवाढव्य सस्तन मासा ९३. आकर्षक ९४. इंद्राची पत्नी ९६. जाड कागदप्रकार ९७. तेव्हा, त्या वेळी ९८. शासन १००. पत्त्यांचा जुगार •

**नवाकाळ कोडे क्रमांक १४४६ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. विचलीत ४. बेशरम ८. फाटाफूट १०. गुपित ११. डाराडूर १३. कपाट १६. नकोसा १८. धाकदपटशा २१. तकवा २३. बाड २५. रजत २७. काटक २९. सोयरीक ३०. रज ३२. राजकुमारी ३५. प्रहार ३६. लोटा ३७. बळद ३८. वीड ३९. घट ४१. नाक ४२. पसारा ४४. तवा ४५. राजवट ४७. नफा ४८. बलवान ४९. रीम ५०. तनुजा ५१. सभ्य ५२. सावट ५३. भेकर ५५. ज्ञानेश्वर ५९. टवळी ६०. पिसू ६१. शालक ६३. कस ६४. बटाटावडा ६६. अनारसा ६८. जानकी ७०. कपट ७१. खुराक ७२. रागी ७४. पीडित ७६. टप्पा ७८. जपान ८०. रजा ८२. लेक ८४. कल ८५. कणिक ८६. गती ८८. सिद्धिविनायक ९०. लीला ९२. मेरू ९३. एकनाथ ९६. मघई ९८. डाली १००. हकनाक १०१. वडवानल १०४. शकुन १०५. भवन १०६. माता १०७. जून १०९. गेरू ११०. सूक्ष्म १११. मंडाले ११२. तटवणे ११३. वेतन ११४. सलाम

**उभे शब्द :** १. विपिन २. चतकोर ३. तडा ४. बेडूक ५. शरद ६. मर्कट ७. शोक ८. फाटक ९. फूल १२. राधा १४. पातक १५. दंडक १७. साजरा १९. परी २०. शाकाहार २२. वासोटा २३. बारीकसारीक २४. सरबत २६. तजवीज २८. टर ३१. जळवात ३३. कुडव ३४. रीघ ३६. लोकवान ४०. टन ४१. नाल ४३. रामरक्षा ४५. राजाज्ञा ४६. टसर४७अ. फासा ४८. बटवडा ५२अ. वटवट ५३. भेसूर ५४. दशावतार ५६. नेकजात ५७. श्वसन ५८. छटाक ६०. पिनाकपाणि ६२. कच्छपी ६५. टापशी ६६. अराजक ६७. सारा ६९. कीटक ७३. गीर्वाण ७५. डिकी ७७. वलय ७९. नकली ८१. जागरूकता ८३. बुद्धिमान ८४. कनात ८७. ठक ८९. कमकुवत ९१. लाडावलेला ९२. मेहमान ९३. एकजूट ९४. नाव ९५. थडगे ९७. घन ९९. लीन १०२. वारूळ १०३. लसूण १०५. भडास १०८. नव.

**संगीतकार वसंत प्रभू यांचा जन्म १९ जानेवारी १९२४ रोजी झाला. मराठी संगीताच्या इतिहासात वसंत या नावाला काही आगळेवेगळे महत्त्व असावे, अन्यथा या एकाच नावाच्या तीन संगीतकारांनी इतके सुरेल संगीत कसे काय दिले असते? वसंत देसाई, वसंत प्रभू आणि वसंत पवार हे तीन संगीतकार. या तिघांनी दिलेल्या संगीतावर मराठी गीत रसिकांच्या चार पिढ्या आजवर तृप्त झाल्या आहेत. त्यातील एक संगीतकार वसंत प्रभू.**

**वसंत** प्रभू यांचे खरे नाव व्यंकटेश प्रभू मूळ गाव पाणे मंगरूळ, वडिलांचा हॉटेल व्यवसाय, बालवयापासूनच मेळ्यात गाणं-नृत्य-अभिनय करून ह्यांत रसिकमान्य झालेला 'वसंत प्रभू' नावाचा तरुणही संगीतात काहीतरी करण्यासाठी धडपडत होता. त्याच वेळी 'एचएमव्ही'चे वसंतराव कामेरकर ह्यांनी प्रभू यांची योग्यता ओळखून त्यांना एचएमव्हीत संगीत दिग्दर्शक म्हणून नोकरी दिली होती. दामूअण्णा माळी म्हणून प्रभू ह्यांचे एक मित्र होते. दामूअण्णा आणि पी. सावळाराम ह्यांचीही मैत्री होती. दामूअण्णांनी सावळाराम ह्यांची प्रभू ह्यांच्याशी ओळख करून दिली. ही 'शब्द'-'स्वरा'ची भेट म्हणजे रसिकांसाठी 'सुवर्णयोग'च ठरला. कारण, भावगीत विश्वात सावळाराम-प्रभू ह्या द्वयीने सोन्यासारखी एकाहून एक गाणी दिली. माणूस जसा नशीब घेऊन जन्माला येतो, तशीच गाणीसुद्धा नशीब घेऊनच जन्माला येतात! ह्या द्वयींची अशी अनेक गाणी नशीबवान ठरली. त्यातल्या एका गाण्याचे नशीब जास्तच जोरावर होते. ते प्रचंड गाजले. वर्षानुवर्षे वाजत राहिले. अनेक वेळा ऐकूनही ताजेतवानेच राहिले.

प्रत्येक पिढीला आवडणारे ते गाणे आहे 'गंगा-जमुना डोळ्यात उभ्या का? जा, मुली जा, दिल्याघरी तू सुखी रहा' आचार्य अत्रे ह्यांनी ह्या गीताचे कौतुक करताना म्हटले होते 'गंगा-जमुना' हे गाणे एका पारड्यात व इतर सगळी गाणी दुसऱ्या पारड्यात घातली तरी 'गंगा-जमुना'चे पारडे जड होईल!''

'सखी शेजारीणी' हे गाणे गाण्यासाठी वसंत प्रभू यांनी अरुण दातेच पाहिजेत अशी खास फर्माईश केली होती. तेव्हा अरुण दाते हे प्रसिद्धीस आले नव्हते. वसंत प्रभू यांनी एकूण २२ चित्रपटांना संगीत दिले.

संगीतकार वसंत प्रभू, जनकवी पी. सावळाराम आणि लता मंगेशकर या त्रयीने मराठी भावसंगीताची मुहूर्तमेढ रोवली. या त्रयीची अजरामर गीते




अजूनही आपल्या ओठी आहेत. वसंत प्रभू यांचे चरित्र मानसीचा चित्रकार तो या नावाने मधु पोतदार यांनी लिहिले आहे. वसंत प्रभू यांचे १३ ऑक्टोबर १९६८ रोजी निधन झाले.



### वसंत प्रभू संगीत दिलेली काही गाणी

- चाफा बोलेना
- चंद्र तोच अन् तेच तारे
- चंपक-गोरा कर कोमल
- चांद मोहरे चांदणे
- जन पळभर म्हणतिल
- जन्मोजन्मीं तुम्हीच यावे
- जय देवी मंगळागौरी
- जिथे सागरा धरणी मिळते
- जीर्ण पाचोळा पडे तो
- तुझे डोळे पाण्याने भरले
- तूच कर्ता आणि करविता
- तें दूध तुझ्या त्या
- दिनरात तुला मी किती

# १२ जिल्ह्यांत निवडणूक पुढे ढकलली

पान १ वरून

सहा अशा एकूण १२ जागांची निवडणूक रद्द करण्यात आली आहे. तळेगावमध्ये प्रभाग क्र. २ अ, ७ अ, ७ ब, ८ अ, ८ ब, १० ब; तर लोणावळ्यात प्रभाग क्र. १० अ आणि ५ ब चा समावेश आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील १२ पैकी कोपरगाव, देवळाली, नेवासा आणि पाथर्डी येथील निवडणुका नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांबाबत अपील आल्याने पुढे ढकलल्या आहेत. सोलापूरच्या मंगळवेढा येथे नगराध्यक्षपदासह सदस्यपदाची निवडणूक २० डिसेंबर रोजी होणार आहे. कारण येथील अपिलावर निकाल २७ नोव्हेंबर रोजी आला. सातारा जिल्ह्यातील फलटण आणि महाबळेश्वर नगरपरिषदेची निवडणूक रद्द करून पुन्हा एकदा कार्यक्रम जाहीर करण्यात येणार आहे.

नांदेडच्या मुखेड आणि धर्माबाद नगरपालिकेची संपूर्ण निवडणूक पुढे ढकलण्यात आली. भोकर, कुंडलवाडी आणि लोहा येथील एका-एका जागेची निवडणूकही लांबणीवर पडली आहे. धाराशिव नगरपालिकेतील प्रभाग क्र. २ अ, ७ ब आणि १४ ब या तीन जागांसाठी सुधारित कार्यक्रम जाहीर झाला आहे. लातूर जिल्ह्यातील रेणापूर येथील निवडणूक कार्यक्रमही रद्द करण्यात आला आहे. अकोल्याच्या बाळापूर नगरपालिकेतील नगराध्यक्ष पदासह सर्व २५ जागांची निवडणूक स्थगित करण्यात आली आहे. अमरावतीच्या अंजनगाव सुर्जी येथील निवडणूक नगराध्यक्षपदाच्या अपक्ष उमेदवाराच्या बाजूने न्यायालयाचा निकाल आल्याने स्थगित झाली. यवतमाळ नगर परिषदेची निवडणूक पुढे ढकलली आहे. जिल्ह्यातील दिग्रस, पांढरकवडा आणि वणी येथील काही प्रभागांची निवडणूकही पुढे ढकलण्यात आली आहे. चंद्रपूरमधील घुग्गुस नगर परिषदेची निवडणूकही पुढे ढकलण्यात आली आहे. या जिल्ह्यातील गडचांदूर प्रभाग क्र. ८ ब आणि मूळ प्रभाग क्र. १० ब या वॉर्डातील निवडणुका पुढील निर्णयापर्यंत स्थगित आहेत.

## बारामतीत आठ वॉर्डांत फक्त नगराध्यक्षपदासाठी मतदान

पवार कुटुंबात मुख्य लढत असलेल्या बारामती नगरपरिषदेतील नगराध्यक्षपदासह सात जागांची निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे. बारामती नगरपरिषदेत उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत दुपारी तीन वाजेपर्यंत होती. मात्र, ही प्रक्रिया पावणेतीन वाजताच बंद करण्यात आली. याशिवाय उमेदवारी अर्ज भरतानाच्या प्रक्रियेत काही त्रुटी होत्या, यावर काही जणांनी आक्षेप घेतला होता. न्यायालयाने भाजपाच्या दोन उमेदवारांना उमेदवारी अर्ज भरण्याची तारीख संपल्यानंतरही अर्ज भरण्याचे निर्देश दिले होते. तसेच नगराध्यक्षपदाच्या उमेदवारावरील आरोपाबाबतही न्यायालयीन निर्णय प्रलंबित असल्याने निवडणूक आयोगाने वाद टाळण्यासाठी येथील निवडणूक प्रक्रिया पुढे ढकलण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. बारामतीत अजित पवार गटाचे जे आठ नगरसेवक बिनविरोध निवडून आलेले आहेत, त्यांच्यावर याचा कसलाही परिणाम होणार नाही. ते बिनविरोधच नगरसेवक राहणार आहेत. त्यांच्या प्रभागातील मतदार आता फक्त नगराध्यक्षपदासाठी मतदान करतील.

## रामदास आठवले महायुती सोडणार?

पान १ वरून

तर आम्ही महायुतीसोबतच राहू. समाधानकारक जागा न मिळाल्यास शिवसेना शिंदे गट किंवा अजित पवार यांची राष्ट्रवादी हे आमच्यासमोर पर्याय आहेत. मात्र, शरद पवार यांची राष्ट्रवादी, काँग्रेस किंवा उद्धव ठाकरे यांची शिवसेना या पक्षांसोबत आम्ही जाणार नाही. दीर्घ कालावधीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत असल्यामुळे या निवडणुकीत इच्छुकांची संख्या जास्त आहे आणि बंडखोरीचे प्रमाणही अधिक आहे.

अनेक ठिकाणी महायुतीतील पक्ष एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. मात्र, या निवडणुकांत युती, आघाडीचे अधिकार स्थानिक पातळीवर दिले गेले असले तरीदेखील प्रचारादरम्यान महायुतीमध्ये बेबनाव निर्माण होईल, अशी वक्तव्ये घटक पक्षांच्या स्थानिक अथवा प्रदेश पातळीवरील नेत्यांनी करू नयेत, असे आवाहनही आठवले यांनी केले.

## मुंबईत आजपासून घरोघरी जात मतदारयादी पडताळणी होणार

पान १ वरून

तत्काळ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी. ज्या मतदारांची नावे दोन ठिकाणी (एका प्रभागातून वगळल्याशिवाय) समाविष्ट झाली आहेत, अशा मतदारांनी ही माहिती अधिकाऱ्यांना द्यावी. तसेच दुसऱ्या प्रभागातून स्थलांतरित झालेले मतदार किंवा मृत मतदारांची नावे जुन्या यादीतून वगळण्यात आली नसतील, तर त्याबद्दलही माहिती द्यावी. अधिकारी/कर्मचारी घरोघरी येतील, तेव्हा त्यांना योग्य सहकार्य करणे आवश्यक आहे.

या मोहिमेदरम्यान कोणत्याही नागरिकाला मतदारयादी किंवा पडताळणीसंबंधी अधिक माहिती जाणून घेण्यासाठी मुंबई महापालिकेच्या https://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. याशिवाय मतदार आपल्या नजीकच्या प्रशासकीय विभाग कार्यालयातील (वॉर्ड ऑफिस) मतदार सहायक कक्षात संपर्क साधून आपल्या शंकांचे निराकरण करू शकतात.

## नेत्यांवरील खटले सुरू

पान १ वरून - १८ नोव्हेंबर रोजी न्यायालयाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे नेते नवाब मलिक यांच्यावर दाखल असलेल्या मनी लाँड्रिंग खटल्यात आरोप निश्चित केले. त्याचबरोबर न्यायालयाने गंगाखेड शुगर अँड एनर्जी लि. या कंपनीशी संबंधित बँक घोटाळ्याप्रकरणी आरोपी राष्ट्रीय समाज पक्षाचे आमदार रत्नाकर गुट्टे यांच्यावरही आरोप निश्चित केले. गुट्टे हे या कंपनीचे संचालक होते. गुट्टे यांना पुढील सुनावणीच्या वेळी न्यायालयात जातीने उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत. अन्य राजकीय नेत्यांवरील खटलेदेखील अशाच प्रकारे वेगाने निकाली काढले जाणार आहेत.

## लंडन शहरातही लोक पान खाऊन थुंकतात

पान १ वरून

घेतला आहे. वेम्बली हे लंडनच्या ब्रेंट बरोमधील बहुढंगी सांस्कृतींचे केंद्र आहे. या ठिकाणी भारतीय, पाकिस्तानी आणि श्रीलंकन समुदाय मोठ्या संख्येने राहतात.

दक्षिण आशियाई लोकसंख्येमुळे वेम्बलीला सांस्कृतिक, सामाजिक आणि व्यावसायिक महत्त्व प्राप्त आहे, जिथे रेस्टॉरंट, दुकाने आणि व्यवसाय या समुदायाशी संबंधित आहेत. ब्रेंटमधील विविधतेमुळे येथे दक्षिण आशियाई लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे. याच वेम्बली परिसरात रस्त्यावरील लाल डागांची समस्या मोठ्या प्रमाणात झाली आहे. फुटपाथ, टेलिफोन बुथ, दुकानांच्या बाहेरील भाग आणि अगदी रस्त्याच्या कडेला असलेल्या फुलझाडांवरही लाल डाग दिसतात. यामुळे प्रशासन अस्वस्थ झाले आहे. याप्रकरणी ब्रेंट कौन्सिलने सांगितले की, या लाल डागांवर नियंत्रण आणण्यासाठी दरवर्षी सुमारे ३० हजार पौंड म्हणजे ३५ लाख रुपये खर्च करावे लागतात.

अत्याधुनिक क्लिनिंग जेट मशिनने देखील काही डाग साफ होत नाहीत. या समस्येमुळे कौन्सिलला शून्य-सहिष्णुता धोरण स्वीकारावे लागले. दोषींवर दंड लावणे, हॉटस्पॉटवर बॅनर लावणे आणि परिसरात नियमित गस्त घालणे या उपाययोजना अंमलात आणल्या आहेत. दोषींना १०० पौंड म्हणजे १२ हजार रुपये दंड करण्याची तरतूद केली आहे. सार्वजनिक क्षेत्र आणि अंमलबजावणी विभागाच्या कॅबिनेट सदस्य कृपा शेठ यांनी ठाम इशारा दिला की, रस्ते आणि



सार्वजनिक जागी थुंकणाऱ्यांबाबत आम्ही आता पूर्णपणे कठोर भूमिका घेतली आहे. ब्रेंटमध्ये असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. नियम मोडणाऱ्यांना आम्ही निश्चितपणे पकडू आणि दंड करू.

## धारावी पुनर्वसन प्रकल्पाला प्रदूषणावरून पालिकेची नोटीस

पान १ वरून

दिसून आले. यावर जी उत्तर विभागाने कठोर पाऊले उचलत उपजिल्हाधिकारी आणि डीआरपीच्या सक्षम प्राधिकरणाकडे विकासकाची प्रकल्पासाठी दिलेली परवानगी रद्द करण्याची आणि योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली आहे. याबाबत उद्या पालिकेकडून पुढील निर्णय होण्याची शक्यता आहे. मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केल्यामुळे धारावी पुनर्वसन प्रकल्पावर कठोर कारवाई केली जाणार, असे पालिका अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. पालिकेकडून तत्काळ कारवाई झाल्यास धारावी पुनर्वसन प्रकल्पाचे काम रखडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## संसदेचे हिवाळी अधिवेशन आजपासून 'एसआयआर'वरून गोंधळाचे संकेत

पान १ वरून

या अधिवेशनात सरकार अणुऊर्जा विधेयकासह १० नवीन महत्त्वाची विधेयके सादर करण्याच्या तयारीत आहे. 'अणुऊर्जा विधेयक' मंजूर झाल्यास खासगी कंपन्यांनाही पहिल्यांदाच अणुऊर्जा प्रकल्प उभारण्याची परवानगी मिळू शकेल. तसेच, उच्च शिक्षण आयोग स्थापन करणारे विधेयक मांडले जाऊ शकते. यानुसार, यूजीसी, एआयसीटीई आणि एनसीटीई यांचे विलीनीकरण करण्याचा सरकारचा विचार आहे. दुसरीकडे, विरोधी पक्ष मतदारांच्या एसआयआर (स्पेशल इंटेंसिव्ह रिव्हिजन) मुद्यावरून सरकारला घेरण्याची शक्यता आहे. पावसाळी अधिवेशनातही याच मुद्यावरून मोठा गदारोळ झाला होता. शिवाय, 'इंडिया' आघाडी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात महाभियोग प्रस्ताव आणण्याच्या तयारीत असल्याचे सांगितले जात आहे.




नवाकाळ



## पश्चिम बंगाल व केरळचे राजभवन आता लोकभवन

**नवी दिल्ली** - केंद्राच्या निर्देशांनंतर देशभरात राजभवनांचे लोकभवन नामांतर सुरू आहे. काल पश्चिम बंगालमध्ये कोलकाता आणि दार्जिलिंग राजभवन येथे हा बदल लागू झाला. त्यानंतर तिरुवनंतपुरमचे राजभवनही उद्यापासून अधिकृतपणे लोकभवन या नावाने ओळखले जाणार आहे. गेल्या वर्षी राष्ट्रपतींच्या उपस्थितीत झालेल्या राज्यपाल परिषदेत केरळच्या राज्यपालांनी देशातील सर्व राजभवनांना 'लोकभवन' असे नाव देण्याची सूचना केली होती. त्यानुसार केंद्रिय गृह मंत्रालयाने २५ नोव्हेंबरला देशभरातील राजभवन आणि लेफ्टनंट गव्हर्नर (उपराज्यपाल) यांच्या निवासस्थानांना 'लोकभवन' असे नाव देण्याची अधिसूचना जारी केली होती. ब्रिटिशकालीन वारशाच्या खाणाखुणा पुसून राजभवनांना लोकाभिमुख रूप देणे, हा या निर्णयामागील उद्देश असल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले.

## एफएमचा शोध आणि आर्मस्ट्राँगची फरफट

**अमेरिकन कंपन्या किती क्रूरपणे एखाद्या माणसाचे आयुष्य संपवून टाकतात हे जाणून घ्यायचे असेल तर एडविन हॉवर्ड आर्मस्ट्राँग या शास्त्रज्ञाची व्यथा समजून घ्यायला हवी.**

**५ नोव्हेंबर** १९३५ या दिवशी न्यूयॉर्क शहरात एडविन हॉवर्ड आर्मस्ट्राँग रेडिओ इंजिनिअर्सच्या एका कॉन्फरन्समध्ये प्रेझेंटेशन द्यायला उभा होता. त्यांनी सगळ्यांच्या समोर रेडिओ सुरू केला आणि अचानक सभागृह शांत झाले.

कारण इतिहासात पहिल्यांदाच लोक खरखर नसलेला रेडिओचा आवाज ऐकत होते. शुद्ध, स्फटिकासारखा आवाज येत होता. स्पीकरमधून आलेला शब्दन्‌शब्द असा ऐकू येत होता जणू बोलणारा माणूस समोर उभा राहून बोलतो आहे. संगीत सुरू झाले आणि रेडिओच्या इतिहासात पहिल्यांदा खरखरीशिवाय स्वरन्‌स्वर स्पष्ट कानावर पडत होता. आर्मस्ट्राँगने एफएम रेडिओचा शोध लावला होता.

आता आपण रोजच एफएम रेडिओचा आवाज ऐकतो, पण त्याकाळी एफएम रेडिओ नव्हतेच. जे रेडिओ होते ते सगळे एएम रेडिओ होते. एफएम आणि एएम या दोन्हीत फरक आहे. एएम मध्ये रेडिओच्या तरंगात ध्वनी लहरींची रुंदी आवाजाच्या निर्मितीसाठी वापरली जाते. या लहरी लांबवर प्रवास करू शकतात, पण खरखर फार मोठ्या प्रमाणात निर्माण होते. एफएम या प्रकारच्या रेडिओच्या तरंगात ध्वनी लहरींची वारंवारीता आवाजाच्या निर्मितीसाठी वापरली जाते. या लहरी एएमच्या तुलनेत कमी अंतरावर प्रवास करतात, पण त्यात खरखर किंवा कोणत्याही प्रकारचा व्यत्यय नसतो.

ज्या दिवशी आर्मस्ट्राँगने एफएम रेडिओचा शोध लावला त्यादिवशी रेडिओच्या आवाजातील खरखर आणि व्यत्यय संपले, पण त्याच दिवशी अमेरिकेतील सर्व रेडिओ कंपन्या कालबाह्य झाल्या. एफएम रेडिओची सुरुवात झाली आणि एएम रेडिओचा अंत झाला. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे आर्मस्ट्राँग हा हौशी संशोधक नव्हता. आधीपासून रेडिओ इतिहासातील सर्वात महत्त्वाचा संशोधक म्हणून तो ओळखला जात होता. १९१२ मध्ये त्याने रेजेनेरेटिव्ह सर्किट शोधले. ज्यामुळे रेडिओ रिसिव्हर प्रत्यक्ष वापरण्यास योग्य झाले. १९१८ मध्ये त्याने सुपरहेटरोडाइन रिसिव्हर तयार केला जो आजही जवळजवळ प्रत्येक रेडिओ आणि टीव्हीचा पाया आहे.



पण आर्मस्ट्राँगचा एफएम रेडिओचा शोध म्हणजे अमेरिकन रेडिओवर नियंत्रण ठेवणाऱ्या एटी अ‍ॅण्ड टी, वेस्टिंगहाऊस आणि विशेषतः आरसीए कंपन्यांसाठी धोक्याची घंटा होती. त्यांनी एएम रेडिओच्या पायाभूत सुविधांमध्ये कोट्यवधी गुंतवले होते. त्यांच्याकडे पेटंट, स्टेशने, उपकरण उत्पादक होते. एफएमने हे सगळेच धोक्यात आले होते. एफएम मूलभूतपणे वेगळे होते, श्रेष्ठ होते आणि त्यांच्या साम्राज्याला संपवण्याची ताकद त्यात होती. यामुळे ते बिथरले. एफएमचा प्रसार थांबवण्यासाठी एकच उपाय होता. तो म्हणजे आर्मस्ट्राँग मोठा होण्यापूर्वीच त्याला संपवून टाकणे, त्याला उद्‌ध्वस्त करणे. या दरम्यान आर्मस्ट्राँगने स्वतःचं एफएम स्टेशन नेटवर्क उभारले. ४२ ते ५० फ्रिक्वेन्सीवर ते चालत होते. एफएम स्टेशने देशभर उभी राहू लागली. पण १९४५ मध्ये कंपन्या एकत्र आल्या आणि त्यांनी दबाव टाकला. या दबावाखाली नियंत्रण करणाऱ्या आयोगाने एफएम रेडिओला ८८ ते १०८ या पट्ट्यात हलवले. कागदावर हा केवळ तांत्रिक बदल होता. प्रत्यक्षात तो एफएमसाठी विध्वंसक होता. आर्मस्ट्राँग आणि त्याच्या सहकाऱ्यांनी तयार केलेले प्रत्येक एफएम रिसिव्हर एका रात्रीत निरुपयोगी झाले. प्रत्येक स्टेशन पुन्हा नव्याने उभारावे लागले. वर्षानुवर्षांची गुंतवणूक, हजारो रेडिओ, संपूर्ण नेटवर्क एका नियामक बदलाने कुचकामी झाले.

आयोगाने एफएम स्टेशनांना मर्यादित केले. त्यामुळे त्यांची पोहोच एएमच्या तुलनेत अगदी कमी झाली. मग अंतहीन, थकवणारे पेटंट वाद सुरू झाले. आर्मस्ट्राँगची संपत्ती, ऊर्जा आणि इच्छाशक्ती संपवण्यासाठी हे सर्व केले जात होते. आर्मस्ट्राँग वर्षानुवर्षे लढला. त्याने आपली सगळी संपत्ती वकिलांच्या फीमध्ये खर्च केली. त्या तणावात त्याचे आरोग्य खालावले. त्याचे वैवाहिक जीवन संपत आले.

एका रेडिओ संशोधकाला त्यानेच उभारलेल्या उद्योगाने पद्धतशीरपणे नष्ट केले. ३१ जानेवारी १९५४ च्या सकाळी, एडविन हॉवर्ड आर्मस्ट्राँगने आपला ओव्हरकोट, टोपी आणि हातमोजे घातले. त्याने पत्नी मॅरियनसाठी एक चिठ्ठी लिहिली आणि आपल्या १३व्या मजल्यावरील मॅनहॅटन अपार्टमेंटच्या खिडकीतून वयाच्या ६३ व्या उडी मारून आयुष्य संपवून टाकले. एडविन हॉवर्ड आर्मस्ट्राँग संपला, पण शेवटी त्याचे तंत्रज्ञान एफएम जिंकले. आज जवळजवळ प्रत्येक रेडिओ स्टेशन एफएम वर प्रसारित होते.

जेव्हा तुम्ही संगीत ऐकता तेव्हा आवाज स्वच्छ ऐकू येतो, ९९.५ किंवा १०७.९ वर गाणी ऐकता तेव्हा लक्षात ठेवा ते आर्मस्ट्राँगचे देणे आहे.

## डॉ. गौरीनंतर माझा बळी जाणार स्नेहल घुगेंचा व्हिडिओ व्हायरल

■ पुणे



**डॉ. गौरी** गर्जे आत्महत्येचे प्रकरण राज्यभर चर्चेत असतानाच आता जालन्यातील महिला डॉ. स्नेहल घुगे यांच्या आरोपांनी खळबळ उडाली. डॉ. घुगे यांनी डॉ. गौरीनंतर आपला बळी जाणार असल्याचा दावा व्हिडिओ पोस्टमधून केला आहे. यामध्ये त्यांनी पती, सासरच्या मंडळींसह भाजपा आ. नारायण कुचे आणि आ. चित्रा वाघ यांनाही छळ, धमक्या आणि राजकीय दबावासाठी जबाबदार ठरवले आहे. साडेतीन वर्षांपासून शारीरिक व मानसिक अत्याचार होत असल्याचा आरोप करत त्यांनी पोलिसही तक्रार घेत नसल्याचे सांगितले. आ. कुचे यांनी आरोप फेटाळत डॉ. घुगे आणि त्याच्या पतीला ओळखत नसल्याचे सांगितले.

डॉक्टर स्नेहल घुगे यांचे साडेतीन वर्षांपूर्वी रवींद्र महादेव घुगे यांच्याशी लग्न झाले होते. ते जालन्यातील अंबडचे रहिवासी आहेत. डॉ. घुगे यांनी आरोप केले की, लग्नानंतर पतीचे विवाहबाह्य संबंध होते. याबाबत विचारणा केल्यानंतर पतीने

**दोन भाजपा आमदारांवर आरोप**

मारहाण केली. याशिवाय मागील ११ महिन्यांपासून पती लपून बसल्याचेही त्यांनी म्हटले आहे. डॉ. घुगे व्हिडिओमध्ये म्हणतात की, ज्याप्रकारे डॉ. गौरी पालवे मृत्यूची बातमीची चर्चा सुरू आहे. त्या ठिकाणी मी स्वतःची कल्पना करू शकते. त्यांनी जे आठ महिन्यात सहन केले तेच साडेतीन वर्षांपासून माझ्यासोबत सुरू आहे. माझी नणंद योगिता संजय सानप ही भाजपा आ. नारायण कुचे यांची कार्यकर्ती आहे. ती दरवेळी त्यांच्या नावाने मला धमक्या देते. याबाबत जेव्हा आ. चित्र वाघ यांच्याकडे मदत मागितली, तेव्हा त्यांनी घटस्फोट घेण्याचा सल्ला दिला.

## युगेंद्र-तनिष्काचा विवाह सोहळा पवार कुटुंबीय पुन्हा एकत्र

■ बारामती

**महाराष्ट्राच्या** राजकारणात महत्त्वाचे स्थान असलेल्या पवार कुटुंबातील युगेंद्र पवार आणि तनिष्का कुलकर्णी यांचा विवाहसोहळा आज सायंकाळी ५.१५ वाजताच्या मुहूर्तावर मोठ्या उत्साहात बारामतीत पार पडला. या सोहळ्याला ज्येष्ठ नेते शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार, त्यांचे पुत्र जय पवार, पार्थ पवार यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. युगेंद्र पवार हे अजित पवार यांचे पुतणे आणि श्रीनिवास पवार यांचे पुत्र आहेत.



**सुप्रिया सुळेंचे नृत्य चर्चेत**

काल झालेल्या हळद समारंभाचे फोटो सुप्रिया सुळे यांनी समाजमाध्यमावर शेअर केले होते. तर आजच्या विवाह सोहळ्यात सुप्रिया सुळे यांच्या उत्स्फूर्त नृत्याने कार्यक्रमाची रंगत वाढली. त्यांच्या नृत्याचा व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला आहे.

## पुणे जिल्ह्यात शरद पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये प्रचंड निरुत्साह

■ पुणे

**पुणे** जिल्ह्यात १४ नगरपालिका आणि ३ नगरपंचायती अशा एकूण १७ स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक होत आहे. सर्व पक्ष आपापली ताकद दाखवण्यासाठी निर्धाराने रिंगणात उतरले आहेत. मात्र शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मात्र काहीसा अलिप्त दिसत आहे. एकेकाळी एकत्र राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असलेल्या या जिल्ह्यात पक्षाने एक अपवाद वगळता कुठेही नगराध्यक्षपदासाठी उमेदवार दिलेला नाही.

या निवडणुकांमध्ये भाजपा आपली वाढलेली ताकद दाखवण्याचा प्रयत्न करत आहे. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस आपला गड राखण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहे. मात्र या संपूर्ण रणधुमाळीमध्ये शरद पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष कुठेच दिसत नाही.

## तामिळनाडूत २ बसची धडक ७ ठार! ४० जण जखमी

■ चेन्नई

**तामिळनाडूच्या** तिरुपथूरजवळ आज दोन सरकारी बसची धडक झाली. या भीषण अपघातात ७ प्रवाशांचा मृत्यू झाला तर सुमारे ४० जण जखमी झाल्याची माहिती आहे. जखमींना शिवगंगई सरकारी रुग्णालयात दाखल केले. जखमींपैकी अनेकांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एक बस कराईकुडीच्या दिशेने तर दुसरी मदुराईकडे जात होती. तिरुपथूरजवळ रस्त्याच्या अरुंद भागात दोन्ही वाहनांची धडक झाली. या अपघातानंतर अनेक प्रवासी बसमध्येच अडकले होते.

## मुंबईकरांच्या स्वच्छ, शुद्ध श्वासासाठी मुंबई काँग्रेसचा ठोस जाहीरनामा

■ मुंबई

**मुंबईतील** हवा विषारी होणे यात निसर्गाचा दोष नाही, तर तो भ्रष्ट, बेजबाबदार आणि संधिसाधू सरकारचे दुर्लक्ष, निष्काळजीपणा आणि प्रयत्नांच्या अभावाचा परिणाम आहे, असा सणसणीत आरोप करीत मुंबई काँग्रेस अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांनी आज काँग्रेसचा पर्यावरणाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. काँग्रेस सत्तेत आल्यावर मुंबईकरांच्या श्वासाचा हक्क आम्ही पहिल्याच दिवशी सुरक्षित करू, असे आश्वासनही त्यांनी यावेळी मुंबईकरांना दिले.

**हवेची गुणवत्ता सुरक्षित पातळीवर आणणार**

पुढील पाच वर्षांत मुंबईचा हवेचा गुणवत्ता निर्देशांक ४० ते ६० या सुरक्षित पातळीवर आणणार, मुंबई शहरात सर्वत्र 'हवेचा गुणवत्ता निर्देशांक' प्रणाली बसवण्यात येईल, वॉर्डनिहाय प्रदूषणाचे स्त्रोत सार्वजनिकपणे ऑनलाईन जाहीर केले जातील, प्रत्येक वॉर्डसाठी प्रदूषण नियंत्रण कृती आराखडा असेल, नियम मोडणाऱ्या बिल्डर्सच्या नावांची यादी सार्वजनिक केली जाईल, झाकण नसलेले कचरा-वाहतूक ट्रक व इतर वाहनांना पूर्ण बंदी केली जाईल, मुंबईतील १०० टक्के स्मशान भूमींमध्ये अंत्यविधीसाठी विद्युत स्मशानभूमींचा पर्यायसुद्धा देण्यात येईल, अशा अनेक मुद्यांचा या जाहीरनाम्यात समावेश करण्यात आला आहे.

## मला भाजपाकडून ऑफर आमदार नीलेश राणेंचा दावा

■ सिंधुदुर्ग

**सिंधुदुर्गमध्ये** भाजपा आणि शिंदेसेना यांच्यातील वाद दिवसेंदिवस वाढत आहे. शिंदेसेनेचे आमदार नीलेश राणे, भाजपा मंत्री नितेश राणे आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यात आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. या धुमश्चक्रीत आज माध्यमांशी बोलताना नीलेश राणे यांनी आपल्याला भाजपाकडून वारंवार ऑफर देण्यात आली होती, पण आपण शिंदेंशी एकनिष्ठ राहण्याचा निर्णय घेतल्याने भाजपाची ऑफर नाकारली, असा दावा केला.

विधानसभा निवडणुकीच्या वेळी मी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे तिकीट मागितले होते. पण एका घरात तीन तीन तिकिटे कशी देणार, असा सवाल करून त्यांनी मला तिकीट नाकारले. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतून निवडणूक लढवून आमदार झाल्यानंतरही मला भाजपाकडून ऑफर येत होत्या. पण मी शिंदेंशी गद्दारी करणार नाही. शिंदेंचे उपकार मी जन्मभर विसरणार नाही. मला कसलीही लालसा नाही. मी प्रामाणिकपणे काम करत आहे. ठाकरे गटातील पदाधिकाऱ्यांना आमच्या पक्षात सामावून घेत आहे. भाजपा नेत्यांना याचा त्रास होत आहे, असे नीलेश राणे पुढे म्हणाले.

## चौथी आणि सातवी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षा अनिवार्य

■ मुंबई

**राज्यातील** सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या म्हणजेच जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता चौथी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा अनिवार्य करण्यात आली आहे. या परीक्षेच्या निकालाच्या आधारावर शासकीय शिक्षकांचे दरवर्षी मूल्यांकन केले जाणार आहे. त्याची नोंद सेवापुस्तिकेत व गोपनीय अहवालात केली जाईल, असा आदेश राज्य परीक्षा परिषदेने जरी केला आहे.

राज्य सरकारने १९५४-५५ पासून विद्यार्थ्यांमधील प्रज्ञावंत प्रतिभा शोधण्यासाठी शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे. ही परीक्षा विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनाचा महत्त्वपूर्ण टप्पा आणि पुढील स्पर्धा परीक्षांसाठी मूलभूत तयारी आहे. २०२६-२७ पासून ही परीक्षा दरवर्षी घेतली जाणार असून, इयत्ता पाचवी आणि आठवीची परीक्षा ही २२ फेब्रुवारी २०२६ होईल तर इयत्ता चौथी आणि सातवीची परीक्षा एप्रिलच्या चौथ्या आठवड्यात



होण्याची शक्यता आहे. दोन्ही वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना ही परीक्षा देण्याची संधी मिळणार आहे. यामुळे जिल्हा आणि तालुका शैक्षणिक गुणवत्ता स्पष्ट होणार आहे. गुणवत्तेत मागास राहिलेल्या भागांसाठी विशेष आराखडा तयार केला जाणार आहे.

## पुण्यात पुन्हा थंडीचा कडाका तापमानाचा पारा १२ अंशांवर

■ पुणे

**शहरासह** संपूर्ण जिल्ह्यात सलग तिसऱ्या दिवशी किमान तापमानात चांगलीच घट झाल्यामुळे हुडीहुडी भरणारी थंडी जाणवत आहे. हवेली परिसरात तर किमान तापमान १२ अंशांपर्यंत घसरले आहे. शहरात दोन ते तीन दिवस किमान तापमानात काही अंशी घट होण्याची शक्यता असल्याने थंडीचा जोर वाढेल, असा अंदाज पुणे वेधशाळेने वर्तविला आहे. वास्तविक, हवामान बदलामुळे मागील आठवड्यात कमाल व किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली होती. परिणामी ६ अंशांपर्यंत खाली आलेला थंडीचा पारा १८ अंशांवर गेल्यामुळे थंडी गायब झाली होती. मात्र गेल्या ४८ तासांत किमान तापमानात चार ते पाच अंशाने घट झाली आहे.

## हक्काच्या घरांसाठी महिलांनी एकनाथ शिंदेंचा ताफा अडवला

■ मुंबई

**वांद्रे** येथील गव्हर्मेंट कॉलनीच्या मालकी हक्काच्या भूखंडाच्या प्रश्नावरून संतप्त झालेल्या महिलांनी थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा ताफा अडवल्याची घटना घडली आहे. हक्काच्या घरांसाठी लढा देणाऱ्या या महिलांनी रस्त्यावर उतरून उपमुख्यमंत्र्यांसमोर जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन केले.

यावेळी महिलांनी शिंदेंना सांगितले की, अनेक मुख्यमंत्री झाले. परंतु कोणीही हे काम केले नाही. शिंदे यांच्या कार्यकाळातच यासंदर्भात शासन निर्णय निघाला आहे आणि त्यामुळे तुमच्याकडून या प्रश्नाची सोडवणूक करण्याची मोठी अपेक्षा आहे. आंदोलनामुळे ताफा अडवल्यानंतर उपमुख्यमंत्र्यांनी महिलांशी संवाद साधला. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून यावर मार्ग काढण्याचे आश्वासन दिले. मात्र, महिलांनी येत्या ९ डिसेंबरपासून उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. त्यांनी 'आम्ही तुमच्या लाडक्या बहिणी आहोत, भेद करू नका' असे भावनिक आवाहन करत उपमुख्यमंत्र्यांकडे न्याय देण्याची मागणी केली. दरम्यान, उपमुख्यमंत्री शिंदे यांनी महिलांना शांत करत चार ते पाच तारखेपर्यंत मार्ग काढण्याचे आश्वासन दिले.

## छत्रपती संभाजीनगरच्या विटस हॉटेलचे फेरमुल्यांकन

■ छ.संभाजीनगर

**राज्याचे** सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या पुत्राने ६४ कोटी रुपयांत विकत घेतलेल्या विटस हॉटेलचे आता न्यायालयाच्या आदेशावरून फेरमुल्यांकन केले जाणार आहे.

शिरसाट यांचे पुत्र सिध्दांत यांच्या सिद्धांत मटेरिअल प्रोक्युअरमेंट अँड सर्व्हिसेस या कंपनीने विटस हॉटेल लिलावात सर्वाधिक ६४.८३ कोटींची बोली लावून विकत घेतले होते. मात्र हा व्यवहार होताच शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत आणि विधान परिषदेतील माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी संजय शिरसाट यांच्यावर टीकेची झोड उठवली होती. विटस हॉटेलचे बाजारमुल्य १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त असताना मंत्री शिरसाट यांच्या दबावापोटी हे हॉटेल सिद्धांत शिरसाट यांना स्वस्तात विकण्यात आले, असा आरोप राऊत आणि दानवे यांनी केला. या व्यवहारावरून आपण अडचणीत येऊ शकतो हे लक्षात आल्यानंतर संजय शिरसाट यांनी सिध्दांत शिरसाट याला व्यवहारातून माघार घेण्यास सांगितले होते. त्यामुळे ती लिलाव प्रक्रिया रद्दबातल ठरवण्यात आली होती.

## राज्यात गडकिल्ल्यांवर नमो पर्यटन

### नमो नावाला विरोध भारत पर्यटन का नाही?

**महाराष्ट्र शासनाने प्रतापगड, शिवनेरी, साल्हेर आणि रायगड या चार गडकिल्ल्यांवर नमो पर्यटन माहिती आणि सुविधा केंद्र उभारण्यात येणार आहेत. त्यापैकी प्रतापगड आणि शिवनेरी या दोन केंद्रांच्या उभारणीसाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती राज्य पर्यटन विभागाचे संचालक बी. एन. पाटील यांनी सांगितली.**

■ मुंबई

**या** केंद्राना नरेंद्र मोदी हे नाव देण्यास विरोध होत आहे. भारत सरकारचा हा उपक्रम असल्याने भारत पर्यटन नाव ठेवावे, कुणा व्यक्तीचे नाव या केंद्रांना देऊ नये, अशी मागणी केली जात आहे.

पर्यटन विभागाचे संचालक बी. एन. पाटील म्हणाले की, तरुण पिढीला राज्यातील गडकिल्ल्यांचा इतिहास माहीत व्हावा, यासाठी या 'नमो पर्यटन माहिती' केंद्रांची उभारणी केली जाणार आहे. पर्यटकांना चांगली सुविधा मिळावी आणि प्रादेशिक पर्यटनाला चालना मिळावी



**प्रतापगड, शिवनेरीसाठी निविदा प्रक्रिया सुरू**

असाही या प्रकल्पाचा उद्देश आहे. ही केंद्र अभ्यागतांसाठी माहिती आणि सेवा पुरवणारा एकच बिंदू म्हणून काम करणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी राज्यभर ७५ 'नमो पर्यटन माहिती सुविधा केंद्र' उभारणार असल्याची घोषणा केली आहे. त्याच्या पहिल्या टप्प्यात या चार किल्ल्यांभोवती केंद्र उभारण्यासाठी ५० कोटी रुपयांचा निधी राखून ठेवण्यात आला असून त्यामुळे गडकोट पर्यटनाला नवसंजीवनी मिळणार आहे.

## पंकजा मुंडेंना कोर्टाचा झटका ७० कोटींच्या कामांना स्थगिती

■ छत्रपती संभाजीनगर

**जालना** जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी मंजुरी दिलेल्या सुमारे ७० कोटी रुपयांच्या विकासकामांना मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने अंतरिम स्थगिती दिली आहे. ई-टेंडरिंग प्रक्रियेचे उल्लंघन करण्यासाठी मोठ्या कामांचे तुकडे पाडून ती दहा-दहा लाख रुपयांच्या कामांमध्ये विभागल्याचा गंभीर आरोप याचिकेद्वारे करण्यात आला होता. यावर न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे. न्यायमूर्ती विभा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती हितेन वेणेगावकर यांच्या पीठाने या प्रकरणात राज्य शासन, जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषद अधिकाऱ्यांसह सर्व प्रतिवादींना नोटीस बजावली आहे. शेतकरी अनिरुद्ध शेळके यांनी ॲड. एस. एस. रणदिवे यांच्यामार्फत ही जनहित याचिका दाखल करण्यात आली होती.